# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

बाल हक्क संरक्षण आयोग
महाराष्ट्र राज्य






# वार्षिक अहवाल
# २०१८-१९











## मान्नीय मंत्री व राज्यमंत्री महिला व बाल विकास, महाराष्ट्र शासन



**श्रीमती पंकजा मुंडे, माननीय मंत्री, महिला व बालविकास**



**श्रीमती विद्या ठाकूर, माननीय राज्यमंत्री, महिला व बाल विकास**

# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची रचना

आयोगामध्ये अध्यक्ष आणि सहा सदस्य आणि एक सचिव यांचा समावेश आहे. आयोगामध्ये १२ कर्मचारी होते.

## अध्यक्ष व सदस्य



श्री. प्रवीण घुगे,
अध्यक्ष.
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग



श्री. संतोष शिंदे
सदस्य,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग



डॉ. शालिनी कराड
सदस्या,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग



प्रो. अस्मा शेख (पटेल)
सदस्या,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग



श्री. विजय जाधव
सदस्य,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग



ॲड.स्वरदा केळकर
सदस्या,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग



डॉ. वृषाली देशपांडे
सदस्या,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग



श्रीम. सीमा व्यास (भा.प्र.से)
सचिव,
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

## अध्यक्षांच्या लेखणीतून

### "बालो हि नाम राष्ट्रस्य अतुलो S यं निधिर्महान् ।
### वात्सल्येन महत्प्रेम्णा गोपनीयश्च सर्वदा ।।"

कोणत्याही राष्ट्राचा अतुलनीय आणि महान ठेवा म्हणजे त्या राष्ट्राची बालके असतात. हा ठेवा वात्सल्याने आणि मोठया प्रेमाने नेहमीच संरक्षिला गेला पाहिजे. तरच राष्ट्राचे उज्ज्वल भविष्य व उन्नती साध्य करता येऊ शकते. यासाठी मुलांना अनुकूल वातावरण निर्माण करुन देणे, प्रतिकुलतेतून त्यांची सुटका करणे, अन्यायापासून संरक्षण करणे आणि प्रत्येक बालकाला फुलण्यासाठी पोषक वातावरण देण्याची अत्यंत आवश्यकता असते.

भारतीय राज्यघटनेने प्रत्येक व्यक्तीला जे समान हक्क बहाल केलेले आहेत, त्यात जगण्याचा अधिकार, संरक्षणाचा अधिकार, विकासाचा आणि सहभागाचा अधिकार यांचा समावेश होतो. यासाठी बालकांसाठीच केवळ जे कायदे अस्तित्वात आलेले आहेत, त्या सर्व कायद्यांचे पर्यवेक्षण करीता संपूर्ण महाराष्ट्रातील बालकांना सुरक्षेचे कवच देण्यासाठी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग राज्य शासनाच्या २४ जुलै, २००७ च्या आदेशानुसार स्थापित करण्यात आलेला आहे.

आयोग बाल हक्क संरक्षणासाठी कटिबध्द असून बाल हक्क संरक्षण अधिनियम २००५, बाल न्याय अधिनियम २०१५, लैंगिक गुन्हयांपासून बालकांचे संरक्षण कायदा २०१२ तसेच बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार कायदा २००९ या सर्वांची सर्व स्तरावर सुयोग्य अंमलबजावणी होण्यासाठी संबंधित पोलीस यंत्रणा, बाल कल्याण समित्या, महिला व बालविकास आयुक्तालय, शिक्षण विभाग, आरोग्य विभाग, सामाजिक न्याय विभाग यांसारख्या विविध विभागांमध्ये समन्वय साधत बालकांना सर्वतोपरी सहाय्य करण्याचे महत्वपूर्ण कार्य करीत आहे.

यासाठी आयोगाकडे प्राप्त तक्रारींच्या सुनावण्या घेऊन बालकांना न्याय देण्यासाठी आयोग सदैव तत्पर आहे. एवढेच नाही तर बालक व त्याचे सर्वांगिण हित हे केंद्रस्थानी मानून विविध प्रकारच्या कार्यशाळा, बैठका, प्रबोधनात्मक कार्यक्रमही आयोगाच्या पुढाकाराने संपूर्ण महाराष्ट्रात राबविण्यात आले. प्राप्त तक्रारींबाबत नियमितपणे सुनावण्या घेऊन बालकांना दिलासा देण्याचे कार्य अखंडितपणे सुरु आहे. मुलांशी संबंधित नोंद झालेल्या गुन्हयांबाबत आयोगाने संबंधित पोलीस यंत्रणेशी सातत्याने समन्वय ठेवत व पाठपुरावा करत ते लवकर निकाली लागतील यासाठी जाणीवपूर्वक प्रयास केलेले

आहेत. संबंधित यंत्रणांना अधिक सजग, सक्षम व बालकांसाठी उदार दृष्टिकोण निर्माण करण्यासाठी प्रबोधनात्मक कार्यशाळांचे आयोजन आवर्जून करण्यात आले.

जुलै, २००७ मध्ये महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना करण्यात आल्यानंतर आयोगाने बालकांच्या हिताच्या नभांगणात गरुड भरारी घेतल्याचे दिसून येते. याबरोबरच बालकांना सुरक्षेचे, प्रगतीचे पंख देण्यासाठी आयोग सातत्याने प्रयत्नशील आहे, म्हणूनच महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग ही भावना बालक, पालक, समाजातील लोकांमध्ये सजगता वाढत आहे, यातच आयोगाचे खरे यश सामावलेले आहे असे वाटते.

यापुढेही आयोग बालकांच्या हितांचे संरक्षण करण्यासाठी सदैव तत्पर राहील आणि भारताचे भविष्य दैदिप्यमान करण्यामध्ये महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचा महत्वाचा वाटा असेल याची मला खात्री वाटते.

आयोगात एकूण १२ मंजूर पदे असून, पदांचा तपशिल व अधिकारी / कर्मचारी यांची नावे खालीलप्रमाणे आहेत.

| पदाचे नाव व तपशिल | अधिकारी / कर्मचारी यांची नावे |
|---|---|
| सचिव (१ पद) | श्रीमती. सीमा व्यास (भा.प्र.से.) |
| प्रशासकीय अधिकारी (१ पद) | श्री.अ.स.फडतरे (एप्रिल, २०१८ ते सप्टेंबर, २०१८) |
| विधी सल्लागार (१ पद) | श्री. प्रमोद माधव बाडगी |
| सहाय्यक प्रशासकीय अधिकारी तथा लेखा अधिकारी (१ पद) | श्रीमती. संगिता श्रीवास्तव |
| उच्चश्रेणी लघुलेखक (२ पदे) | १.श्रीमती .प्रांजल प्र. मोहीते<br>२. एक पद रिक्त |
| परिविक्षा अधिकारी (२ पदे) | १. श्रीम. कल्पना खंबाईत<br>२. श्रीम.प्राजक्ता चव्हाण (एप्रिल २०१८ ते मे २०१८) |
| लिपीक टंकलेखक (२ पदे) | १. श्रीम. मुग्धा जयकुमार<br>२. श्री. गजानन सेलूकर (एप्रिल २०१८ ते डिसेंबर २०१८) |
| शिपाई (२ पदे) | १. श्री.आर.एन.तिआडी<br>२. श्री.पी.बी.वाघमारे |

# अनुक्रमाणिका


अ) प्रस्तावना

ब) आंतराष्ट्रीय व राष्ट्रीय विधिविधाने

क) प्रमुख कायदे व आयोगाची कामे:

१. बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५
२. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९
३. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५
४. लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण (पोक्सो) अधिनियम २०१२

ड) आयोगाचे मा.अध्यक्ष व सदस्य यांनी केलेली कार्ये

१. काही पाऊले सुकन्यांसाठी
२. पोषण आहार योजना
३. राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग व रेल्वे प्रशासन यांचेसोबत बाल हक्क जनजागृती विषयक कार्यक्रम.
४. अल्पसंख्यांक बालकांसाठी आयोग
५. बाल महोत्सव
६. भेटीगाठी बालकांसाठी
७. आयोगाने घेतलेल्या बैठका

इ) आयोगाने केलेली कार्यवाही

ई) आयोगाने प्रकरणांबाबत केलेल्या काही शिफारशींचा सारांश.

उ) नमुना अ

ऊ) सन २०१८-१९ चे वित्तीय विवरणपत्र

अ) 

# प्रस्तावना

बालके ही, कोणत्याही राष्ट्राची अत्यंत मौल्यवान संपत्ती असते आणि अनुकूल व सहाय्यभूत वातावरण उपलब्ध करून दिले तर, प्रत्येक बालक हे, प्रगल्भ, प्रौढ व्यक्तीमध्ये विकसित होईल आणि देशाचा जबाबदार नागरिक होईल. अशाप्रकारे, समाजाच्या सर्वंकष विकासासाठी योग्य बालविकास अत्यंत महत्त्वपूर्ण आहे आणि राष्ट्रीय मानव संसाधन विकासासाठी बालकांची योग्य काळजी घेणे हा, उत्तम मार्ग आहे. भारत हा सर्वाधिक बाल लोकसंख्या असलेला देश आहे.

भारताच्या संविधानाने, लिंग, वय,जात आणि आर्थिक दर्जा विचारात न घेता, बालकांसह आपल्या सर्व नागरिकांना समान हक्क बहाल केलेले आहेत. बालकांच्या हक्कांचे, प्रामुख्याने त्यांच्या जीवनातील सर्व बाबींचा समावेश करून पुढील चार प्रकारांमध्ये वर्गीकरण केले जाते: जीविताचा हक्क, संरक्षणाचा हक्क, विकासाचा हक्क व सहभाग घेण्याचा हक्क हे हक्क अंमलात आणण्यासाठी आपल्या घटनात्मक तरतुदींच्या धर्तीवर अनेक महत्वाचे कायदे अधिनियमित करण्यात आलेले आहेत. त्यापैकी काही महत्त्वाच्या कायद्यांमध्ये, बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम,२००५; बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५, लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण (पोक्सो) अधिनियम २०१२ आणि बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ यांचा समावेश असून त्यात इतर गोष्टींबरोबरच आपल्या देशातील बालकांसाठी अनुकूल व संरक्षणात्मक वातावरण तयार करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम,२००५ अंमलात आल्याने, बालकांच्या हक्कांना प्रोत्साहन देण्यासाठी व त्यांचे संरक्षण करण्यासाठी शासनाव्दारे उपाययोजनांची अंमलबजावणी करण्यामधील एक नवीन टप्पा सुरू झाला आहे. सर्व कायदे, धोरणे, कार्यक्रम व प्रशासकीय यंत्रणा या, भारताच्या संविधानामध्ये आणि तसेच संयुक्त राष्ट्र संघाच्या बालकांच्या हक्कांबाबतच्या अभिसंधीमध्ये (UNCRC) संविनिर्दिष्ट केलेल्या यथार्थदर्शी बाल हक्कांशी सुसंगत आहेत याची सुनिश्चिती करण्यासाठी यामध्ये राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग व राज्य बाल हक्क संरक्षण आयोग गठीत करण्याची तरतूद केलेली आहे.

राष्ट्रीय स्तरावर २००७ मध्ये, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाची स्थापना केल्यापासून आत्तापर्यंत राज्यांमध्ये ३४ बाल हक्क संरक्षण आयोग स्थापित असून संबंधित विविध कायद्यांमध्ये अनिवार्य केल्याप्रमाणे, बाल हक्कांचे उल्लंघन केल्याबाबत चौकशी करण्यासाठी आणि बाल हक्कांचे संरक्षण व प्रचलन करण्यासाठी अन्य उपक्रम हाती घेण्याकरिता त्यांची स्थापना करण्यात आलेली आहे.

## बाल हक्कांचे संरक्षण करणारे करार :

मुलांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठया संख्येने अधिवेशने, संधी, कायदे आणि सनद लागू करण्यात आले आहेत. संबंधित कायदेशीर चौकटीची रुपरेषा खालील नमूद केल्याप्रमाणे आहे.

## आंतरराष्ट्रीय साधन :

### बालकांच्या हक्कांवर संयुक्त राष्ट्रांचे अधिवेशन (UNCRC)

सन १९८९ मध्ये संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने अंगीकृत केलेली बाल हक्कविषयक अभिसंधी (सीआरसी) हा, भारतासह बहुसंख्य विकसित तसेच विकसनशील देशांनी अनुसमर्थन केलेला सर्व स्वीकृत असा संयुक्त राष्ट्रांचा करार आहे. या अभिसंधीमध्ये, बालकांच्या सर्वोत्तम हिताचे संरक्षण करताना, सर्व राज्य पक्षकारांनी अनुसरून करावयाची मानके विहित केलेली आहेत आणि बालकांचे मूलभूत हक्क अधोरेखित केलेले आहेत. या अभिसंधीचे अनुसमर्थन करणाऱ्या देशांनी, तिच्या तरतुदीं, कायदेशीररीत्या बंधनकारक असल्याचे मान्य केले आहे. या अभिसंधीच्या तरतुदींचे पालन करण्यासाठी त्यांनी हाती घ्यावयाच्या उपाययोजनांबाबत ते बाल हक्कविषयक तज्ज्ञांना नियमितपणे अहवाल देतात.

संयुक्त राष्ट्रांच्या बाल हक्क विषयक अभिसंधी (UNCRC) नुसार, बालकांचे हक्क हे, वंश, रंग, लिंग, भाषा, धर्म, मूळ, संपत्ती, जन्म विषयक दर्जा किंवा क्षमता विचारात न घेता, १८ वर्षांखालील सर्व व्यक्तींना द्यावयाचे किमान हक्क व स्वातंत्र्य आहेत. संयुक्त राष्ट्रांच्या बाल हक्कविषयक अभिसंधी (UNCRC) मध्ये ५४ अनुच्छेद असून त्या प्रत्येकामध्ये विविध प्रकारचे हक्क अंतर्भूत आहेत जसे की:

- जीविताचा हक्क
- विकासात्मक हक्क
- संरक्षणाचा हक्क
- सहभागी होण्याचा हक्क

सभा करार कलम १६: मध्ये असे नमूद केले आहे की:

i) कोणतेही बालक, त्याची / तिची गोपनीयता, कुटुंब, किंवा पत्रव्यवहार यांमध्ये अनियंत्रित किंवा बेकायदेशीरपणे हस्तक्षेप करण्यास, किंवा त्याची किंवा तिची प्रतिष्ठा व सन्मान यांवर बेकायदेशीरपणे हमला करण्यास अधीन असणार नाही.
ii) अशा हस्तक्षेपाविरुद्ध किंवा हमल्याविरुद्ध कायद्याचे संरक्षण मिळण्याचा बालकाला हक्क आहे.

सभा करार कलम ४० मध्ये असे नमूद केले आहे की, दंडात्मक कायद्याचे उल्लंघन केल्याचा आरोप असलेल्या बालकाची गोपनीयता, कार्यवाहीच्या सर्व टप्प्यावर संरक्षित करण्यात यावी.

सन २००५ मध्ये, केंद्र शासनाने, सशस्त्र संघर्षातील बालकांचा सहभाग आणि बालकांची विक्री, बाल वेशाव्यवसाय व बाल अश्लीलता यांचे निवारण करणा-या बालकांच्या हक्कांवरील संयुक्त राष्ट्रांचे अधिवेशनाच्या दोन वैकल्पिक प्रोटोकॉलचा अंगीकार केला आहे. हिंसाचाराच्या व पिळवणुकीच्या या धोकादायक प्रकारांपासून बालकांचे संरक्षण करण्यासाठी भारताने आपल्या राष्ट्रीय धोरणास बळकटी दिली आहे आणि उपाययोजना केल्या आहेत.

# राष्ट्रीय विधिविधाने

## भारताचे संविधान

भारताच्या संविधानाने बालकांच्या दुर्बलतेस आणि त्यांच्या संरक्षणाच्या हक्कांस मान्यता दिली आहे. संरक्षणात्मक भेदभावाचे तत्व अनुसरून, बालकांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक व विशेष कायदे व धोरणे याव्दारे बालकांकडे विशेष लक्ष देण्यासाठी अनुच्छेद १५ मध्ये हमी दिली आहे.

समानतेचा हक्क, जीवनाचे संरक्षण आणि वैयक्तिक स्वातंत्र्य आणि शोषणविरोधी हक्क ह्या सगळ्या बाबी घटनेचे कलम १४, १५, १५(३), १९(१)(ए) ,२१, २१(ए), २३, २४, ३९(इ), ३९(फ),व ४५ हयात अधोरेखित आहेत. तसेच हे कलम बालकांसह, सर्व लोकांचे संरक्षण, सुरक्षा आणि त्यांचे कल्याण करण्याचे प्रतिबद्धतेचे पुनरुच्चार करतात. संबंधित अनुच्छेदातील तरतुदी खालील प्रमाणे आहेत:

अनुच्छेद १४ : राज्य, कोणत्याही व्यक्तीस, भारताच्या राज्यक्षेत्रात कायद्यापुढे समानता अथवा कायद्याचे समान संरक्षण नाकारणार नाही.

अनुच्छेद १५ : राज्य, कोणत्याही नागरिकाला प्रतिकूल होईल अशा प्रकारे केवळ धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरून भेदभाव करणार नाही.

अनुच्छेद १५(३) : या अनुच्छेदातील कोणत्याही गोष्टीमुळे, महिला व बालके यांच्याकरिता कोणतीही विशेष तरतूद करण्यास राज्याला प्रतिबंध होणार नाही.

अनुच्छेद १९(१)(ए) : सर्व नागरिकांस, भाषण व अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्याचा हक्क असेल.

अनुच्छेद २१ : कायद्याव्दारे प्रस्थापित केलेली कार्यपद्धती अनुसरल्याखेरीज, कोणत्याही व्यक्तीस तिचे जीवित किंवा व्यक्तिगत स्वातंत्र्य यापासून वंचित केले जाणार नाही.

अनुच्छेद २१ (ए) : ६ ते १४ वर्षे वयाच्या सर्व बालकांसाठी मोफत व सक्तीचे शिक्षण.

अनुच्छेद २३ : माणसांचा अपव्यापार आणि वेठबिगारी यांना मनाई; माणसांचा सर्व अपव्यापार आणि बिगार व त्यासारख्या अन्य स्वरूपातील वेठबिगारीस मनाई करण्यात आली

आहे आणि या तरतुदीचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन करणे हा क़ायद्यानुसार दंडनीय अपराध असेल.

अनुच्छेद २४ : कारखाने, इत्यादींमध्ये बालकांना कामाला ठेवण्यास मनाई: १४ वर्षे वयाखालील कोणत्याही बालकास, कोणत्याही कारखान्यात किंवा खाणीत काम करण्यासाठी नोकरीत ठेवले जाणार नाही अथवा अन्य कोणत्याही धोकादायक कामावर लावले जाणार नाही.

अनुच्छेद ३९ : राज्याने अनुसरावयाच्या धोरणाची विवक्षित तत्वे.

(इ) स्त्री व पुरुष कामगारांचे आरोग्य व ताकद आणि बालकांचे कोवळे वय यांचा दुरुपयोग करून घेण्यात येऊ नये आणि नागरिकांना आर्थिक गरजेपोटी त्यांचे वय किंवा ताकद यास न पेलणाऱ्या व्यवसायात शिरण्यास भाग पाडू नये.

(फ) बालकांना निरामय पद्धतीने आणि मुक्त व प्रतिष्ठापूर्वक वातावरणात आपला विकास करण्याची संधी व सुविधा दिल्या जाव्यात आणि बालके व युवक यांना शोषणापासून आणि नैतिक व भौतिक गरजांच्या बाबतीत उपेक्षेपासून संरक्षण दिले जावे.

अनुच्छेद ४५ : सर्व बालकांसाठी त्यांच्या वयाची सहा वर्षे पूर्ण होईपर्यंत प्रारंभिक बाल्यावस्थेतील देखभाल आणि शिक्षण यांसाठी तरतूद करण्याकरिता राज्य प्रयत्नशील राहील.

## इतर प्रमुख विधिविधाने:

अ) बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम २००५ मध्ये नमूद केल्याप्रमाणे आयोगाची कार्ये खालीलप्रमाणे आहेत :

१. आयोग खालीलपैकी सर्व किंवा कोणतीही कार्ये पार पाडेल, जसे की,

i) बाल हक्कांच्या संरक्षणासाठी कोणत्याही कायदयांव्दारे किंवा त्या अंतर्गत प्रदान करण्यात आलेल्या संरक्षणाची तपासणी करणे आणि आढावा घेणे आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपायांची शिफारस करणे;

ii) आयोगास योग्य वाटेल तसे वार्षिक आणि अशा नियतकालिक राज्य शासनास, त्या खबरदारीचे उपाय म्हणून कामाचा अहवाल सादर करणे;

iii) बालकांच्या अधिकारांचे उल्लंघन केल्याबद्दल चौकशी करणे आणि अशा प्रकरणांमध्ये कार्यवाहीची शिफारस करणे;

iv) दहशतवाद, जातीय हिंसाचार, दंगली, नैसर्गिक आपत्ती, घरगुती हिंसाचार,एचआयव्ही/एड्स, तस्करी, दुर्व्यवहार, छळ व शोषण, अश्लील साहित्य आणि वेश्याव्यवसाय यांनी बाधित झालेल्या बालकांना त्यांच्या हक्कांचा फायदा घेण्यास प्रतिबंध करणाऱ्या सर्व बाबींचे परीक्षण करणे आणि योग्य उपाययोजनांची शिफारस करणे;

v) विशेष काळजी आणि संरक्षणाची गरज असलेल्या बालकांशी संबंधित समस्यांकडे लक्ष देणे, ज्यात त्रस्त बालक, उपेक्षित आणि वंचित बालक, विधीसंघर्षग्रस्त बालके, अल्पवयीन बालक, कुटुंब नसलेली बालके आणि कैदयांची बालके यांचा समावेश आहे व तसेच योग्य उपाययोजनांची शिफारस करणे;

vi) करार आणि इतर आंतरराष्ट्रीय साधनांचा अभ्यास करणे आणि विदयमान धोरण, कार्यक्रमांचे नियोजन आणि बालकांच्या हक्कांवरील इतर उपक्रमांचा नियमित आढावा घेणे आणि बालकांच्या सर्वोत्तम हितासाठी त्या उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिफारसी करणे;

vii) बाल हक्कांच्या क्षेत्रात संशोधन हाती घेणे आणि संशोधनासाठी प्रोत्साहन देणे;

viii) समाजातील विविध घटकांमध्ये बाल हक्कांबाबत साक्षरता पसरवणे आणि प्रकाशने, माध्यमे, चर्चासत्र आणि इतर उपलब्ध माध्यमांव्दारे या अधिकारांच्या संरक्षणासाठी उपलब्ध असलेल्या संरक्षणाविषयी जागरूकता वाढविणे;

ix) राज्य शासनाच्या नियंत्रणाखालील सुधारगृह किंवा बालकांसाठी असणाऱ्या निवासस्थान किंवा संस्थांची तपासणी करणे, कोणत्याही सामाजिक संस्थेव्दारे चालविल्या जाणाऱ्या कोणत्याही संस्थेसह इतर कोणतेही प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील, कोणतेही बाल संरक्षक निवारागृह किंवा ठिकाण, बालकांना सुधारण्यासाठी किंवा संरक्षणाच्या उद्देशाने ताब्यात घेण्यात येते किंवा दाखल केले जाते आणि आवश्यक वाटल्यास त्यावर योग्य ती कार्यवाहीसाठी या अधिकाऱ्यांकडे नेणे.

x) तक्रारींची चौकशी करणे आणि खाली नमूद केलेल्या बाबींसंबंधित स्वयंप्रेरणेने सूचना देणे:

(i) बालकांच्या अधिकारांची उल्लंघन आणि वंचित ठेवणे

(ii) बालकांच्या संरक्षणासाठी आणि विकासासाठी प्रदान केलेल्या कायदयाची अंमलबजावणी न करणे.

(iii) बालकांचे त्रास कमी करण्याच्या आणि कल्याण सुनिश्चित करण्याच्या उद्देशाने धोरणात्मक निर्णय, मार्गदर्शक तत्त्वे किंवा सूचनांचे पालन न करणे, तसेच अशा बालकांना आराम प्रदान करणे किंवा अशा प्रकरणांमध्ये उद्भवणारे मुद्दे योग्य अधिकाऱ्यांकडे उपस्थित करणे.

xi) बालकाच्या हक्कांच्या वाढीसाठी अशी इतर आवश्यक कार्ये आणि उपरोक्त कार्यांमध्ये अनुषंगिक कोणतीही बाब.

## आयोगाची कार्ये

## महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग नियम, २०१० च्या नियम ७ नुसार

१. बाल हक्क कराराचे अनुपालन करण्यात येते किंवा नाही याचे निर्धारण करण्यासाठी विद्यमान कायदा, धोरण आणि कार्यप्रणालीचे विश्लेषण करणे, बालकांवर परिणाम करणाऱ्या धोरणाच्या अथवा कार्यप्रणालीच्या कोणत्याही पैलुची चौकशी करून अहवाल देणे आणि बाल हक्कांच्या दृष्टिकोनातून प्रस्तावित नवीन विधीविधानावर अभिप्राय देणे.

२. त्या संरक्षक उपाययोजनांच्या कामावरील अहवाल शासन, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग आणि राज्याच्या इतर आयोगांकडे दरवर्षी व राज्य आयोगाला योग्य वाटेल अशा इतर कालांतराने सादर करणे;

३. बालकांनी स्वतःहून केलेल्या किंवा त्यांच्या वतीने कोणत्याही संबंधित व्यक्तीने केलेल्या अथवा बाल हक्कांचे उल्लंघन झाल्याची कोणतीही बाब जेव्हा आयोगाच्या निदर्शनास येईल तेव्हा आयोगाने स्वाधिकारे दाखल केलेल्या कोणत्याही तक्रारीवर विशेष चौकशी हाती घेणे;

४. बालकांचे प्राधान्यक्रम आणि कल्पनांचे प्रतिबिंब दिसून यावे म्हणून पालकांचा दृष्टिकोन आयोगाला थेट कळविण्यात आल्याची आयोगाच्या कामकाजावरून खात्री करून घेणे;

५. आयोगाने तसेच बालकांची संबंधित काम करणाऱ्या शासकीय विभागांनी आणि संघटनांनी आपल्या कामकाजातून बालकांच्या विचारांचा प्रसार करणे, त्यांना योग्य तो न्याय देणे आणि त्याची गंभीर दखल घेणे;

६. बाल हक्क विषयक माहिती तयार करणे आणि तिचा प्रसार करणे;

७. शालेय पाठ्यक्रमात शिक्षकांच्या प्रशिक्षणामध्ये बाल हक्काचा समावेश करण्यास प्रोत्साहन देणे आणि बालकांशी निगडित काम करणाऱ्या कर्मचारी वर्गाला प्रशिक्षण देणे.

## ब) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ च्या कलम ३१ आणि ३२ अंतर्गत राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाला पुढील कार्ये सोपविण्यात आली आहेत.

I) या अधिनियमाव्दारे किंवा त्या अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या संरक्षणाची तपासणी करणे व त्यांचा आढावा घेणे आणि त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपाययोजनांची शिफारस करणे.

II) बालकांच्या मोफत व अनिवार्य शिक्षणासंबंधी तक्रारींची चौकशी करणे आणि

III) बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियमाची कलम १५ व २४ या अन्वये तरतूद केल्याप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करणे.

IV) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्कासंबंधित कोणत्याही बाबींची चौकशी करताना बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम कलम १४ व २४ अन्वये त्यांना देण्यात आलेल्या अधिकारांचा समान अधिकार असेल.

V) कलम ३१ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमाखालील कोणत्याही व्यक्तीला एखाद्या बालकांच्या अधिकाराशी संबंधित कोणतीही तक्रार करायची असल्यास तिला त्या कार्यक्षेत्रात असलेल्या स्थानिक प्राधिकरणात लेखी तक्रार करता येईल.

VI) पोटकलम ३२(१) अंतर्गत तक्रार प्राप्त झाल्यानंतर स्थानिक प्राधिकरण संबंधित पक्षांना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत या बाबीवर निर्णय देईल.

VII) स्थानिक प्राधिकरणाच्या निर्णयामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडे किंवा यथास्थिती कलम ३२ पोट कलम ३ अन्वये विहित केलेल्या प्राधिकरणाकडे अपिल करता येईल.

## क) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ हा एक सर्वसमावेशक कायदा असून त्याव्दारे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० निरसित केलेला आहे. या अधिनियमांमध्ये, विकासाच्या गरजा पुरवून, आणि बालकांच्या सर्वोत्तम हितार्थ, प्रकरणांचा निर्णय घेण्यामध्ये व ती निकालात काढण्यामध्ये बाल-स्नेही दृष्टिकोन स्वीकारून त्याव्दारे काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके आणि विधीसंघर्षग्रस्त बालके (CICL) अशा दोन्हींसाठी, आणि या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या विविध संस्थांमार्फत त्यांचे संपूर्ण पुनर्वसन करण्यासाठी तरतूद केलेली आहे.

जे गुन्हे, आत्तापर्यंत अन्य कोणत्याही कायद्याखाली समाविष्ट केलेले नव्हते, असे बालकांविरुद्ध केले जाणारे अनेक नवीन गुन्हे, या अधिनियमांमध्ये समाविष्ट केलेले आहेत. यामध्ये, अवैध दत्तक ग्रहणासह कोणत्याही प्रयोजनासाठी बालकांची विक्री व खरेदी करणे, बाल देखभाल संस्थांमधील शारीरिक शिक्षा, दहशतवादी गटांव्दारे बालकांचा वापर, अपंग बालकांविरुद्धचे गुन्हे आणि बालकांचे अपहरण या गुन्ह्यांचा समावेश होतो.

या अधिनियमात, बाल न्याय मंडळ व बाल कल्याण समिती यांचे अधिकार, कार्य व जबाबदाऱ्या यांमध्ये सुस्पष्ट तरतूद केली आहे. बाल गुन्हेगारांनी केलेल्या अत्यंत गंभीर गुन्ह्यांची प्रकरणे, त्यांची प्रौढ म्हणून न्याय चौकशी करावी किंवा कसे हे निर्धारित करण्यासाठी प्राथमिक मूल्यमापन केल्यानंतर, बाल न्यायालयाकडे (सत्र न्यायालयाकडे) हस्तांतरित करण्याचा पर्याय, बाल न्याय मंडळास दिला आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ याबरोबरच बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २००० च्या कलम २१ खाली देखील महत्वाची तरतूद अंतर्भूत असून त्या अन्वये या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीमध्ये सहभागी विधीसंघर्ष ग्रस्त बालके किंवा काळजी व संरक्षणाची गरज असलेली बालके यांची नावे, इत्यादी प्रसिद्ध करण्यास मनाई केलेली आहे.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमाच्या कलम १०९ नुसार, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाकडे व राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडे या अधिनियमाच्या तरतुदींचे सनियंत्रण व अंमलबजावणी करण्याची कामे सोपविलेली आहेत. ही कामे, उक्त अधिनियमाखालील कामांशिवाय सोपवलेली आहेत.

## बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम,२०१५ खालील प्राधिकरणे

| बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमाखालील विविध स्तरावरील प्राधिकरणे / अभिकरणे / संस्था / कार्याधिकारी | | |
|---|---|---|
| **तपशील** | **ज्या स्तरावर तिची रचना केली आहे तो स्तर** | **त्यांच्या स्थापनेसाठी जबाबदार असलेले प्राधिकरण** |
| **मंडळे** | | |
| केंद्रीय सल्लागार मंडळ | राष्ट्रीय | केंद्रीय महिला व बाल विकास मंत्रालय |
| राज्य सल्लागार मंडळ | राज्य | निवड समितीमार्फत राज्य शासन |
| जिल्हा / शहर सल्लागार मंडळ | जिल्हा | राज्य शासन |
| बाल न्याय मंडळ | जिल्हा | निवड समितीने केलेल्या शिफारशीवरून राज्य शासन |
| **समित्या** | | |
| निवड समिती | राज्य | राज्य शासन |
| निरीक्षण समिती केवळ बालगृहासाठी | राज्य | राज्य शासन |
| निरीक्षण समिती केवळ बालगृहासाठी | जिल्हा | निवड समितीने केलेल्या शिफारशीवरून राज्य शासन |
| बाल कल्याण समिती | जिल्हा | निवड समितीने केलेल्या शिफारशीवरून राज्य शासन |

| | | |
|---|---|---|
| बाल समिती | प्रत्येक संस्थेमध्ये | संस्थेचा प्रभारी अधिकारी |
| व्यवस्थापन समिती | प्रत्येक संस्थेमध्ये | जिल्हा बाल संरक्षण युनिट किंवा जेथे जिल्हा बाल संरक्षण युनिट नसेल तेथे जिल्हा दंडाधिकारी / जिल्हाधिकारी |
| **प्राधिकरणे / युनिटे / संघटना / अभिकरणे (एजन्सी)** | | |
| राज्यस्तरीय सहाय्य सेवा प्राधिकरण | राज्य | राज्य शासन |
| राज्य बाल संरक्षण युनिट (एससीपीयु) | राज्य | राज्य शासन |
| जिल्हा बाल संरक्षण युनिट (डीसीपीयु) | जिल्हा | राज्य शासन |
| विशेष बाल पोलीस युनिट (एसजेपीयु) | जिल्हा | राज्य शासन |
| **गृहे / संस्थात्मक देखभाल सुविधा** | | |
| बालगृहे (सीएनसीपी) | जिल्हा | राज्य शासन |
| निवारागृहे (सीएनसीपी) | जिल्हा | राज्य शासन |
| विशेषीकृत दत्तक अभिकरणे (सीएनसीपी) | जिल्हा | राज्य शासन |
| सेवा संस्था काळजी पश्चात संघटना (सीसीएल +सीएनसीपी) | जिल्हा | राज्य शासन |
| निरीक्षण गृहे (सीसीएल) | जिल्हा | राज्य शासन |
| विशेष गृहे (सीसीएल) | जिल्हा | राज्य शासन |

| | | |
|---|---|---|
| सुरक्षिततेचे ठिकाण (सीसीएल) | जिल्हा | राज्य शासन |
| **कार्याधिकारी** | | |
| मुख्य न्यायदंडाधिकारी | जिल्हा | त्या राज्याचे उच्च न्यायालय |
| परीविक्षा अधिकारी | जिल्हा | राज्य शासन |
| कल्याण अधिकारी | जिल्हा | राज्य शासन |
| बाल कल्याण अधिकारी | प्रत्येक पोलीस ठाण्यामध्ये | पोलीस उपायुक्त/ पोलीस अधिक्षक |
| एस जे पी यु मधील दोन सामाजिक कार्यकर्ते | जिल्हा | राज्य शासन |
| *** टीप: राज्य शासन याचा अर्थ, बाल संरक्षणाशी संबंधित असणारा राज्य शासनाचा संबंधित विभाग, असा आहे. काही राज्यांमध्ये, तो महिला व बाल विकास विभाग असतो तर, अन्य काही राज्यांमध्ये, तो समाज कल्याण / सामाजिक न्याय विभाग असतो.** | | |

बाल न्याय अधिनियमान्वये, काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या बालकांच्या (सीएनसीपी) संबंधात सक्षम प्राधिकरण म्हणून बाल कल्याण समितीची, आणि कायद्याशी संघर्ष करीत असलेल्या (सीसीएल) प्रकरणे निकालात काढण्यासाठी अंतिम प्राधिकरण म्हणून बाल न्याय मंडळाची स्थापना केली आहे.

## केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (CARA):

केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (सीएआरए) ही, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ याच्या कलम ६८ अन्वये गठित केलेली भारत सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालयाची एक वैधानिक संस्था आहे. ती, भारतीय बालकांच्या विकासासाठी नोडल संस्था म्हणून काम करते आणि देशांतर्गत व आंतर-देशीय दत्तक प्रक्रीयेतील संनियंत्रण व विनियमन करणे अनिवार्य करते. केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (सीएआरए) ची, केंद्र शासनाने २००३ मध्ये

पुनरुज्जीवीत केलेल्या हेग अधिवेशनातील आंतर-देशीय दत्तक अभिसंधी, १९९३ च्या तरतुदीनुसार आंतर-देशीय दत्तक संबंधी कार्यवाही करण्यासाठी केंद्रीय प्राधिकरण म्हणून रचना केलेली आहे. केंद्रीय दत्तक संसाधन प्राधिकरण (**CARA**), प्रामुख्याने तिच्या सहयोगी / मान्यता प्राप्त दत्तक अभिकरणांमार्फत (एजन्सी), अनाथ, तिरस्कृत / परित्याग केलेल्या व सोडून दिलेल्या बालकांच्या दत्तक संबंधी कार्यवाही करते.

## ड) लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२

लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ हा, लैंगिक दुर्वर्तन व पिळवणूक यापासून बालकांचे संरक्षण करण्याच्या कायदेशीर तरतुदी बळकट करतो. प्रथमच बालकांविरुद्धच्या लैंगिक गुन्ह्यांच्या समस्येचे निवारण करण्यासाठी एक विशेष कायदा संमत करण्यात आलेला आहे. बालकांच्या लैंगिक शोषणा संबंधी गुन्हे हे, भारतीय दंड संहितेच्या विविध कलमांमध्ये समाविष्ट करण्यात आलेले आहे. भारतीय दंड संहितेमध्ये, बालकांविरुद्धच्या सर्व प्रकारच्या लैंगिक शोषणाविरुद्ध तरतूद नाही आणि त्यामध्ये प्रौढ व बाल पीडित व्यक्ती यांच्यामध्ये वर्गीकरण केलेले नाही.

लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ मध्ये, बालकाची, १८ वर्षे वयाखालील कोणतीही व्यक्ती अशी व्याख्या केलेली आहे आणि बालकांचे लैंगिक छळवणूक, छेडछाड, अश्लीलता, कुकर्म, अत्याचार, बलात्कार, ह्या गुन्ह्यांपासून १८ वर्षे वयाखालील सर्व बालकांचे संरक्षण व्हावे, ह्या उद्देशाने हा विशेष कायदा अस्तित्वात आला आहे.

या अधिनियमामध्ये बालकांविरुद्धचे पाच लैंगिक गुन्हे निश्चित केले आहे - लैंगिक बलात्कार, भेदक लैंगिक शोषण, तीव्र लैंगिक शोषण, लैंगिक अत्याचार, लहान मुलांचा अश्लीलतेसाठी वापर करून घेणे होय. ह्या गुन्ह्यांचे अवप्रेरण अथवा प्रयत्न करणे ही देखील दंडनीय बाब मानली जाते. या अधिनियमाखालील अपराधांची न्यायचौकशी करण्यासाठी विशेष न्यायालय म्हणून प्रत्येक जिल्ह्यामध्ये सत्र न्यायालय स्थापन करण्यासाठी या अधिनियमान्वये शासनास अनिवार्य केले आहे. तथापि, जर एखाद्या जिल्ह्यामध्ये, बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ या खालील बाल न्यायालय किंवा तस्तम प्रयोजनासाठी विशेष न्यायालय अधिसूचित करण्यात आलेले असेल तर, ते न्यायालय या अधिनियमाखालील अपराधांची न्याय चौकशी करेल.

लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ याच्या कलम ४४ आणि लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण नियम, २०१२ याचा नियम ६ अन्वये राष्ट्रीय व राज्य बाल हक्क संरक्षण आयोगांना आणखी पुढील अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत:-

अ) लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ च्या अंमलबजावणीचे सनियंत्रण करणे;

ब) राज्य शासनाने विशेष न्यायालय स्थापन केल्याचे सनियंत्रण करणे;

क) राज्य शासनानी सरकारी अभियोक्त्यांची नियुक्ती केल्याचे सनियंत्रण करणे;

ड) बालकांना सहाय्य करण्यासाठी न्यायचौकशी-पूर्व व न्यायचौकशीच्या टप्प्यावर संलग्न असलेल्या अशासकीय संस्था, व्यावसायिक व तज्ज्ञ किंवा मानसशास्त्र, सामाजिक कार्य, शारीरिक आरोग्य, मानसिक आरोग्य व बाल विकास यांमधील ज्ञान असणाऱ्या व्यक्ती यांचा वापर करण्यासाठी राज्य शासनाद्वारे या अधिनियमाच्या कलम ३९ मध्ये नमूद केलेली मार्गदर्शक तत्वे तयार करण्याचे सनियंत्रण करणे आणि ही मार्गदर्शक तत्वे लागू करण्याचे सनियंत्रण करणे;

इ) या अधिनियमाखालील आपली कामे प्रभावीपणे पार पाडण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांसह पोलीस कर्मचाऱ्यांना व अन्य संबंधित व्यक्तींना स्वतंत्र प्रशिक्षण नियामक तयार करण्याचे व त्याची अंमलबजावणी करण्याचे सनियंत्रण करणे;

फ) या अधिनियमाच्या तरतुदींची, सर्वसामान्य जनता, बालके तसेच त्यांचे माता-पिता व पालक यांच्यामध्ये जाणीव, जागृती व्हावी यादृष्टीने, या अधिनियमाशी संबंधित असणाऱ्या तरतुदींची माहिती, दूरदर्शन, रेडिओ व मुद्रित माध्यम यांसह सर्व माध्यमांमार्फत प्रसारित करण्यासाठी केंद्र शासन व राज्य शासन यांचे सनियंत्रण करणे व त्यांना सहाय्य करणे;

ग) बाल कल्याण समितीच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या बालकाच्या लैंगिक शोषणाच्या कोणत्याही विशिष्ट प्रकरणाबाबत अहवाल मागविणे;

ह) पुढील माहितीसह, लैंगिक दुरुपयोगाची कळविलेली प्रकरणे व या अधिनियमांच्या तरतूदींप्रमाणे प्रस्थापित केलेल्या प्रक्रियेनुसार बालकांच्या लैंगिक शोषणाबाबत नोंदवल्या गेलेल्या प्रकरणांची व त्यांच्या निकालाबाबतची माहिती (Data) आयोग स्वतः अथवा संबंधित प्रतिनिधींमार्फत मागवून त्यामध्ये निम्नलिखित मुद्दयांचा समावेश असेल:-

i. या अधिनियमान्वये नोंदवलेल्या गुन्ह्यांची संख्या व तपशील;

ii. या अधिनियमान्वये व नियमान्वये विहित केलेल्या कार्यपद्धतीचे संबंधित कालमर्यादेत, पालन केले होते किंवा कसे;

लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ याच्या कलम ४४ आणि लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण नियम, २०१२ याचा नियम ६ अन्वये राष्ट्रीय व राज्य बाल हक्क संरक्षण आयोगांना आणखी पुढील अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत:-

अ) लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ च्या अंमलबजावणीचे सनियंत्रण करणे;

ब) राज्य शासनाने विशेष न्यायालय स्थापन केल्याचे सनियंत्रण करणे;

क) राज्य शासनानी सरकारी अभियोक्त्यांची नियुक्ती केल्याचे सनियंत्रण करणे;

ड) बालकांना सहाय्य करण्यासाठी न्यायचौकशी-पूर्व व न्यायचौकशीच्या टप्प्यावर संलग्न असलेल्या अशासकीय संस्था, व्यावसायिक व तज्ज्ञ किंवा मानसशास्त्र, सामाजिक कार्य, शारीरिक आरोग्य, मानसिक आरोग्य व बाल विकास यांमधील ज्ञान असणाऱ्या व्यक्ती यांचा वापर करण्यासाठी राज्य शासनाद्वारे या अधिनियमाच्या कलम ३९ मध्ये नमूद केलेली मार्गदर्शक तत्वे तयार करण्याचे सनियंत्रण करणे आणि ही मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्याचे सनियंत्रण करणे;

इ) या अधिनियमाखालील आपली कामे प्रभावीपणे पार पाडण्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांसह पोलीस कर्मचाऱ्यांना व अन्य संबंधित व्यक्तींना स्वतंत्र प्रशिक्षण नियामक तयार करण्याचे व त्याची अंमलबजावणी करण्याचे सनियंत्रण करणे;

फ) या अधिनियमाच्या तरतुदींची, सर्वसामान्य जनता, बालके तसेच त्यांचे माता-पिता व पालक यांच्यामध्ये जाणीव, जागृती व्हावी याद्दृष्टीने, या अधिनियमाशी संबंधित असणाऱ्या तरतुदींची माहिती, दूरदर्शन, रेडिओ व मुद्रित माध्यम यांसह सर्व माध्यमांमार्फत प्रसारित करण्यासाठी केंद्र शासन व राज्य शासन यांचे सनियंत्रण करणे व त्यांना सहाय्य करणे;

ग) बाल कल्याण समितीच्या अधिकारक्षेत्रात येणाऱ्या बालकाच्या लैंगिक शोषणाच्या कोणत्याही विशिष्ट प्रकरणाबाबत अहवाल मागविणे;

ह) पुढील माहितीसह, लैंगिक दुरुपयोगाची कळविलेली प्रकरणे व या अधिनियमांच्या तरतूदींप्रमाणे प्रस्थापित केलेल्या प्रक्रियेनुसार बालकांच्या लैंगिक शोषणाबाबत नोंदवल्या गेलेल्या प्रकरणांची व त्यांच्या निकालाबाबतची माहिती (Data) आयोग स्वतः अथवा संबंधित प्रतिनिधींमार्फत मागवून त्यामध्ये निम्नलिखित मुद्द्यांचा समावेश असेल:-

i. या अधिनियमान्वये नोंदवलेल्या गुन्ह्यांची संख्या व तपशील;

ii. या अधिनियमान्वये व नियमान्वये विहित केलेल्या कार्यपद्धतीचे संबंधित कालमर्यादेत, पालन केले होते किंवा कसे;

iii. आकस्मिक वैद्यकीय शुश्रूषा व वैद्यकीय तपासणी यांची व्यवस्था करण्यासह, या अधिनियमाखालील गुन्ह्यांच्या बळी पडलेल्या व्यक्तींची शुश्रूषा व संरक्षण व्यवस्थांचा तपशील;

iv. कोणत्याही विशिष्ट प्रकरणी, संबंधित बाल कल्याण समितीने, एखाद्या बालकांची काळजी व संरक्षण करण्याच्या गरजेचे मूल्यांकन करण्यासंबंधीचा तपशील.

क्ष) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अंमलबजावणीचे मूल्यांकन करणे आणि आपल्या वार्षिक अहवालातील एक स्वतंत्र प्रकरणांमध्ये सदर विषयावर अहवाल संसदेला सादर करणे.

## लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ याखालील प्रमुख प्राधिकरणे :

| | |
|---|---|
| **पोलीस/ विशेष बाल पोलिस युनिट** | • माहिती नोंदवणे<br>• प्राथमिक मूल्यांकन<br>• २४ तासांच्या आत प्रकरणची नोंद करणे<br>• आवश्यक असल्यास, २४ तासांच्या आत बाल कल्याण समितीसमोर सादर करणे<br>• बालकाच्या वैद्यकीय गरजेकडे लक्ष देणे<br>• माता-पित्यांना / पालकांना माहिती देणे |
| **बाल कल्याण समिती** | • आवश्यक असल्यास, बालकास बालगृहात वगैरे दाखल करणे<br>• सहाय्यक व्यक्ती उपलब्ध करून देणे |
| **जिल्हा बाल संरक्षण युनिट** | • नोंदवही ठेवणे व ती अधिकारी यांना उपलब्ध करून देणे<br>• दुभाषिकांच्या/ अनुवादकाच्या सेवेसाठी रक्कम प्रदान करणे |
| **न्याय दंडाधिकारी** | • जबाब नोंदवणे |
| **विशेष न्यायालय/ न्यायाधीश** | • इन कॅमेरा न्याय चौकशी करणे<br>• बालस्नेही वातावरण सुनिश्चित करणे<br>• बालकाचा स्वाभिमान जपणे<br>• बालकाची गोपनीयता राखणे (नाव उघड न करणे)<br>• बालकाचा साक्षपुरावा ३० दिवसांच्या आत नोंदविणे<br>• १ वर्षाच्या आत न्यायचौकशी पूर्ण करणे |

| | |
|---|---|
| **विशेष सरकारी अभियोक्ता** | • प्रकरणांचा अभियोग, केवळ या अधिनियमाखाली चालविणे |
| **सहाय्यभूत व्यक्ती** | • गोपनीयता राखणे<br>• माता-पित्यांना / पालकांना माहिती देणे<br>• न्यायिक प्रक्रियेतील त्याची/ तिची भूमिका बालकाला समजावून सांगणे |
| **केंद्र शासन** | • अधिनियमास प्रसिद्धी देणे<br>• अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे<br>• नियम व मार्गदर्शक सूचना तयार करणे<br>• या अधिनियमांच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना ज्या अडचणी उद्‌भवतील त्या अडचणी दूर करण्यासाठी या अधिनियमाच्या प्रारंभापासून दोन वर्षांच्या आत, म्हणजेच १३ नोव्हेंबर,२०१४ च्या आत आदेश पारित करणे |
| **राज्य शासन** | • विशेष न्यायालय म्हणून एखाद्या न्यायालयास पदनिर्देशित करणे<br>• विशेष सरकारी अभियोक्त्याची नियुक्ती करणे<br>• अधिनियमास प्रसिद्धी देणे<br>• अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे<br>• नियम व मार्गदर्शक सूचना तयार करणे |
| **राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग व राज्य बाल हक्क संरक्षण आयोग** | • अधिनियमाच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे<br>• विशिष्ट प्रकरणांबाबत बाल कल्याण समितीकडून अहवाल मागवणे<br>• आपल्या वार्षिक अहवालातील स्वतंत्र प्रकरणाव्दारे अधिनियमाच्या अंमलबजावणीबाबत अहवाल सादर करणे |

# आयोगाचे मा. अध्यक्ष व सदस्य यांनी केलेली कार्ये

## १. काही पाऊले सुकन्यांसाठी

महाराष्ट्रातील मुलींना त्यांचे हक्क, समान वागणूक, विकास व इतर संबंधित विषयांबाबत महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगामार्फत पुढाकार व प्रयत्न सातत्याने करण्यात येतात. मुलींच्या सर्वांगिण विकासाकरीता पुढील कार्यक्रमांत सहभाग व पुढाकार आयोगामार्फत घेण्यात आला.

- बेटी बचाओ चळवळ
- बाल विवाह प्रतिबंध कायदा
- स्त्री भ्रुण हत्या प्रतिबंध कायदा
- सॅनिटरी नॅपकीन वाटप कार्यक्रम

### • बेटी बचाओ चळवळ

i) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, दलित महिला विकास मंडळ, सातारा लेक लाडकी अभियान, गर्ल्स काऊंट व यू.एन. वूमन ऑर्गनायझेशन यांचे संयुक्त विदयमाने "बेटी बचाओ बेटी पढाओ अंतर्गत क्षेत्रीय सशक्तीकरण मध्यस्थी" या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. सदर चर्चासत्रास आरोग्य व कुटुंब कल्याण विभागाचे प्रतिनिधी, महिला व बालविकास विभाग, विधी व न्याय विभाग आणि नागरी समाज संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सदर चर्चासत्राचे आयोजन सहयाद्री अतिथीगृह, मलबार हिल, मुंबई येथे दि.९ जून, २०१८ रोजी आयोजित करण्यात आले.

सदर चर्चासत्राचा उद्देश हा जिल्हास्तरीय प्राधिकृत प्राधिकरणे (DAA), महानगर पालिकांचे आरोग्य अधिकारी व बेटी बचाओ बेटी पढाओ कार्यक्रमांतर्गत नोडल अधिकारी तसेच नागरी समाज संस्था यांना एकत्र आणून "बेटी बचाओ बेटी पढाओ कार्यक्रमाचे विस्तारीकरण करणे व बेटी बचाओ बेटी पढाओ कार्यक्रमांतर्गत जिल्हा कृतीदलाचे सशक्तीकरण व भविष्यातील धोरणात्मक बाबींची सुधारणा" या विषयावर एकत्रित चर्चा करणे असा होता.

ii) डॉ. शालिनी कराड, सदस्य यांनी बालिका दिनानिमित्ताने ज्ञान बोधिनी शाळा, कृष्णानगर, परळी येथील मुलींना व त्यांच्या पालकांना 'बेटी बचाव बेटी पढाओ' चा संदेश देत त्यांच्याशी हितगुज साधले.



iii) 'लेक वाचवा' अभियानाला प्रा. अस्मा शेख (पटेल), सदस्य प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथे उपस्थित होत्या. स्त्री पुरुष जन्मदर पाहता अशा स्वरूपाचे अभियान होणे गरजेचे आहे, असे मत त्यांनी नोंदवले.



- **<u>बाल विवाह प्रतिबंध कायदा</u>**

डॉ. वासंती देशपांडे, सदस्य, यांनी दि.११ डिसेंबर, २०१८ रोजी बाल विवाह प्रतिबंधाकरिता कार्यरत यंत्रणांसाठी नागपूर विभागीय कार्यशाळेत आयोगाची भूमिका मांडली. तसेच मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेचे आयोजन महिला व बाल विकास विभाग व युनिसेफ यांचे संयुक्त विद्‌यमाने नागपूर येथे आयोजित करण्यात आले.





- <u>**स्त्री भ्रुण हत्या प्रतिबंध कायदा**</u>

अॅड. स्वरदा केळकर, सदस्य यांनी “सेव बेबी गर्ल चाईल्ड अवेअरनेस” कार्यक्रमात सहभाग घेऊन न्यायिक बाबींवर मार्गदर्शन केले.




- <u>**सॅनिटरी नॅपकीन वाटप कार्यक्रम**</u>

अॅड. स्वरदा केळकर, सदस्य यांनी सॅनिटरी नॅपकीन वाटप कार्यक्रमात सहभागी होऊन उपस्थितांना मार्गदर्शन केले.





## २. पोषण आहार योजना

आयोगाच्या सदस्या डॉ. शालिनी कराड, यांनी सप्टेंबर, २०१८ मध्ये एकात्मिक बालविकास सेवा योजना अंतर्गत पोषण अभियान कार्यक्रमात आयोगाची भूमिका मांडली व आरोग्य विषयक माहिती दिली.



एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालय, परळी येथे आयोजित कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या डॉ.शालिनी कराड उपस्थित होत्या. "बुध्दिमत्ता टिकविण्यासाठी विद्यार्थ्यांना सकस आहाराची गरज" या विषयावर डॉ. शालिनी कराड यांनी पुढीलप्रमाणे विचार मार्गदर्शन केले.

अभ्यास करून बुध्दिमत्ता वाढते. ही बुध्दिमत्ता टिकविण्यासाठी विद्यार्थ्यांना सकस आहाराची गरज आहे. प्रत्येक विद्यार्थ्यांनी सकस आहार घेऊन आरोग्य सुदृढ ठेवावे, असे प्रतिपादन राज्य बाल हक्क आयोगाच्या सदस्या डॉ.शालिनी कराड यांनी केले. महाराष्ट्र शासनाच्या पोषण अभियान उपक्रमांतर्गत दि.५ सप्टेंबर रोजी एकात्मिक बालविकास सेवा योजना विभागाच्या वतीने विशेष कार्यक्रम परळी येथे संपन्न झाला. 'पोषण उत्सव घरोघरी....' हे या अभियानाचे ब्रीद आहे. परळीत संपन्न झालेल्या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र राज्य बाल हक्क आयोगाच्या सदस्या डॉ.शालिनी कराड, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. या कार्यक्रमात बोलतांना आयोगाच्या सदस्या डॉ.शालिनी कराड यांनी असे सांगितले की, बालक हे भविष्यातील भारताचे आधारस्तंभ आहेत. त्यांची वाढ योग्य आहार-विहार आणि योग्य संस्कारांनी झाली पाहीजे. दैनंदिन जीवनात आहाराला खूप महत्त्व असून, शरिराचे योग्य पोषण बालवयातच झाले तर मोठे होत असतांना त्यांच्यातील आत्मविश्वास आणि आरोग्य उत्तम राहते. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने आंगणवाडी सेविकांची उपस्थिती होती. महाराष्ट्र शासनाच्या वतीने हे अभियान राज्यभरात राबविले जात आहे. याच अभियानाचा एक भाग म्हणून परळीमध्ये पोषण अभियान घेण्यात आले.

## ३. राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग व रेल्वे प्रशासन सोबत बाल हक्क जनजागृती विषयक कार्यक्रम

राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग व रेल्वे प्रशासनासोबत बाल हक्क जनजागृती विषयक कार्यक्रमात दि.३१ ऑगस्ट, २०१८ रोजी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे मा.अध्यक्ष श्री. प्रविण घुगे व मा.सदस्य श्री. विजय जाधव व श्री.संतोष शिंदे तसेच आयोगाच्या मा. सचिव श्रीमती सीमा व्यास, भा.प्र.से. यांनी भाग घेतला. या कार्यक्रमात राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाच्या मा.सदस्या श्रीम. रुपा कपूर व अधिकारी उपस्थित होते. रेल्वे प्रशासनातील जनरल मॅनेजर, सेंट्रल रेल्वे; जनरल मॅनेजर, वेर्स्टन रेल्वे, विभागीय रेल्वे मॅनेजर, सेंट्रल रेल्वे व इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सदर कार्यक्रमाचा मुख्य उद्देश रेल्वे विभाग व महिला व बाल विकास विभाग यांचेमधील 'स्टँण्डर्ड ऑपरेटीव्ह प्रोसिजर' यांची प्रभावी अंमलबजावणी करणे व रेल्वेच्या संपर्कात येणा-या बालकांचे संरक्षण करणे हा होता.




## ४. अल्पसंख्यांक बालकांसाठी आयोग

### i) अल्पसंख्यांक समुदायातील मुलांसाठी शिक्षण अधिकार अंतर्गत पुणे येथील चर्चासत्र

या कार्यक्रमाच्या वेळी महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या प्रा. अस्मा शेख (पटेल) सदस्य, श्रीम. सीमा व्यास, भा.प्र.से., सचिव व श्री.प्र.मा.बाडगी, विधी सल्लागार हे उपस्थित होते. तसेच जमियते उलेमा ए हिंद चे अध्यक्ष मौलाना अब्दुल रशिद साहेब, AIMIM चे विधानसभेचे उमेदवार झहीद भाई, इंडियन मुस्लिम फ्रंटचे मुन्नावर कुरेशी, पुणे शहर काझी मौलाना मुफ्ती

शाहिद जनाब, शिक्षण प्रमुख हरून अत्तार, मौलाना इरफान बागवान व पुण्यातील मदरस्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.




ii) मदरसा दारुल उलूम राशिदीया येथे महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या प्रा. अस्मा शेख (पटेल), सदस्य यांनी सदिच्छा भेट दिली. तेथील विद्यार्थी तसेच शिक्षक व्यवस्थापन समिती यांच्याशी संवाद साधला. त्यावेळी उपस्थित मौलाना उमेर बागवान, मुफ्ती शाहिद साहेब व इतर मान्यवर.



iii) पुण्यातील जमीला आरिफ संस्थेतील गरजू गुणवत्ताधारक विद्यार्थिनीस परीक्षेतील उज्ज्वल यशाकरीता जिल्हा महिला बाल विकास तर्फे कौतुक करण्यात आले. त्यावेळेस महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या प्रा. अस्मा शेख, सदस्य उपस्थित होत्या.



## ५. बाल महोत्सव

i) डॉ. वासंती देशपांडे, आयोगाच्या सदस्य या विभागीय चाचा नेहरू बाल महोत्सव, नागपूर येथे दि.३०/०१/२०१९ रोजी उपस्थित होत्या. यावेळी त्यांनी बालकांना आणि उपस्थितांना मार्गदर्शन केले.




ii) परभणी येथील बाल महोत्सवा निमित्त प्रमुख उद्घाटक म्हणून डॉ.शालिनी कराड, सदस्य उपस्थित होत्या. तेथील बालगृहातील मुलांनी त्यांचे विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले, कुटुंबापासून दूर असलेल्या या चिमुकल्या मुलांच्या कलागुणांना या महोत्सवामध्ये वाव मिळाला आणि त्यांच्या आनंदाला उधाण आले. यावेळी डॉ. शालिनी कराड, सदस्य यांनी मुलांचे भरभरुन कौतुक करीत मार्गदर्शन केले.






iii) जिल्हा महिला व बाल विकास विभागाच्या वतीने पुणे येथे “बाल मेळावा” आयोजित करण्यात आला. त्या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.अस्मा शेख (पटेल), सदस्य उपस्थित होत्या. सदर मेळाव्यात डॉ. यशोद, भा.प्र.से., आयुक्त महिला व बाल विकास, श्री. रवी पाटील, उपआयुक्त व विभागीय आयुक्त तसेच श्रीमती अश्विनी कांबळे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आणि

विभागाचे सर्व अधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी अश्या प्रकारचे मेळावे होणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन प्रा. अस्मा शेख यांनी केले. यातून मुलांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळतो. आयुष्याकडे खिलाडू वृत्तीने पाहण्याचा दृष्टिकोन निर्माण होतो, असेही त्यांनी याप्रसंगी नमूद केले.



६. **<u>भेटीगाठी बालकांसाठी</u>**

i. 'SOS Children Village, pune' या प्रथितयश संस्थेच्या 'SOS Day' निमित्त आयोजित विविध उपक्रमांना कार्यक्रम अध्यक्ष म्हणून आयोगाच्या सदस्या प्रा. अस्मा शेख (पटेल) उपस्थित होत्या. सदर वेळी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, CWC सदस्य, पत्रकार व संस्थेचे सर्व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. या उपक्रमामध्ये प्रा. अस्मा शेख यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.




ii. बाल हक्क संरक्षण आयोगाच्या सदस्या प्रा. अस्मा शेख (पटेल) व सदस्य श्री. विजय जाधव यांनी 'ससून हस्पिटल' पुणे येथील सोफोश संस्थेला सदिच्छा भेट दिली आणि तेथील कार्यपद्धती जाणून घेतली.



iii. समतोल फाऊंडेशनच्या मतपरिवर्तन केंद्राला आयोगाच्या सदस्या डॉ. वृषाली देशपांडे व सदस्य श्री. विजय जाधव यांनी भेट दिली.



iv. विनायकराव देशमुख शाळा, नागपूर येथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. वृषाली देशपांडे



v. आयोगाचे अध्यक्ष श्री. प्रविण घुगे यांची उस्मानाबाद येथील वेगळया प्रकारे सक्षम मुलींचे बालगृह (शाळा) येथे भेट दिली.




vi. <u>स्नेहालय येथे आयोगाचे अध्यक्ष श्री. प्रविण घुगे यांची भेट.</u>





vii) आयोगाचे सदस्य श्री. विजय जाधव यांनी दि.२० जुलै २०१८ रोजी

१) उल्हासनगर मुलांचे बालगृह, २) उल्हासनगर मुलींचे निरीक्षण गृह, ३) अंबरनाथ नीला बाल सदन बालगृह (अशासकीय) येथे बालगृह पाहणी व तपासणी केली.

उपरोक्त नमूद ठिकाणी आढळून आलेले मुद्दे व त्याबाबत करण्यात आलेले मार्गदर्शन

**उल्हासनगर मुलांचे बालगृह**

- उल्हासनगर कनिष्ठ / वरिष्ठ मुलांच्या बालगृहातील अधिक्षिका यांनी बाल कल्याण समितीला बालकांच्या संबंधित पूर्णपणे माहिती व काही महत्त्वाची रजिस्टर याबद्दल माहिती दिली नाही, असे आढळून आले. याबाबत महिला व बाल विकास विभाग व बाल कल्याण समिति यांचेमध्ये समन्वयाची आवश्यकता असल्याचे सांगितले.
- गेट रजिस्टर व स्टाफ रजिस्टर हे एकच होते असे आढळून आले. याबाबत महिला व बाल विकास विभागाचे नियम पाळण्यात यावे, असे सांगण्यात आले.
- अनाथ मुलांच्या संकल्पनेबाबत अधिक्षिका यांना विशेष माहिती नसल्याचे निदर्शनास आले. अनाथ बालकांच्या काळजीबाबत कर्मचा-यांना प्रशिक्षणाची आवश्यकता असल्याचे श्री. जाधव, सदस्य यांनी यावेळेस निदर्शनास आणून दिले.
- बालगृहातील कायम वास्तव्याला असणाऱ्या मुलांची संख्या २८ आहे (काळजी व संरक्षणांतर्गत) जी मागील ७ ते ८ वर्षापासून राहत आहेत.
- वरिष्ठ बालगृहातील एकूण मुलांची संख्या १३ आहे (काळजी व संरक्षणांतर्गत) १३ पैकी ६ जणाचे कागदपत्र आहेत, ७ जणाचे नाहीत असे आढळून आले. याबाबत प्रत्येक बालकांचे कागदपत्र सुव्यवस्थित व परिपूर्ण राखणे आवश्यक आहे.
- बालकाच्या पुनर्वसनाबाबत जबाबदारीने काम केले पाहिजे, असे मत श्री. जाधव, सदस्य यांनी नोंदविले.

**उल्हासनगर मुलींचे निरीक्षण गृह**

- निरीक्षण गृहात एकूण ८ मुली आहेत. बालगृहातील मुलींशी चर्चा केली असता एकूणच बालगृहातील मुलींचे आरोग्य, शिक्षण, अडचणी, समुपदेशन, मार्गदर्शन आणि त्यांचे पुनर्वसन या बाबतीत त्या ठिकाणी असणाऱ्या जबाबदार व्यक्तीमध्ये शिस्त आढळून आली.

**निला बाल सदन बालगृह (अशासकीय) क्षमता-१० - वयोगट ६ ते १२**

- काळजी व संरक्षणांतर्गत दाखल मुलींची संख्या ८ आहे. मुलींशी चर्चा केली असता मुली खूप आनंदी दिसून आल्या. त्यांचे शिक्षण, अडचणी, मार्गदर्शन, समुपदेशन याबाबतील काम करणाऱ्या व्यक्ती जबाबदारीने कार्य करतात असे आढळून आले.
- १२ वर्ष पूर्ण झाल्यानंतर मुलींना पुन्हा बाल कल्याण समितीपुढे सादर केले जाते, तसेच त्या मुलीचा सतत पाठपुरावा केला जातो असे निदर्शनास आले.

viii) दि. २ ऑगस्ट २०१८ रोजी आयोगाचे सदस्य श्री. विजय जाधव यांनी उल्हासनगर येथील शासकीय अपंग बालगृहास भेट दिली व तेथील पाहणी केली.

ix) आयोगाचे सदस्य श्री. विजय जाधव यांनी दि. २३ ऑगस्ट २०१८ रोजी जळगाव जिल्हा येथील बालगृहास भेट देऊन बालगृहाची तपासणी केली.

x) दि.२५/९/२०१८ रोजी बालगृह उल्हासनगर नं.५ येथे तपासणी दौरा व बाल न्याय अधिनियम २०१५ वर चर्चा माहितीसत्र घेण्यात आले. या सत्रामध्ये बाल हक्क संरक्षण आयोग महाराष्ट्र राज्याचे सचिव श्रीम.सीमा व्यास व सदस्य - श्री.विजय जाधव उपस्थित होते. जिल्हा महिला बाल विकास विभाग अधिकारी - संजय खंडागळे, बालगृह अधिक्षिका - ठाकरे मॅडम, जिल्हा डेप्युटी कलेक्टर - कोष्टी सर व इतर सर्व पदाधिकारी उपस्थित होते. शिवाय इतर बऱ्याच स्वयंसेवी संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

xi) दि.१/१०/२०१८ रोजी आयोगाचे सदस्य श्री. विजय जाधव यांनी मुरबाड तालुक्यातील व ठाणे जिल्ह्यातील नवजीवन सेंटर येथे भेट दिली असता, सदरची संस्था कामाठीपुरा येथील देह विक्री करणाऱ्या महिलांची बालके या संस्थेमध्ये आलेली असतात. संस्थेचे आवार खूप मोठे असून १२० मुले आहेत अशी माहिती मिळाली. त्यामध्ये ६७ मुली आहेत. या संस्थेमध्ये घर ही संकल्पना राबविली जाते.

xii) दि.१२ नोव्हेंबर २०१८ रोजी आयोगाचे सदस्य श्री. विजय जाधव यांनी जिल्हा अकोला येथे भेट दिली. शासकीय बालगृहाची पाहणी व तपासणी करण्यात आली. बालगृह अधिक्षक जाधव, बाल कल्याण समिती अध्यक्ष व सदस्य, बाल न्याय मंडळ सदस्य उपस्थित होते.

**<u>आयोगाच्या सदस्या डॉ. शालिनी कराड यांनी ज्ञानबोधिनी, प्राथमिक विदयालय येथील सांस्कृतिक कार्यक्रमास भेट दिली.</u>**



**<u>आयोगाचे अध्यक्ष श्री. प्रविण घुगे यांनी बालकांच्या संस्थेस भेट देऊन बालकांशी हितगुज केली.</u>**



## ७. आयोगाने घेतलेल्या बैठका

➢ **POCSO संदर्भातील बैठका**

**ठाणे येथील बैठक**



१) दि. २१ जुलै २०१८ रोजी ठाणे येथे राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व समतोल फाउंडेशन यांचे संयुक्त विदयमाने आयोजित विद्यार्थी सुरक्षितता कार्यशाळा आयोजित करण्यात आली. यावेळेस ठाण्यातील ३०० मुख्याध्यापकांनी सक्रिय सहभाग घेतला. दि. २ जून २०१८ च्या शासन निर्णयावर आधारित विद्यार्थ्यांची सुरक्षितता याबाबत बाल हक्क संरक्षण आयोग, समतोल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आणि उर्मिला पारधे, शिक्षणाधिकारी, ठाणे यांच्या सहकार्याने ठाण्यातील ३०० मुख्याध्यापकांसाठी वसंत विहार हायस्कूल येथे कार्यशाळा घेण्यात आली.

मुलांची सुरक्षितता, बाल न्याय अधिनियम आणि लैंगिक गुन्ह्यांपासून बालकांचे संरक्षण या विषयी या कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले. शाळेची संपूर्ण जबाबदारी मुख्याध्यापकांची असल्याने या विषयीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. यासाठी बाल हक्क आयोगाचे अध्यक्ष मा. श्री. प्रविण घुगे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्य श्री. विजय जाधव, श्री. संतोष शिंदे, श्री. विकास रेपाळे, सभापती, शिक्षण विभाग, ठाणे महानगर पालिका, श्री. संजयजी खंडागळे, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी श्री. पाटोळे, आयुक्त समाजविकास विभाग, श्री. दयानंदजी गुंडप, अधिकारी, समाज विकास विभाग, गट प्रमुख संगीता बामणे, श्री. हरिहरन, कार्यकारिणी सदस्य, समतोल फाउंडेशन इत्यादी मान्यवर उपस्थित होते. बालकांचे हक्क, शालेय सुरक्षितता, बालकांचे कायदे या विषयी सौ. आरती नेमाणे, समन्वयिका, समतोल फाउंडेशन यांनी दृकश्राव्य माध्यमातून सादरीकरण केले.

## पुणे येथील बैठक

२) यु एस के ग्रॅव्हीटस फाउंडेशन आयोजित "गुड टच बॅड टच" या विषयावरील जाणीव जागृतीपर कार्यक्रमास दि. ६ मार्च, २०१९ रोजी आयोगाचे अध्यक्ष श्री. प्रविण घुगे व सदस्या प्रा. अस्मा शेख उपस्थित होते.





# गुड टच, बॅड टच उपक्रम राज्यभर राबविणार

पिंपरी : 'बाललैंगिक अत्याचार थांबवण्यासाठी मुलांना स्पर्शज्ञान असणे महत्त्वाचे आहे. ग्रॅव्हिटस (युएसके) फाउंडेशनने सुरु केलेला 'गुड टच, बॅड टच' उपक्रम अतिशय उपयुक्त आहे. मुलांना चांगल्या-वाईट स्पर्शाचे ज्ञान देऊन होणाऱ्या अन्यायाविरोधात मोकळेपणाने बोलता यावे व त्यांच्यात निर्भयता यावी, याकरिता 'गुड टच, बॅड टच' हा उपक्रम राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात राबविण्यासाठी प्रयत्नशील आहे,' असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य बाल हक्क आयोगाचे अध्यक्ष प्रवीण घुगे यांनी केले.

ग्रॅव्हिटस (यूएसके) फाउंडेशन आणि रिफ्लेक्शन कौन्सिलिंग सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने लांडेवाडी (भोसरी) येथील महात्मा फुले माध्यमिक विद्यालयात शालेय मुलामुलींसाठी आयोजिलेल्या 'गुड टच, बॅड टच' या जाणीव जागृती उपक्रमावेळी प्रवीण घुगे बोलत होते.

याप्रसंगी ग्रॅव्हिटस (यूएसके) फाउंडेशनच्या अध्यक्षा उषा काकडे, बालहक्क आयोगाच्या सदस्या आसमा शेख, महात्मा फुले शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नीलकंठ लोंढे, सचिव अनिल लोंढे, मुख्याध्यापिका माळी मॅडम, रिफ्लेक्शन सेंटरच्या आशा खेडकर यांच्यासह विविध शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रवीण घुगे म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी स्वतःची काळजी कशी घ्यावी, चांगला-वाईट स्पर्श कसा ओळखावा तसेच आपल्यावर अतिप्रसंग झाल्यास त्याला प्रत्युत्तर कसे द्यावे, याविषयी अतिशय सहजतेने या उपक्रमातून जागृती केली जात आहे. अलीकडच्या काळात मोबाईल, इंटरनेटचा वापर लहान वयातील मुलेही करत आहेत. परंतु, त्याचा वापर विधायक गोष्टींसाठी करावा. पालकांनी मुलांचे चांगले मित्र बनून त्यांच्याशी मोकळेपणाने बोलावे. मुलांतील अबोला दूर करण्यासाठी शिक्षक-पालकांनी विद्यार्थ्यांना आपलेपणाची भावना द्यावी.'

उषा काकडे म्हणाल्या, 'मुलामुलींनी चांगला वाईट स्पर्श ओळखून वेळीच त्यावर बोलले पाहिजे. जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार, ७३ कोटी मुले, तर १५० कोटी मुली लैंगिक अत्याचाराला बळी पडल्याचे समोर आले आहे. नात्यातील, ओळखीच्या व्यक्तीकडून असे प्रकार होतात. मुले आणि पालक यांच्यातील संवाद वाढल्यास अशा घटनांना आळा बसेल. हा संवाद वाढविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम चालू केला आहे. गेल्या दीड वर्षात पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील सरकारी व खासगी ६५० शाळांतील तीन लाखापेक्षा अधिक विद्यार्थ्यांपर्यंत हा उपक्रम पोहोचवल्याचे समाधान आहे.'

शिक्षक, विद्यार्थी आणि पालकांनीही या उपक्रमाचा फायदा झाला असून, चुकीच्या गोष्टी समजल्या. मुले बोलती झाली, असे अभिप्राय दिले. लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी चाईल्ड हेल्पलाईन नं १०९८ असल्याची माहिती मुलांमध्ये पोहोचली आहे. शिक्षक-विद्यार्थी-पालक यांच्यात संवाद वाढला

Pg 06

Kesari

Pune edition, Mar 12, 2019

450+ Newspapers | 18 Languages

Download paperboy

paperboy

३) **दि. २७/६/२०१८ रोजी विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे यांच्या कार्यालयात बालकांच्या कायदयांबाबत बैठक**

विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे येथे दि. २७/६/२०१८ रोजी झालेल्या बैठकीत आयोगाचे सदस्य श्री.विजय जाधव व प्रा. अस्मा शेख तसेच शिक्षण उपसंचालक अधिकारी - मिनाक्षी राउत, जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण अधिकारी - अरुण हातालकर, मोफत व सक्तीच्या शिक्षण कायदा

२००९ काम पाहणारे - श्रीमती जोशी, शिक्षणाधिकारी पिंपरी चिंचवड - जोत्सना शिंदे व म.न.पा आर.टी.ई. विषयी काम बघणारे श्री. परदेशी हे उपस्थित होते. यावेळी शिक्षण उपसंचालकांनी शाळेतील शिक्षकांबरोबर व मुख्याध्यापकांबरोबर याविषयी चर्चासत्रे लावणे, आरटीई ॲडमिशन राऊंड सुरु ठेवणे आणि तीन किलोमीटरच्या आतील मुलांचे प्रवेश करून घेणे असा निर्णय घेण्यात आला.

४) दि.२७/६/२०१८ - दुसरी बैठक सोफोश संस्थेच्या हॉलमध्ये दुपारी ३ वाजता सुरु झाली, सदर बैठकीस महिला बालकल्याण विकास विभाग, बालगृह अधिक्षक / अधिक्षिका, नवनिर्वाचित बालकल्याण समिती १ व २ व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी श्रीमती अश्विनी कांबळे व इतर पदाधिकारी कर्मचारी मिळुन ६० च्या आसपास संख्या होती.

सदर बैठकीला आलेल्या व्यक्तींनी संस्थेचे नाव व कार्याची माहिती प्रत्येकाने दिली. सीडब्लूसी क्रमांक १ मधील सदस्य ॲड सावरकर यांनी जिल्हा महिला बालविकास विभाग यांच्याकडून मिळत नसलेल्या सुविधाविषयी नाराजी व्यक्त केली.

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ व पोस्को अधिनियम २०१२ याबाबतीत पुणे जिल्हा बालगृहातील कर्मचारी व अधिकारी यांच्याबरोबर चर्चा सत्र लावणे, मुलांशी संबंधित असणाऱ्या यंत्रणा, पोलीस, हॉस्पिटल यांच्याबरोबर सत्र राबविणे, अशा सूचना देण्यात आल्या.

५) आयोगाच्या सदस्या प्रा. अस्मा शेख यांनी शिक्षण संचालक महाराष्ट्र (प्राथमिक) श्री. गंगाधर म्हमाणे. तसेच सहसंचालक श्री. टेमकर यांना भेट दिली. त्यांच्यासोबत पुढील विषयांवर चर्चा झाली.

i) सर्व जिल्ह्यातील शिक्षण प्रमुख यांनी R.T.E. च्या माध्यमातून काळजीपूर्वक सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश मिळण्याकरिता प्रयत्नशील राहावे अशी सूचना केली.

ii) कायद्याचे पालन न करणाऱ्या शाळांवर कायदेशीर कारवाई, त्याचप्रमाणे मदरसा यांना यु डायस नंबर कशा प्रकारे देता येऊ शकतो याबाबतच्या शक्यता पडताळणे.

iii) शाळांमध्ये चालणारी लसीकरण मोहीम अजून यशस्वी होण्याकरिता प्रयत्नशील रहाणे इ. सूचना करण्यात आल्या.





६) श्री. प्रविण घुगे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनी दि.२७ जुलै, २०१८ रोजी नवी दिल्ली, भारत येथे NRI Marriages and Trafficking of Women and Children: Issues and Way Forward या विषयावरील राष्ट्रीय कॉन्फरन्स मध्ये भाग घेतला.




७) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे श्री. प्रविण घुगे, अध्यक्ष, श्री. संतोष शिंदे, सदस्य व श्रीम. सीमा व्यास, भा.प्र.से., सचिव यांनी दि. २८ जुलै, २०१८ रोजी 'Safety and Security of Children' या विषयावरील राष्ट्रीय कार्यशाळेत भाग घेतला.






८) रक्षा अभियान

रक्षा अभियान उद्‌घाटन समारंभ दि.१२ सप्टेंबर २०१८ रोजी बाल हक्क संरक्षण आयोग आणि समतोल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्‌यमाने एस.एन.डी.टी, पाटकर सभागृह, चर्चगेट येथे बालकांच्या सुरक्षिततेसाठी रक्षा अभियान उद्‌घाटन कार्यक्रम संपन्न झाला.






रक्षा अभियानाचे उद्‌घाटन प्रमुख अतिथी श्री.विनोदजी तावडे, मा. मंत्री-शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. शशिकला वंजारी कुलगुरू, एस.एन. डी. टी विद्‌यापीठ, श्री. हरीहरन विश्वस्त, समतोल फाउंडेशन, श्री. प्रवीण घुगे, अध्यक्ष बाल हक्क संरक्षण आयोग, श्री. विजय जाधव, श्री. संतोष शिंदे, डॉ. वासंती देशपांडे, डॉ.शालिनी कराड, सदस्य, बाल हक्क संरक्षण आयोग, सचिव- श्रीम.सीमा व्यास, भा.प्र.से. आणि मुंबई जिल्ह्यातील ६५० मुख्याध्यापक, शिक्षक आदी मान्यवर उपस्थित होते.

दि.२ जुन २०१८ च्या शासन निर्णयावर ठोस अंमलबजावणी करून मुलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी शिक्षक व मुख्याध्यापक यांनी गांभीर्याने घ्यावी, यासाठी बाल हक्क संरक्षण आयोग व समतोल फाउंडेशनसारख्या संस्थांचे वेळोवेळी सहकार्य घेता येईल. तसेच मुलांचे संरक्षण मोठ्यांची

जबाबदारी आहे, असे मार्गदर्शन प्रमुख अतिथी श्री. विनोद तावडे, शालेय शिक्षण व क्रिडा मंत्री यांनी केले.

महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक बालकाच्या विकासासाठी सुरक्षित व संरक्षित वातावरण निर्मिती व्हावी, यासाठी राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात रक्षा अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानात स्थानिक शाळा, महाविद्यालये, नागरी संघटना, शासकीय संस्था इत्यादिंनी सहभागी व्हावे, असे आवाहन श्री. प्रविण घुगे, अध्यक्ष बाल हक्क संरक्षण आयोग यांनी केले.

रक्षा अभियानाचे सादरीकरण श्री. संतोष शिंदे आणि कार्यक्रमाचे सूत्र संचालन सौ. आरती नेमाणे, समन्वयिका, समतोल फाउंडेशन यांनी केले. श्री. विजय जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

९) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व महिला व बाल विकास विभाग यांचेमार्फत आरोग्य, क्रिडा, महिला व बाल विकास विभाग आणि बाल कल्याण समिती यांचे पर्यवेक्षण (मॉनिटरींग) करण्याकरीता आयोजित केलेली बैठक.



बैठकीस आयोगाचे सदस्य श्री. विजय जाधव व श्रीम. शेख तसेच महिला व बाल विकास विभाग मार्फत श्री. हिवराळे, विभागीय आयुक्त, श्रीम. पाटील, सहाय्यक आयुक्त, श्रीम. कांबळे, जिल्हा महिला बाल विकास अधिकारी, पुणे, त्याचप्रमाणे एकात्मिक बाल विकास प्रकल्प अधिकारी, जिल्हा क्रिडा अधिकारी, श्री. आवटी, तहसिलदार, पुणे व अन्य अधिकारी उपस्थित होते.

१०) युनिसेफ, ग्राम विकास विभाग व महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांचे संयुक्त विदयमाने स्टेकहोल्र्डस करीता बाल स्नेही पंचायत रिसोर्स कीट चे प्रकाशन कार्यक्रम






महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग आणि संयुक्त राष्ट्र आंतरराष्ट्रीय बाल आपत्कालीन निधी, यांची भागीदारी खेड्यातील प्रत्येक मुलाचे बाल हक्क सुनिश्चित करण्यात प्रमुख भूमिका बजावणारे ग्रामीण बाल संरक्षण समित्या कार्यान्वित करण्यावर लक्ष केंद्रित करीत आहे. याचाच एक भाग म्हणून औरंगाबाद येथे दि.१४ फेब्रुवारी २०१९ रोजी सर्वप्रथम विभागीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. ज्यात शेजारील जिल्ह्यांतील सुमारे १०० ग्रामीण बाल संरक्षण समित्या सदस्यांनी बालमैत्री पंचायत आणि बाल संरक्षण समितीच्या जबाबदारी / जबाबदाऱ्यांकडे लक्ष दिले होते. सदर कार्यक्रमास आयोगाचे अध्यक्ष श्री.प्रविण घुगे, सदस्य श्री.विजय जाधव, डॉ.शालिनी कराड, डॉ.वासंती देशपांडे व सचिव श्रीम. सीमा व्यास, भा.प्र.से. उपस्थित होते. तसेच युनिसेफचे पदाधिकारी, महिला व बाल विकासचे पदाधिकारी, ग्राम बाल पंचायत समितीचे सदस्य व इतर संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. ही कार्यशाळा बाल मैत्री ग्रामपंचायती आणि बाल संरक्षण समित्यांना त्यांच्या भूमिका समजावण्यास तसेच जास्तीत जास्त ग्राम पंचायत पर्यंत पोहोचण्यासाठी अत्यंत कार्यक्षम / उपयुक्त ठरली.

संयुक्त राष्ट्र आंतरराष्ट्रीय बाल आपत्कालीन निधी, ग्राम विकास विभाग आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग या संस्थांच्या संयुक्त सहभागाने, गरजू महिला आणि बालकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी एकत्र येऊन बाल आणि लिंग-अनुकुल हितकारक स्थानिक कारभाराची व्यवस्था ग्रामपंचायतीच्या सहभागाने करण्याची शासनाव्दारे पूर्ण राज्यात सोय करण्यात आली आहे.

याकरिता संयुक्त राष्ट्र आंतरराष्ट्रीय बाल आपत्कालीन निधी, ग्राम विकास विभाग आणि महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनी प्रशिक्षणाकरिता साधने पण तयार केली आहेत. या मॉडेलचा (प्रतिकृतीचा/नमुन्याचा) हेतू बालकांचे हक्क आणि शाश्वत विकास ध्येयावर लक्ष

केंद्रित करून प्रशासकीय प्रक्रियेत महिला आणि बालकांच्या सक्रिय सहभागासह, बालकांचे लिंग अनुरूप तसेंच संवेदनशीलता जाणून अर्थसंकल्पीय मॉडेलचे बजेट मॉडेल आणि सातत्यपूर्ण देखरेखीच्या प्रक्रियेस प्रोत्साहन देणे आहे. त्यांच्या भूमिका पातळीवर संबंधित कर्मचाऱ्यांची जागरूकता आणि संवेदनशीलता विकसित करण्यासाठी - ग्राम पंचायत स्तरावर निवडलेल्या आणि निवडून आलेल्या कार्यकर्त्यांची क्षमता वाढवणे यासाठी देखील हाती घेण्यात आले आहे. चौदाव्या वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायत स्तरावरील नियोजन, अर्थसंकल्पीय प्रक्रियेशी संबंधित शासन निर्णय या मॉडेलने प्रभावित केले आहेत.

यासंदर्भात ५ पुस्तिका इंग्रजीमध्ये आणि ५ पुस्तिका मराठीमध्ये उपलब्ध आहेत.

इंग्रजी ५ पुस्तकांची नावे खालील प्रमाणे :

१. In my Defence
२. The Rights Direction,
३. On an Equal Footing
४. Triggering Change,
५. We the Children.

तसेच मराठीत ५ खालील पुस्तके उपलब्ध आहेत :

१. आम्ही मुले
२. बदलाची सुरुवात
२. तुम्हाला माहित आहे का ?
४ .योग्य दिशेने वाटचाल,
५. समपातळीवर.

११) <u>दि.२४/५/२०१८ रोजी जळगांव येथे बाल अधिकारी यांना प्रशिक्षण</u>

महिला व बाल विकास विभागाचे अधिकारी व बाल कल्याण समिति तसेच स्वयंसेवी संस्था यांना मुलांचे हक्क यावर श्री प्रवीण घुगे, अध्यक्ष व श्री विजय जाधव, सदस्य बाल हक्क सरंक्षण आयोग यांनी मार्गदर्शन केले. आयोजक केशव स्मृति प्रतिष्ठान, समतोल प्रकल्प, जळगांव





१२)  नागपूर महानगर पालिकेअंतर्गत, माध्यमिक शाळेच्या मुख्याध्यापकांसाठी आयोजित कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. वासंती देशपांडे, सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनी बालकांचे हक्क संरक्षण व तत्संबंधित कायदयांबाबत मार्गदर्शन केले.



१३)  नागपूर ग्रामीण पोलीस मुख्यालयात बाल पोलीस अधिकारी यांचेकरिता आयोजित कार्यशाळेत डॉ. वासंती देशपांडे, सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनी बाल हक्क आणि पोलिसांची भूमिका याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.



१४) जिल्हा सांगली येथील आश्रम शाळेमधील आठ मुलींच्या लैंगिक पिळवणुकीच्या घटनेसंबंधी दि.१२.१०.२०१८ रोजी पुणे येथे बैठक आयोजित केली. सदर बैठकीचे आयोजन श्री. प्रविण घुगे यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आले व त्यावेळेस महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे सदस्य डॉ. शालिनी कराड, श्री.विजय जाधव, व श्रीम. सीमा व्यास, भा.प्र.से., सचिव यांनी सहभाग घेतला. सदर बैठकीस महिला व बाल विकास विभागाचे अधिकारी, बाल कल्याण समितीचे सदस्य व पोलिस अधिकारी उपस्थित होते.



१५) दि.**१५ ऑक्टोबर २०१८**

सेंट जोसेफ हायस्कूल, डोंगरी, मुंबई येथे कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यात "बाल रक्षक चळवळ" राबविण्यात आली. ज्यात मुंबईतील शिक्षकांनी सहभाग घेतला. बाल हक्क संरक्षण आयोग, महाराष्ट्र राज्य व समतोल फाऊंडेशन संस्थेच्या वतीने कार्यक्रम आयोजित करण्यात आला. महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे श्री विजय जाधव, सदस्य यांनी पुढाकार घेतला. समतोल फाऊंडेशनच्या समन्वयिका सौ. आरती नेमाणे यांनी बाल न्याय अधिनियम २०१५ विषयी सत्र घेतले व सौ वैशाली शिंदे, शिक्षण विभाग, मुंबई यांनी बाल रक्षक चळवळ या विषयाची माहिती दिली.



१६) <u>रायपुर येथे छत्तीसगड बाल हक्क संरक्षण आयोगाने "बाल मित्र राज्य की अवधारणा" या विषयावरील आयोजित केलेल्या राष्ट्रीय परामर्श कार्यशाळेस डॉ० वासंती देशपांडे, सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग उपस्थित होत्या.</u>



१७) <u>दिल्ली येथे दि.२ डिसेंबर, २०१८ रोजी राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाने आयोजित केलेल्या “Functioning of State Commissions for Protection of Child Rights” या विषयावरील कार्यशाळेत महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष श्री.प्रविण घुगे व सदस्य श्री. विजय जाधव, डॉ. शालिनी कराड व डॉ.वासंती देशपांडे हे उपस्थित होते.</u>




१८) <u>बाल कामगार आणि विस्थापित मुलांचे प्रश्न / ऊसतोड कामगारांच्या मुलांची शैक्षणिक काळजी / भिक्षेकरी मुलांना दिलासा</u>

श्री. प्रविण घुगे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनी दि.१२ डिसेंबर, २०१८ रोजी लातूर जिल्हयातील श्री. पनगेश्वर साखर कारखाना, पानगाव येथे ऊसतोड कामगारांशी संवाद साधून, ऊसतोड कामगारांसोबत असणा-या अल्पवयीन मुलांबाबत चौकशी केली.

दि.१३ डिसेंबर,२०१८ रोजी जालना येथे समर्थ साखर कारखाना, अंकुश नगर, तालुका अबंड येथे ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या प्रश्नांबाबत पाहणी केली.

## प्रविण घुगे यांनी ऊसतोड मजूरांच्या मुलांशी साधला संवाद

पानगाव, दि. १३ :....

राज्य बाल हक्क आयोगाचे अध्यक्ष प्रविणजी घुगे पानगाव दौर्यावर ता. १२ डिसेंबर रोजी दुपारी आले असता.पानगाव ग्रामबाल संरक्षण समीती सोबत ऊसतोड मजूरांच्या प्रश्ना बाबत चर्चा केली. लोकनेते गोपीनाथराव मुंडे राष्ट्रीय ग्रामीण विकास व संशोधन संस्था डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ औरंगाबाद यांच्या वतीने ऊसतोड कामगारांचे आर्थीक सामाजीक शैक्षणीक सर्वेक्षणाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. या नंतर ते थेट पानगाव येथील पन्नगेश्वर साखर कारखान्यासाठी ऊसतोडणी करण्यासाठी आलेल्या ऊस तोड मजूरांच्या झोपडीवर जाऊन त्या मजूरासोबत चर्चा करण्यात आली या वेळी ऊसतोड मजूरासोबत आलेल्या मुलांसोबत चर्चा करण्यात आली.या वेळी मुलांना त्यांच्या शिक्षणाबाबत विचारण्यात आले. सध्याचे शिक्षण, आणी मुलं या ठिकाणी



सुरक्षीत आहेत का ? या बाबत मुलांसोबत सविस्तर चर्चा करण्यात आली या प्रसंगी जवळपास १५० ते २०० मुले शाळा सोडून ऊस तोड मजूराच्या सोबत आल्याचे दिसून आले.हे मुले शाळाबाह्य राहू नयेत म्हणून जवळच्या शाळेत प्रवेश देण्याबाबत ऊसतोड कारखाना व मुलांच्या पालकांना सांगण्यात आले. सांगण्यात आले. या नंतर रेणापूर तालुक्यातीलच हनमंतवाडी तांड्यावर सुरू असलेल्या अनिवासी हंगामी वसतीगृहाला भेट दिली व तेथील मुलांसोबत हंगामी वसतीगृह मिळणार्या सुविधा, जेवणाचा मेनू, अभ्यास बाबत आणी हंगामी वसतीगृह चालक आत्म राठोड यांच्यासोबत चर्चा केली. मुलांच्या जेवणाबाबत. या प्रसंगी हंगामी वसतीगृह चालकांनी विचारण्यात आले की गतवर्षीचे सर्व बील मिळाले का ? याबा चालकांनी गतवर्षी देखील हंगामी वसतीगृह चालवण्यात आले होते परंतू त्याचे बील सुरूवातीला एकाच टप्प्यात आले परंतू बाकीचे आजून भेटले नसल्याचे राज्यबाल हक्क आयोगाचे अध्यक्ष प्रविण घुगे यांना सांगण्यात आले. सविस्तर अशी चर्चा करण्यात आली.या वेळी लातूर बालकल्याण समीतीच्या अध्यक्षा उमा व्यास, सदस्या ॲड. सुजाता माने, कलापंढरी संस्थेचे प्रतिनिधी तथा पानगाव ग्रामबाल संरक्षण समीती अध्यक्ष मधुकर गालफाडे, ग्राम पंचायत सदस्या सौ. शिला आचार्य, ग्रामबाल संरक्षण समीती सदस्य बाबा हालकुडे, बबली अनगोंदे, अल्लापाशा शेख, आशा ठाकूर, बबीता लाडे आदिंची उपस्थीती होती.

श्री. प्रविण घुगे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनी दि.२५ डिसेंबर, २०१८ रोजी जालना जिल्ह्यातील बागेश्वरी सहकारी साखर कारखाना, परतूर येथे ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या प्रश्नांबाबत चर्चा केली.

दैनिक आनंद नगरी
जालना नगरी
Wednesday 2018/12/26

## उस तोड मंजुरांच्या मुलांची शैक्षणिक काळजी घ्या-प्रविण घुगे

परतुर(प्रतिनिधी)-तालुक्यात मोठ्या प्रमाणात उस तोड कामगार तालुक्यासह बाहेर जिल्यातून स्थलांतरित झाले आहेत. त्या कामगारांच्या मुलांच्या शिक्षणाची सोय करण्याचे सूचना कारखाना व्यवस्थापन आणि शालेय व्यवस्थापन समितीला दिल्या आहेत. ते परतूर तालुक्यात ऊस तोड कामगारांच्या मुलांच्या पाहणी दौरा करत असताना अनेक ठिकाणी ऊस तोड मंजुरांच्या पालावर जाऊन पाहणी केली.



स्थानिक संस्था मदतीने मंजुरांच्या मुलांची सोय स्थानिक ठिकाणी उपलब्ध करून साखर कारखाना नियोजन करून मुलाचे आरोग्य आणि शिक्षण प्रश्न सोडावे. एकही मुल शाळेपासुन व संरक्षण पासुन वंचित राहाता कामी नाही. जालना जिल्ह्यातील अंबड परतुर घनसावंगी मंठा जाफ्राबाद जालना भोकरदन या तालुक्यातील यंदा हंगामी स्थलांतरीत मुले गेली आहेत. आई वडिलांना सोडून घरी राहिलेले व आई वडिला सोबत येथे. शैक्षणिक सुविधा संदर्भात शासनाच्या वतीने उपाय योजना केली जाईल तसेच स्वराज ग्रामीण विकास प्रतिष्ठान परतुर याच्या बालमित्र उपक्रम याची महिती घेतली. तसेच बागेश्वरी साखर कारखाना याचे शेतकी अधिकारी खडागळे, संरक्षण अधिकारी नामदेव काकडे, वाव्हुळे ,स्वराज ग्रामीण विकास प्रतिष्ठान चे कार्यकारी संचालक भाउसाहेब गुंबाळ, एकनाथ राऊत, महादेव हिवाळे ,भास्कर साळवे, तसेच गाव बाल संरक्षण समिती शालेय व्यवस्थापन समिती सदस्य उपस्थित होते.

सकाळ

## शंभर शाळाबाह्य मुले शिक्षणाच्या प्रवाहात

### ऊसतोड कामगारांच्या मुलांना झोपडीजवळच मिळतेय शिक्षण

रेणापूर, ता. २५ (बातमीदार) : ऊसतोड मजुरांच्या शाळाबाह्य मुलांसाठी थेट झोपडीच्या अंगणातच शाळा अवतरली असून, सुमारे शंभर शाळाबाह्य मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यात पानगाव ग्राम बालसंरक्षण समितीला यश आले आहे.

बालकांना जगणे, विकास, संरक्षण आणि सहभागितेचे बालहक्क मिळवून देण्यासाठी राज्य बालहक्क संरक्षण आयोग कार्यरत असून याअंतर्गत

**» सुखद**

ग्रामस्तरावर बालहक्क समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. पानगाव (ता. रेणापूर) येथेही ही समिती कार्यरत आहे. राज्य बालहक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष प्रवीण घुगे यांनी समितीच्या पदाधिकाऱ्यांशी चर्चा करून येथील पन्नगेश्वर साखर कारखान्यात ऊसतोडीसाठी आलेल्या कामगारांच्या शाळाबाह्य मुलांसाठी शाळा सुरू करण्याचे आदेश दिले.

शिक्षण विभागाकडे पाठपुरावा करून पन्नगेश्वर साखर कारखाना वस्तीवर अखेर ऊसतोड मजुरांच्या शाळाबाह्य मुलांसाठी थेट झोपडीच्या अंगणातच शाळा सुरू करण्यात आली. या मुलांचे सर्वेक्षण करण्यासाठी रेणापूर गटसाधन केंद्राच्या तालुका बालरक्षक मंजूषा आचमे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या शाळेसाठी सुमारे एक लाख रुपये खर्च करून पन्नगेश्वर साखर कारखाना व्यवस्थापनाच्या वतीने शेड उभारले आहे. लातूर

पान ३ वर »



पानगाव (ता. रेणापूर) : पन्नगेश्वर साखर कारखाना वस्ती परिसरात शाळाबाह्य मुलांसाठी उभारलेले शैक्षणिक संकुल (शेड).

Aurangabad, Latur-Today
26/02/2019 Page No. 1




# भिकेसाठी प्रवृत्त केल्यास कारवाई

## राज्य बालहक्क आयोगाचे अध्यक्ष प्रवीण घुगे यांचा इशारा

**नाशिक : प्रतिनिधी**

मुलांना भीक मागायला प्रवृत्त करणाऱ्या पालकांवर भविष्यात कडक कारवाई करण्याचा इशारा महाराष्ट्र राज्य बालहक्क आयोगाचे अध्यक्ष प्रवीण घुगे यांनी दिला आहे. बालकांचे अधिकार जोपासताना त्यांच्या योग्य अंमलबजावणीसाठी समाजाने पुढे येण्याचे आवाहन त्यांनी केले. मूल दत्तक घेण्याची प्रक्रिया सुलभ करण्याचा मानस घुगे यांनी व्यक्त केला.

जिल्हा बालहक्क समिती आढावा बैठकीसाठी शनिवारी (दि.२७) नाशिक दौऱ्यावर आलेल्या घुगे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. सिग्नल, रस्त्यावर भीक मागायला लावणाऱ्या पालकांवर तसेच व्यक्तींवर कारवाईसाठी पुढाकार घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. बालकांसाठी जिल्हा बालहक्क समित्या कार्यरत असून, काही सामाजिक संस्थांही यात हातभार लावत आहेत. मात्र, तरीही बालकांचे प्रश्न अद्याप पूर्णपणे सुटले नसल्याचे मान्य करतानाच हे प्रश्न सोडविण्यासाठी समाजाने पुढे यावे, असे घुगे म्हणाले. नंदुरबारमध्ये पाच वर्षांत एकही बालकामगार सापडला नसल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली. या प्रकरणी दोषींवर कारवाईचे आदेश नंदुरबार जिल्हाधिकाऱ्यांना दिल्याची माहिती घुगे यांनी दिली.

### नऊ बालकामगारांची सुटका

जिल्हा बालकल्याण समितीमार्फत गेल्या वर्षभरात नऊ ते १० बालकामगारांची सुटका करण्यात आल्याची माहिती यावेळी प्रवीण घुगे यांनी दिली. राज्यातील अनाथ व रस्त्यावर राहणाऱ्या १०० टक्के बालकांची आधार नोंदणी केली आहे. लवकरच केंद्र सरकार त्यांच्या संकेतस्थळावर महाराष्ट्रासह देशातील इतर राज्यांतील अनाथ बालकांची माहिती लिंक करणार आहे. त्यामुळे देशातील कोणत्याही कोपऱ्यातून हरवलेल्या बालकाचा शोध घेणे सोपे होईल, असा विश्वास घुगे यांनी व्यक्त केला.



बाललैंगिक अत्याचार, राईट टू एज्युकेशनसाठी शालेय व्यवस्थापन समिती, पालक-शिक्षक संघांनी अधिक दक्ष राहण्याचे निर्देश राज्यभरातील शाळांना दिल्याचे घुगे यांनी स्पष्ट केले. दरम्यान, गतिमंद मुलांसाठी राज्यात १८ बालगृहे आहेत. मात्र, या बालगृहांची क्षमता संपुष्टात आल्याची धक्कादायक माहिती घुगे यांनी दिली. येत्याकाळात जिल्हा बालहक्क समित्या अधिक सक्षम करण्यावर भर देणार असल्याचे त्यांनी सांगितले. केंद्र सरकार व नीती आयोगाने नंदुरबार, गडचिरोली, उस्मानाबाद व वाशिम हे चार जिल्हे दत्तक घेतले आहेत. या जिल्ह्यांचा आढावा घेताना तेथील बालकांचे प्रश्न सोडविण्यासाठी उपाययोजना राबविणार असल्याचे घुगे यांनी सांगितले. यावेळी जिल्हा बालकल्याण समितीच्या अध्यक्षा शुभांगी बेलगावकर, उद्धव खंदारे, नितीन आढके, शोभा पवार आणि मंगल नेहे आदी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाचे अध्यक्ष श्री. प्रविण घुगे व सदस्य श्री. संतोष शिंदे हे पाथरी, जिल्हा परभणी येथे दि.२९ डिसेंबर, २०१८ रोजी एकात्मिक बाल संरक्षण योजनांतर्गत गाव बाल संरक्षण समित्यांची भूमिका व जबाबदारी या विषयावर बाल संरक्षणासाठी ग्रामपंचायत पदाधिकारी व अंगणवाडी कार्यकर्ते यांचे परिषदेस प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. यावेळेस त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.




१९) महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व इस्राइल कॉन्सुलेट जनरल-मुंबई यांची दि.११ फेब्रुवारी, २०१९ रोजी यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, नरिमन पॉइंट, मुंबई येथे झालेली परिचयात्मक बैठक.



या बैठकीस श्री. याकोव फिंकेलस्टेन, इस्राईलचे कॉन्सुलेट जनरल, मुंबई, श्री. अनय जोगळेकर, राजकीय व्यवहार व विशेष प्रकल्प, इस्राईलचे कॉन्सुलेट, श्री. निमरोद कालमर, मिशनचे उपप्रमुख, इस्राईलचे कॉन्सुलेट, श्रीमती मिचेल जोशेफ, माशव्ह व सार्वजनिक राजनैतिक अधिकारी, इस्राईलचे कॉन्सुलेट हे मान्यवर उपस्थित होते. आयोगाचे अध्यक्ष श्री. प्रवीण घुगे आणि आयोगाचे

सदस्य, श्री. संतोष शिंदे, श्री. विजय जाधव, प्रा. आस्मा शेख, डॉ. वृषाली देशपांडे त्याचबरोबर श्रीमती सीमा व्यास, भा.प्र.से., सचिव आणि श्री प्रमोद बाडगी, विधी सल्लागार हे या बैठकीस उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य बाल हक्क आयोगाचे अध्यक्ष श्री.प्रवीण घुगे यांनी प्रस्तावना केली व उद्दिष्टे अभिव्यक्त केली. सदस्य, श्री. संतोष शिंदे यांनी बाल हक्काबाबत केलेल्या कामाबद्दलचे संक्षिप्त सादरीकरण केले.

श्रीम. रुपाली गोस्वामी, सेव्ह द चिल्ड्रन यांचे प्रतिनिधी यांनी रस्त्यावर राहणाऱ्या बालकांबाबत आयोग व सेव्ह द चिल्ड्रन यांच्या सहयोगाने केलेल्या कामाचे संक्षिप्त सादरीकरण केले.

श्री.संजय मकवान, प्रादेशिक संचालक, आय.जे.एम. यांनी, रस्त्यावर राहणाऱ्या बालकांच्या अपव्यापारासंदर्भात आयोग व आयजेएम यांच्या सहयोगाने केलेल्या कामाचे संक्षिप्त सादरीकरण केले.

श्रीम.सीमा व्यास,भा.प्र.से.,सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग यांनी अभिव्यक्त केल्यानुसार, सहभागी असलेल्या सर्व मान्यवरांनी, मनमोकळी चर्चा केली आणि शक्य असलेला सहयोग देण्याबद्दल चर्चा केली.

दि.३ मार्च, २०१९ रोजी परिवर्तन महिला संस्था व डोंबिवली महिला महासंघ तसेच इंटरनॅशनल जस्टिस मिशन यांचेव्दारे आयोजित "मुलांची काळजी आणि संरक्षण" या कार्यशाळेस आयोगाचे अध्यक्ष श्री. प्रविण घुगे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते व त्यांनी कार्यशाळेत बहुमोल मार्गदर्शन केले.



दि.१३ मार्च, २०१९ रोजी युनिसेफ सोबत चाईल्ड बजेटींग या विषयावर वाय.एम.सी.ए. सेंटर, मुंबई सेंट्रल येथे एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

१. श्री. प्रविण घुगे, अध्यक्ष
२. श्री. विजय जाधव, सदस्य
३. श्री. संतोष शिंदे, सदस्य
४. डॉ. वृषाली (वासंती) देशपांडे, सदस्या
५. डॉ. शालिनी कराड, सदस्या
६. डॉ. मंजूषा कुलकर्णी, प्रशासकीय अधिकारी
७. श्री. प्र.मा.बाडगी, विधी सल्लागार
८. श्रीम. कामिनी कापडीया, युनिसेफ कन्सल्टंट
९. श्रीम. शौमीली दास, युनिसेफ, प्रतिनिधी
१०. श्रीम. चंद्रिका सिंग, युनिसेफ, प्रतिनिधी

- दि.१३ मार्च, २०१९ रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.०० या वेळेत युनिसेफने एक दिवसीय कार्यशाळेचे वाय.एम.सी.ए सेंटर, मुंबई सेंट्रल येथे आयोजन केले होते. कार्यशाळेस उपरोक्त नमूद व्यक्ती उपस्थित होत्या व कार्यशाळेचा विषय चाईल्ड बजेटींग असा होता.

- या कार्यशाळेत बजेंटीगची प्रक्रिया,विभागाकडून बजेटींगची मागणी,नियोजन समिती वित्त विभाग यांच्या बजेटींगच्या कार्यप्रणाली, बजेट पुस्तकांचे वाचन, बजेट तयार करणे, विभागाकडून मागणी, वित्त विभाग, नियोजन समिती,बजेट मंजुरीची प्रक्रिया इ. बाबींवर कार्यशाळेत युनिसेफचे प्रतिनिधी श्रीमती शौमीली दास व श्रीमती चंद्रिका सिंग यांनी मार्गदर्शन केले.

- कार्यशाळेनंतर बाल हक्क अभियान, महाराष्ट्र या संस्थेच्या सदस्यांनी बाल हक्क आयोगाचे अध्यक्ष, सदस्य, प्रशासकीय अधिकारी व विधी सल्लागार यांची भेट घेऊन मा. अध्यक्षांच्या पुढाकाराने साखर कारखान्यांमध्ये सुरू झालेल्या शिक्षण व्यवस्थेबाबत समाधान व्यक्त केले. अनेक ग्राम बाल संरक्षण समित्यांनी बाल हक्क संरक्षण आयोगाच्या अध्यक्षांच्या प्रेरणेने व लोक सहभागातून गाव पातळीवर चांगले काम करीत असल्याचे निदर्शनास आले आहे, असे नमूद केले. या वेळी बाल हक्क अभियान, महाराष्ट्र यांचे श्री. सुधाकर क्षिरसागर, राज्य निमंत्रक, श्री. बी.पी. सूर्यवंशी, कार्यक्रम प्रमुख, श्रीमती. सोमिता दास, कोर कमिटी सदस्य, सारिका देसाई, कोअर कमिटी सदस्य व श्वेता दामले, कोअर कमिटी सदस्य हे उपस्थित होते. त्यांनी कार्यस्थितीचा अहवाल अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग व उपस्थित सदस्यांना सादर केला.



पुण्य नगरी | Composite

# अनाथ बालकांना मिळणार 'आधार'

नाशिक : रस्त्यांवरील अनाथ बालकांसह बालगृहातील मुलांचे आधार तयार करून त्यांना ओळख देण्याचा प्रयत्न राज्य बाल हक्क आयोग करणार आहे, त्यासाठी भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणा (यूआयडीएआय) कडे प्रस्ताव सादर केला आहे. त्यामुळे या बालकांच्या संगोपन कार्यात मदत होईल, अशी माहिती राज्य बाल हक्क आयोगाचे अध्यक्ष प्रवीण घुगे यांनी दिली.

राज्य बाल हक्क आयोगाने शनिवारी (दि. २७) नाशिक बालकल्याण समितीचा आढावा घेतला. यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत घुगे बोलत होते. नंदुरबार जिल्ह्याचा दौरा केल्यानंतर नाशिक जिल्ह्याचा त्यांनी आढावा घेतला. बालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी विविध कायदे अस्तित्वात असले, तरीही विविध

**राज्य बाल हक्क आयोगाचे अध्यक्ष घुगे यांची माहिती**

कायद्यांमुळे या प्रक्रियेत अडचणी निर्माण होत असल्याचे घुगे यांनी यावेळी सांगितले. मतिमंद मुले, दिव्यांग मुले, अनाथ मुले, बालकामगार यांच्या समस्या वेगवेगळ्या आहेत. त्यामुळे त्यांच्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे, तसेच बाल हक्कांचे संरक्षण करण्यासाठी विविध कायद्यांची अंमलबजावणी करतानाच बालहक्क जोपासणेदेखील तेवढेच महत्त्वाचे असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले.

बाल हक्कांचे जतन व्हावे, यासाठी समाजातील विविध घटकांनी आणि स्वयंसेवी संस्थांनी स्वयंस्फूर्तीने पुढे यायला हवे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. बाल हक्क संरक्षणाविषयीचे गडचिरोलीतील १४८, तर नंदुरबारमधील ७५ प्रकरणे निकाली काढले असून, वाशिम आणि उस्मानाबादमध्येही अशाप्रकारे पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगतानाच राज्यभरात बालमजुरी रोखण्यात यंत्रणा कमी पडत असल्याचे त्यांनी मान्य केले. भिक्षा प्रतिबंधक कायद्यानुसार भीक मागणाऱ्यांइतकाच भीक देणारा आणि भीक मागण्यास प्रवृत्त करणाराही गुन्हेगार असतो. ही बाब पालकांच्या लक्षात आणून देत कारवाई करण्याची गरज असल्याचे मत घुगे यांनी यावेळी व्यक्त केले.







श्री. प्रविण घुगे, अध्यक्ष व डॉ. वासंती देशपांडे, सदस्य हे बालस्नेही पंचायत, भटाळा येथे उपस्थित राहून बालकांशी चर्चा केली.



**बालकांचा मोफत व सक्तीचे शिक्षण अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत आयोगाचे कार्य :**

बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगामध्ये शिक्षणविषयक विविध तक्रारी प्राप्त होतात. त्यांचे विषय व स्वरुप लक्षात घेऊन याबाबत सदर अधिनियमाची अंमलबजावणी करणा-या शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य विभागाशी समन्वय साधणे आवश्यक असते. सबब सदर अधिनियमाची अंमलबजावणी पारदर्शी व प्रभावीपणे करणेसाठी तसेच तक्रारींचा निपटारा करणेसाठी या हेतूने आयोगामार्फत आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य यांचे समवेत बैठक घेऊन विषयाबाबत विस्तृत चर्चा करण्यात आली. त्यामध्ये बालकांचा मोफत व शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अन्वये शाळांमध्ये २५% आरक्षणाअंतर्गत प्रवेशप्रक्रिया, बालकांस प्रवेश मिळाल्यानंतर मोफत शिक्षण अंतर्गत गणवेश, पाठयपुस्तके, लेखनसाहित्य इ. देण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जाऊ नये, सदर विदयार्थ्यांकडून विविध कारणास्तव शुल्क मागणी करुन विदयार्थ्यांचा आणि पालकांचा मानसिक छळ करु नये, इतर सर्वसामान्य विदयार्थ्यांप्रमाणे त्यांना शाळेत वागणूक दिली जावी, कोणत्याही बालकास शारिरीक, मानसिक त्रास होईल अशी कृती करु नये याकरिता राज्यातील सर्व शाळांना सूचित करणे, शाळा प्रशासनाचे उद्‌बोधन करणे याबाबत शिक्षण विभागाच्या अधिनस्त कार्यालयांना आवश्यक सर्व कार्यवाही करणेच्या सूचना देण्यात याव्या, असे आयोगामार्फत सूचित करण्यात आले.

## मौजे कुर्लाप, तालुका वाळवा, जिल्हा सांगली येथील आश्रम शाळेमधील आठ मुलींच्या अभिकथित लैंगिक पिळवणुकीच्या घटनेसंबंधी आयोगाने केलेली कार्यवाही

१. "पुढारी" या मराठी वृत्तपत्राच्या सांगली आवृत्तीमध्ये, दि.२७/९/२०१८ रोजी प्रसिद्ध झालेल्या मौजे कुरलाप, तालुका वाळवा, जिल्हा सांगली येथील आश्रम शाळेमधील आठ मुलींच्या लैंगिक शोषणाच्या अभिकथित घटनेची आयोगाने स्वतःहून दखल घेतली आणि पोलीस अधीक्षक, सांगली यांच्याकडून केलेल्या कारवाईचा अहवाल मागविला. आयोगाने, उपसंचालक, महिला व बाल कल्याण, पुणे यांच्याकडून आणि संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून देखील उक्त घटनेबाबत अहवाल मागविला.

२. उक्त घटनेचा तपशील समजून घेण्यासाठी आणि उक्त घटनेच्या बाबतीत, हितसंबंधितांनी केलेल्या कारवाईचा आढावा घेण्यासाठी आयोगाने, दि.१२.१०.२०१८ रोजी सकाळी १२.३० वाजता महात्मा गांधी प्रशिक्षण संस्था, चर्च रोड, पुणे- १ येथे उक्त घटनेतील सर्व संबंधितांची बैठक आयोजित केली आणि संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना उक्त बैठकीस उपस्थित राहण्यासाठी कळविले आणि तसेच सांगली येथील समाज कल्याण विभागातील संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना देखील उक्त बैठकीस उपस्थित राहण्यासाठी कळवण्यात आले. पोलीस अधिक्षक, सांगली, बाल कल्याण समिती, सांगलीचे अध्यक्ष व सदस्य यांना देखील या बैठकीस उपस्थित राहण्यास कळवण्यात आले.

३. उपरोक्त बैठकीत, पोलीस उपअधिक्षक, सांगली व उक्त प्रकरणाचा अन्वेषण अधिकारी यांनी, उक्त प्रकरणाच्या चौकशीच्या प्रगतीचा तपशील सादर केला. संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी, उक्त आश्रमशाळेतील कर्मचा-यांविरूद्ध तसेच उक्त आश्रमशाळेची तपासणी, पर्यवेक्षण, प्रशासन करण्याची कर्तव्ये सोपविलेल्या, आणि ज्यांनी कर्तव्यच्युती ठरणारी कृती केलेली आहे, अशा कर्मचा-यांविरूद्ध केलेल्या कारवाईचा तपशील सादर केला. या बैठकीस उपस्थित असलेल्या संबंधितांनी आश्रमशाळांशी संबंधित असलेल्या मुद्दयांविषयी चर्चा केली. या बैठकीचे इतिवृत्त, खालीलप्रमाणे आहे -

**दि.१२.१०.२०१८ रोजी सकाळी १२.३० वाजता महात्मा गांधी प्रशिक्षण संस्था, फोटोझिंको प्रेसजवळ, चर्च रोड, पुणे - १ येथे आयोजित केलेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

सदर बैठकीस खालील व्यक्ती उपस्थित होत्या:

१. श्री. प्रवीण घुगे, अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई.

२. श्री. विजय जाधव, सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई.

३. डॉ. शालिनी कराड, सदस्य, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई.

४. श्रीम.सीमा व्यास,भा.प्र.से., सचिव,महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई.

५. श्री.शरद ल. अहिरे,भा.प्र.से.,संचालक,व्हीजेएनटी,ओबीसी आणि एसपीएल,ओबीसी कल्याण, पुणे.

६. श्रीम.विजया ए. पवार,सहसंचालक,व्हीजेएनटी,ओबीसी आणि एसपीएल,ओबीसी कल्याण, पुणे.

७. श्रीम.जयश्री सोनकवडे,उपसंचालक,व्हीजेएनटी,ओबीसी आणि एसपीएल,ओबीसी कल्याण,पुणे

८. श्री.प्रभाकर मा.परदेशी,सहायक संचालक,व्हीजेएनटी,ओबीसी आणि एसपीएल,ओबीसी कल्याण, पुणे

९. श्री. मेघराज आर.भाटे,एसडब्ल्यूओ,व्हीजेएनटी,ओबीसी आणि एसपीएल,ओबीसी कल्याण,पुणे.

१०. श्रीम. शर्मिष्ठा वालावलकर, पोलीस उपअधीक्षक, जत, जि. सांगली.

११. श्री. दिलीप हिवराळे, उपआयुक्त, महिला बालविकास आयुक्तालय, पुणे विभाग.

१२. श्री. सचिन के. कवळे, सहायक आयुक्त, सांगली.

१३. अँड. सुचेता मालवदे, अध्यक्ष, सीडब्ल्यूसी, सांगली.

१४. डॉ. उदयराव जगदाळे, सीडब्ल्यूसी, सांगली.

१५. श्री. ए. बी. पाटील, सीडब्ल्यूसी, सांगली.

१६. श्रीम. सुवर्णा पवार, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी,सांगली.

i) बैठकीच्या प्रयोजनाबद्दल म्हणजेच, मिनाई आश्रमशाळा, मौजे कुरलाप, तालुका वाळवा, जिल्हा सांगली येथील आश्रम शाळेमधील काही मुलींच्या लैंगिक शोषणाच्या अभीकथित घटनेची चर्चा करण्याबद्दल आणि हितसंबंधितांनी, म्हणजेच पोलिसांनी आणि उक्त आश्रमशाळेच्या प्रशासनाशी संबंधित असलेल्या शासनाच्या अन्य विभागांनी, उक्त घटनेच्या बाबतीत केलेल्या कारवाईचा आढावा घेण्याबद्दल बैठकीसाठी एकत्र जमलेल्या व्यक्तींना अवगत केले.

ii) सादर केलेली निवेदने आणि सांगली पोलिसांच्या प्रतिनिधी, श्रीमती शर्मिष्ठा वालावलकर, पोलीस उपअधिक्षक, जत, यांनी सादर केलेला अहवाल विचारात घेऊन, सर्व आरोपींविरूद्ध या प्रकरणी दोषारोपपत्र दाखल होईपर्यंत अन्वेषणाच्या प्रगतीच्या संदर्भात

पुढील कालावधीचा नियतकालिक प्रगती अहवाल सादर करण्यास विद्यमान प्रकरणातील आयओ, सांगली पोलीस यांना सांगितले. अपराध करण्यात सामील असलेल्या व उक्त अपराध करण्यास चिथावणी देणाऱ्या सर्व आरोपींवर गुन्हा दाखल करण्यासाठी योग्य अन्वेषण केले जात आहे याची खात्री करण्यासाठी सांगली पोलिसांना सांगण्यात आले.

iii) सादर केलेली निवेदने आणि श्री. शरद लक्ष्मण अहिरे, आय.ए.एस., संचालक, व्हीजेएनटी, ओबीसी आणि एसपीएल, ओबीसी कल्याण, पुणे यांनी सादर केलेला अहवाल विचारात घेऊन, उक्त कार्यालयाला, उक्त आश्रमशाळेचे संबंधित कर्मचारी आणि ज्यांना उक्त आश्रमशाळेचे प्रशासन व कामकाज यांची तपासणी व देखरेख करण्याचे कर्तव्य सोपविलेले आहे आणि आयोगास सादर केलेल्या अहवालामध्ये प्रतिपादन केल्याप्रमाणे, ज्यांनी उपरोक्त घटना घडण्यास कारणीभूत ठरणारी, त्यांच्या कर्तव्यात कसूर करणारी कृती केलेली आहे अशा अन्य अधिकाऱ्यांविरुद्ध केलेल्या पुढील कार्यवाही संदर्भात सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. या संदर्भातील अहवाल, दोन महिन्यांत सादर करण्यात यावा.

iv) उक्त आश्रमशाळेला भेट देणा-या संबंधित अधिकाऱ्यांनी, व्हिजिट बुक (शेरे बुक) योग्य प्रकारे ठेवलेली नाही आणि त्याच्यावर यथोचितपणे स्वाक्षरी केलेली नाही हे निदर्शनास आले आहे. यासंबंधात, संचालक, व्ही.जे.एन.टी., ओ.बी.सी. आणि एस.पी.एल.ओ.बी.सी. वेलफेअर, पुणे यांना विनंती केली आहे की, संबंधितांनी केलेल्या कृतीच्या किंवा अकृतीच्या संदर्भात चौकशी करावी आणि संबंधित कर्मचारी / अधिकाऱ्यांविरुद्ध योग्य शिस्तभंगाची कारवाई करावी व दोन महिन्यांच्या आत आयोगास अवलोकनार्थ अहवाल सादर करावा.

v) चर्चेमध्ये असे नमूद केले होते की, कुरलाप, ता.वाळवा, जि.सांगली येथील आश्रमशाळेतील कर्मचारी हे, संस्थेच्या संस्थापकाशी नात्याने संबंधित होते. म्हणून, उक्त आश्रमशाळेच्या / संस्थांच्या आणि राज्यातील अशा सर्व संस्थांच्या संस्थापकांच्या कुटुंबातील सदस्य, अशा आश्रमशाळेमध्ये / संस्थांमध्ये लाभाची पदे धारण करीत असतील तर, त्याची खात्री करण्यासाठी, व्हीजेएनटी, ओबीसी आणि एसपीएल, ओबीसी कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी काढलेल्या दि.१ ऑक्टोबर, २०१८ रोजीच्या शासकीय परिपत्रकानुसार, राज्यातील अशा सर्व आश्रमशाळांचा / संस्थांचा आढावा घ्यावा आणि त्यानुसार दोन महिन्यांच्या आत आयोगास, अवलोकनार्थ अहवाल सादर करावा अशी विनंती संचालक, व्हीजेएनटी, ओबीसी आणि एसपीएल, ओबीसी कल्याण, पुणे यांना व समाज कल्याण विभागाला केली आहे.

vi) उक्त आश्रमशाळांना / संस्थांना पुरविल्या गेलेल्या पायाभूत सुविधा व सुविधांच्या संबंधात, महिला व बाल कल्याण यांनी, त्यांच्या आश्रमशाळांसाठी विहित केलेली किमान मानके, त्यांच्या कार्यकक्षेतील आश्रमशाळांसाठी /संस्थांसाठी लागू करता येतील किंवा कसे याचा विचार करण्याबाबत आणि यासंबंधात केलेल्या उपाययोजनांबाबत दोन महिन्यांच्या आत आयोगास अवगत करण्याबाबत समाज कल्याण विभाग व संचालक, व्हीजेएनटी, ओबीसी आणि एसपीएल, ओबीसी कल्याण, पुणे यांना, विनंती केली. जर महिला व बाल विकास विभागाने विहित केलेल्या मानकांशी ही मानके जुळत नसतील तर, दोन्ही विभागांनी महिला बाल विकास विभागाच्या मानकांचे पुनरिक्षण करावे व अहवाल सादर करावा.

vii) कुरलाप, ता. वाळवा, जि. सांगली येथील मिनाई आश्रमशाळेत घडलेल्या प्रकारासारखी घटना राज्यातील इतर आश्रमशाळांमध्ये घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. बाल कल्याण समिती, सांगलीच्या एका सदस्याने असे नमूद केले की, आश्रमशाळेतील एका मुलीने तिला सांगितले की, लैंगिक शोषणाच्या अशाच घटना इतर संस्थांमध्येही घडत आहेत. व्हीजेएनटी, ओबीसी आणि एसपीएल, ओबीसी कल्याण विभाग, पुणे यांच्या अधिकाऱ्यांनी, म्हणजेच श्री. मेघराज भाटे, समाज कल्याण अधिकारी (गट-ब) आणि श्रीमती जयश्री सोनकवडे, उपसंचालक यांनी दि. २७/९/२०१८ रोजी उक्त संस्थेला दिलेल्या भेटीमध्ये, कुरलाप, ता. वाळवा, जि. सांगली येथील आश्रमशाळेतील उणिवा व कमतरता याबाबत सादर केलेला अहवाल विचारात घेऊन, समाज कल्याण विभाग व संचालक, व्हीजेएनटी, ओबीसी आणि एसपीएल, ओबीसी कल्याण, पुणे यांनी, जिल्ह्यांमधील सर्व संस्थाची / आश्रमशाळांची सखोल तपासणी करण्यासाठी उक्त जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिनस्त महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यात तसेच इतर सर्व जिल्ह्यांमध्ये, तातडीने तपासणी पथक स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. अशा तपासणी पथकात, व्हीजेएनटी, ओबीसी आणि एसपीएल, ओबीसी कल्याण विभाग, महिला व बाल विकास विभाग, पोलीस विभाग आणि नामांकित स्वयंसेवी संस्था यांचे प्रतिनिधी देखील असतील. समाज कल्याण विभाग व संचालक, व्ही.जे.एन.टी., ओबीसी आणि एसपीएल, ओबीसी कल्याण, पुणे हे, संबंधितांना तातडीने सर्व जिल्ह्यात तपासणी पथक स्थापन करण्याचे आणि यासंदर्भात केलेल्या कारवाईबाबत १५ दिवसांच्या आत आयोगास अवगत करण्याचे आदेश देतील. प्रत्येक जिल्ह्यातील अशा तपासणी पथकांनी केलेल्या तपासणीबाबत व अशा अहवालाच्या आधारे केलेल्या कारवाईचा अहवाल, दोन महिन्यांच्या आत आयोगाच्या अवलोकनार्थ सादर करण्याबाबत समाज कल्याण विभाग

व संचालक, व्ही.जे.एन.टी., ओ.बी.सी. आणि एस.पी.एल. ओ.बी.सी. कल्याण, पुणे यांना विनंती केली.

viii) व्हीजेएनटी, ओबीसी आणि एसपीएल, ओबीसी कल्याण विभाग, पुणे यांच्या अधिकाऱ्यांनी, म्हणजेच श्री. मेघराज भाटे, समाज कल्याण अधिकारी (गट-ब) आणि श्रीमती जयश्री सोनकवडे, उपसंचालक यांनी कुरलाप येथील उपरोक्त आश्रमशाळेला दिलेल्या भेटीबाबतच्या उपरोक्त अहवालातील मजकूर विचारात घेऊन, उक्त अहवालामध्ये प्रतिपादन केल्याप्रमाणे, उणिवा, कमतरता व कृती यासाठी जबाबदार असलेल्या संबंधितांविरुद्ध यथोचित कारवाई करण्याची आणि केलेल्या कारवाईचा अहवाल शक्य तितक्या लवकर आयोगाच्या अवलोकनार्थ सादर करण्याची विनंती, समाज कल्याण विभाग व संचालक, व्हीजेएनटी, ओबीसी आणि एसपीएल, ओबीसी कल्याण, पुणे यांना केली आहे.

ix) आश्रमशाळांमधील रहवासी किशोरवयीन मुलींमध्ये, बाल हक्कांविषयी जागरूकता वाढविण्यासाठी, आश्रमशाळांमधील रहवासी मुलींना आणि हितसंबंधितांना संवेदनशील करण्यासाठी उक्त विषयांमध्ये ज्ञानसंपन्न असलेल्या जाणकार व्यक्तींच्या मदतीने नियतकालिक बाल हक्क जागरूकता कार्यक्रम आयोजित करून जाणीव, जागृती करणे (सचेतन करणे) आवश्यक आहे. राज्यातील सर्व आश्रमशाळांमध्ये / संस्थांमध्ये बाल हक्क जागरूकता कार्यक्रम नियमितपणे आयोजित करण्यासाठी योग्य ती पावले उचलण्याची व यासंबंधात केलेल्या उपाययोजनाबाबत आयोगास दोन महिन्यांच्या आत अवगत करण्याची विनंती, समाज कल्याण विभाग व संचालक, व्हीजेएनटी, ओबीसी, व एसपीएल, ओबीसी कल्याण, पुणे यांना केली.

x) श्री. सचिन के. कवळे, सहायक आयुक्त, सांगली, यांनी असे सादर केले होते की, एक पीडित मुलगी, कुरालप, ता. वाळवा, जि. सांगली येथील मिनाई आश्रमशाळेत गठित केलेल्या विशाखा समितीची सदस्य होती आणि तिने विशाखा समितीच्या बैठकीच्या इतीवृत्तावर (मिनिटसवर) स्वाक्षरी केली आहे. कुरलाप, ता. वाळवा, जि. सांगली येथील मिनाई आश्रमशाळा येथे घडलेल्या घटनेतील पीडित मुलगी ही, उक्त आश्रमशाळेची अल्पवयीन विद्यार्थी असल्याचे दिसून येते आणि ती आश्रमशाळेतील महिला कर्मचारी नाही. या मुलीने लैंगिक छळाची तक्रार केली होती किंवा कसे याची खात्री करणे आवश्यक आहे. उक्त तक्रारीची दखल घेतली होती किंवा कसे आणि कोणत्या परिस्थितीत उक्त आश्रमशाळेच्या विशाखा समितीच्या बैठकीच्या इतिवृत्तावर (मिनिटांवर) पीडित मुलीची स्वाक्षरी घेण्यात आली होती. या संदर्भात संचालक, व्हीजेएनटी, ओबीसी आणि

एसपीएल.ओबीसी कल्याण, पुणे यांना अशी विनंती केली आहे की, सुजाणपणे चौकशी सुरू करावी आणि उक्त चौकशीच्या उपलब्धीबाबत आयोगास लवकरात लवकर अवगत करावे. कामाच्या ठिकाणी महिलांच्या लैंगिक छळवणूकीस (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम,२०१३ च्या तरतुदीनुसार लैंगिक छळाच्या तक्रारींबाबत राज्यातील सर्व आश्रमशाळांमध्ये / संस्थांमध्ये तक्रार निवारण यंत्रणा उभारण्यात आलेली आहे किंवा कसे या संबंधात खात्री करण्याची आणि याबाबत आयोगास अवगत करण्याची विनंती, समाज कल्याण विभाग व संचालक, व्हीजेएनटी, ओबीसी आणि एसपीएल. ओबीसी कल्याण, पुणे यांना केली आहे.

४. उक्त इतिवृत्तातील मजकूर विचारात घेता, सीआर १९३/२०१८-१९/८६३/२०१८,दि.२६ ऑक्टोबर, २०१८ च्या पत्राव्दारे, संचालक, व्हीजेएनटी, ओबीसी आणि एसपीएल, ओबीसी कल्याण, पुणे यांना, आवश्यक ती कार्यवाही करण्याची आणि आयोगास अनुपालन अहवाल सादर करण्याची विनंती केली आहे.

**<u>लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ (पोक्सो अधिनियम), बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ (जे. जे. अधिनियम) यांच्या अंमलबजावणीचे सनियंत्रण करण्यासंबंधी आयोगाने केलेले प्रयत्न.</u>**

लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम,२०१२ (पोक्सो अधिनियम), बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम,२०१५ (जे. जे. अधिनियम) याखालील प्रकरणांचे सनियंत्रण आणि तात्पुरत्या निवारागृहांसंबंधातील समस्या याबाबत चर्चा करण्यासाठी दि.१२/१०/२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता महिला व बाल विकास, पुणे आयुक्तालय येथे घेतलेली भागधारकांची बैठक.

५. लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम,२०१२ (पोक्सो अधिनियम), बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम,२०१५ (जे जे अधिनियम) याखालील प्रकरणांचे सनियंत्रण आणि तात्पुरत्या निवारागृहांसंबंधातील समस्या याबाबत चर्चा करण्यासाठी त्याच दिवशी, म्हणजेच दि.१२/१०/२०१८ रोजी सकाळी ११.३० पूर्वी पुणे आयुक्त कार्यालयात, भागधारकांची, म्हणजेच, पोलीस अधिक्षक, रेल्वे पुणे, पोलीस निरीक्षक, जी.आर.पी. पुणे, विशेष बाल अधिकारी, जीआरपी पुणे, बाल कल्याण समिती सदस्य, पुणे, जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी, पुणे, समतोल, साथी, इत्यादी स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी, यांची बैठक घेतली

होती. या बैठकीत, लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ (पोक्सो अधिनियम), बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम,२०१५ (जे जे अधिनियम) याखालील प्रकरणांचे सनियंत्रण आयोगाने करणे कायद्याच्या तरतूदींनूसार अनिवार्य असल्याचे आयोगाने स्पष्ट केले. या बैठकीत, पुणे क्षेत्रामध्ये पोक्सो प्रकरणांमध्ये झालेली वाढ, निवारागृहांचा प्रश्न, विशेष बाल पोलिस पथकाची (एसजेपीयू) स्थापना, पोक्सो कायदा व जे.जे. कायद्याखालील प्रकरणे हाताळताना हितसंबंधितांकडून बालस्नेही दृष्टिकोन आणि कार्यपद्धती स्वीकारण्याची गरज, मुलांशी संबंधित कायदे, पीडित व्यक्तींची वैद्यकीय तपासणी करण्याशी संबंधित समस्या, पुणे येथे तात्पुरत्या निवारागृहांचा अभाव, भयंकर, गंभीर गुन्ह्यांतील पीडितांना मदत करण्यासाठी व्यावसायिक समुपदेशकाची गरज, बाहेरील मुलांना, त्यांच्या स्वतःच्या (पालक) जिल्ह्यात स्थानांतरित करताना, संरक्षण पुरविताना व रेल्वे आरक्षण देताना भेडसावणाऱ्या समस्या, रूग्णालयात दाखल झालेल्या मुलांची परिचर्या (उपचार) करण्यासाठी परिचरांची कमतरता असल्याची समस्या, मनोधैर्य योजनेबद्दल जनजागृती, मुलांशी संबंधित कायद्यांच्या संदर्भात प्रशिक्षण देऊन पोलीस कर्मचाऱ्यांना जाणीव जागृती करणे (सचेतन करणे), या संबंधातील विषयांवर चर्चा करण्यात आली आणि उक्त अडचणी दूर करण्यासाठी उपाय सुचविले गेले. उक्त बैठकीची इतिवृत्ते खालीलप्रमाणे आहेत:

**दि.१२.१०.२०१८ रोजी सकाळी ११.३० वाजता महात्मा गांधी प्रशिक्षण संस्था, फोटोझिंको प्रेसजवळ, चर्च रोड, पुणे - १ येथे आयोजित केलेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

सदर बैठकीस खालील व्यक्ती उपस्थित होत्या:

१. श्री. प्रवीण घुगे, अध्यक्ष, एमएससीपीसीआर, मुंबई.
२. श्री. विजय जाधव, सदस्य, एमएससीपीसीआर, मुंबई.
३. डॉ. शालिनी कराड, सदस्य, एमएससीपीसीआर, मुंबई.
४. श्रीम. सीमा व्यास, भा.प्र.से., सचिव, एमएससीपीसीआर, मुंबई.
५. डॉ. हृषिकेश यशोद, भा.प्र.से., आयुक्त, डब्ल्यूसीडी, पुणे.
६. श्री. आर.एस.पाटील, उपआयुक्त, डब्ल्यूसीडी, पुणे.
७. श्री. पी.एम.बाडगी, विधी सल्लागार, एमएससीपीसीआर, मुंबई.
८. श्री. नंदकुमार घोरपडे, पोलीस उपाधीक्षक,पुणे रेल्वे.
९. श्री. मनोज बी. खंडागळे, पी.आय. पुणे रेल्वे पोलीस स्टेशन.

१०. श्रीम. दिपाली मोरे, एपीआय, पुणे रेल्वे.

११. श्री. प्रदिप देशपांडे, अतिरिक्त पोलिस आयुक्त (गुन्हे) पुणे.

१२. श्री. बी.एस.बार्गे, एसीपी क्राइम पुणे.

१३. श्रीम. मनीषा झेंडे, पी.आय.

१४. श्रीम. सविता फलाटे, सीडब्ल्यूसी -१ सदस्य, पुणे.

१५. श्रीम. बीना हिरेकर, सीडब्ल्यूसी सदस्य,पुणे.

१६. श्री.अमित देशमुख, सीडब्ल्यूसी -१ सदस्य, पुणे

१७. अँड. ममता नंदनवार

१८. अँड. शशिकांत सी. सावरकर, सीडब्ल्यूसी - २ सदस्य, पुणे.

१९. श्री. अर्जुन लक्ष्मण दांगट

२०. श्रीम. आरती नेमाने

२१. श्रीम. लक्ष्मी मुकादम

२२. श्री. संतोष के. वाळके

२३. श्री. डी.एस.कुटे

२४. श्रीम.अश्विनी कांबळे, डीडब्ल्यूसीडीओ, पुणे.

२५. श्री. दी. पी. हिवराळे, उपआयुक्त, महिला व बाल विकास, पुणे

२६. डॉ. एल. एन. डानावाळे, सदस्य, सीडब्ल्यूसी-२ पुणे.

२७. श्री. इंदविजय रा भूषण गुप्ता, - साथी.

२८. डॉ. विजया वंजारे अध्यक्ष, सीडब्ल्यूसी -२ पुणे.

२९. श्रीम. मीना शिंदे - समतोल फाउंडेशन.

३०. श्री. बालाजी चौगुले - समतोल फाउंडेशन.

३१. श्रीम. जयश्री प्रकाश मोघे, सदस्य,सीडब्ल्यूसी -२ पुणे.

३२. श्री. उमेश बी. गावत, आयजी ऑफिस, पीएडब्ल्यू.

३३. श्री.येसूदास नायडू, संचालक, आयजेएम मुंबई.

३४. श्रीम. कॅथरीन गॅब्रिएल, ॲडव्होकेट आयजेएम.

i) श्री.पी.एम. बाडगी, एमएससीपीसीआर, मुंबईचे विधी सल्लागार यांनी, उपस्थितांना बैठकीचे उद्दीष्ट प्रस्तावित करून बैठकीची सुरुवात झाली. लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम,२०१२ (पोक्सो अधिनियम), बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम,२०१५ (जे.जे. अधिनियम) सनियंत्रण व अंमलबजावणी करण्याचा

महाराष्ट्र बाल हक्क संरक्षण आयोगाचा (एम.एस.सी.पी.सी.आर.चा) आदेश आणि बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५ मधील तरतुदींनुसार आयोगाची कामे व बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ याच्या तरतुदींनुसार अपील प्राधिकरण म्हणून आयोगास सोपविलेली कर्तव्ये त्यांनी स्पष्ट केली.

ii) श्रीम. सीमा व्यास, भा.प्र.से, सचिव यांनी, पुण्यातील पोक्सो प्रकरणांच्या वाढीबाबत चर्चा केली. त्यांनी, पुण्यातील निवारागृहांची समस्या आणि एसजेएपीयू स्थापन करणे व त्याची भूमिका याविषयी चर्चा केली. त्यांनी, लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण अधिनियम,२०१२ (पोक्सो अधिनियम) ची प्रकरणे आणि बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम,२०१५ (जे जे अधिनियम) ची प्रकरणे आणि सामान्यतः बालकांशी वागताना बालस्नेही कार्यपद्धती अवलंबण्याच्या गरजेवरही जोर दिला. बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम,२०१५ (जे जे अधिनियम) च्या कलम १०७ अन्वये महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये आणि जेजे कायद्याच्या कलम १०७ च्या तरतुदीनुसार रेल्वे पोलिसांकडे एसजेपीयूची स्थापना करण्याबाबत चर्चा झाली. अशी माहिती देण्यात आली की, अशी युनिट स्थापना करण्यात आली आहेत; तथापि, अद्याप दोन सामाजिक कार्यकर्ते नामनिर्देशित करण्यात आलेले नाहीत. यासंदर्भात गृह विभागाने, बाल न्याय (काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ (जे. जे. अधिनियम) च्या कलम १०७ अन्वये अपेक्षित असल्याप्रमाणे, बालकांच्या संबंधातील कार्यवाही करण्यासाठी, दोन सामाजिक कार्यकर्त्यांचा समावेश असलेली एस.जे.पीयू. युनिटे, प्रत्येक जिल्ह्यात व रेल्वे पोलीस स्टेशनमध्ये स्थापन करण्यात आलेली आहेत किंवा कसे याची खात्री करण्याची विनंती केली आहे. जर अशी युनिटे स्थापन केलेली नसतील तर, सर्व जिल्ह्यांमध्ये अशी युनिटे स्थापन करण्यासाठी हाती घेतलेल्या उपाययोजना आणि प्रत्येक जिल्ह्यातील व रेल्वे पोलिसातील बालकांशी संबंधित असलेल्या अशा युनिटांच्या पदाधिकाऱ्यांच्या नावांची यादी व संपर्कासाठी तपशील यासह अहवाल, आयोगाच्या अवलोकनार्थ दोन महिन्यांच्या आत सादर करावा.

iii) अपचारी (विधिसंघर्षग्रस्त) बालकांशी आणि पिडीत बालकांशी व्यवहार करताना हितसंबंधितांकडून बालस्नेही दृष्टिकोन अवलंबिला जात नसल्याचे काही उपस्थितांनी निदर्शनास आणून दिले. असे दिसून येते, हितसंबंधितांमध्ये संवेदनशीलता नसल्यामुळे अशा घटनांची पुनरावृत्ती होते आणि ही समस्या सोडविण्यासाठी सर्व हितसंबंधितांचे एकत्र येऊन मतपरिवर्तन होणे आवश्यक आहे. यासंबंधात, सर्व हितसंबंधितांमध्ये, बालकांशी संबंधित कायद्यांविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि सर्व टप्प्यांत

बालकांसाठी बालस्नेही दृष्टिकोन ठेवण्यासाठी त्यांना संवेदनशील करण्याकरिता नियमित जागरूकता कार्यक्रमांचे आयोजन करणे आवश्यक आहे. यासंबंधात, प्रत्येक टप्प्यावर बालकांशी व्यवहार करताना, बालस्नेही दृष्टीकोन विकसित करण्यासाठी हितसंबंधितांना संवेदनशील करण्यावर विशेष भर देऊन सर्व संबंधित हितसंबंधितांसाठी, पुणे जिल्ह्यातील पोलीस प्राधिकारी व रेल्वे पोलीस प्राधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून, बालकांशी संबंधित कायद्यांविषयी एक दिवसीय जागरूकता कार्यक्रम आयोजित करण्याची विनंती आयुक्त, डब्ल्यूसीडी पुणे यांना केली आहे.

iv) उपस्थितांपैकी काहींनी असे निदर्शनास आणून दिले की, पीडितांच्या वैद्यकीय तपासणीस उशीर झाल्याच्या कारणामुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. बालकांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांच्या प्रकरणी पीडित व्यक्तीची वेळेवर वैद्यकीय तपासणी करणे हे, अशा तपासणीच्या पुरावाविषयक मूल्याच्या दृष्टीने देखील महत्वाचे आहे. यासंबंधात, बालकांविरुद्ध होणाऱ्या गुन्ह्यांच्या पीडितांची तत्परतेने वैद्यकीय तपासणी करण्याची आवश्यक व्यवस्था करण्यासाठी पुणे येथील व संपूर्ण महाराष्ट्रातील आरोग्य विभागाच्या संबंधित प्राधिकाऱ्यांना कळविण्यात यावे.

v) पुणे येथे तात्पुरत्या निवारा गृहाची सुविधा नसल्याचे आणि त्यामुळे सीडब्ल्यूसीच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात अडचणी येत असल्याने बऱ्याच अडचणींना तोंड द्यावे लागत असल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. यासंबंधात, या प्रकरणात लक्ष घालून तात्पुरत्या निवारा गृहाची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत विचार करावा व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अवलोकनार्थ आयोगाकडे सादर करावा अशी विनंती आयुक्त, डब्ल्यूसीडी, पुणे यांना केली आहे.

vi) उपस्थितांनी असे देखील निदर्शनास आणून दिले की, बलात्कारासारख्या भयंकर गंभीर अपराधांच्या प्रकरणी, बाल पीडित व्यक्ती मानसिकदृष्ट्या अस्थिर होते आणि त्यांची वैद्यकीय तपासणी करताना आणि पोलिसांनी / दंडाधिका-यांनी जबाब नोंदवताना काळजी घेणे व समुपदेशन करणे आवश्यक असते. व्यावसायिक समुपदेशकांच्या अनुपस्थितीत, पीडित बालकास अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते आणि ज्याचा परिणाम कधीकधी खटल्याच्या गुणवत्तेवर आणि तपासाच्या प्रगतीवर होतो. यासंबंधात, पोक्सो अधिनियम, २०१२ याच्या कलम ३९ च्या तरतुदीनुसार, महिला व बाल कल्याण मंत्रालयाने जारी केलेल्या आदर्श मार्गदर्शक तत्त्वांमध्ये दिलेल्या सूचनांचे पालन करणे गरजेचे आहे. उक्त मार्गदर्शक तत्त्वांच्या प्रकरण ५ मध्ये अशी तरतूद आहे की, आयसीपीएस (१) अंतर्गत चाइल्ड लाईन सर्व्हिस (२), जिल्हा बाल संरक्षण संस्था, (३)

स्वयंसेवी संस्था यांनी नियुक्ती केलेले समुपदेशक समुपदेशन करू शकतात. उक्त प्रकरणात, अधिक विकोपकारी प्रकरणांमध्ये वरिष्ठ सल्लागारांसह आय.सी.पी.एस. बाहेरील समुपदेशकांची व्यवस्था करण्याची तरतूद आहे आणि जिल्ह्यातील डी.सी.पी.यू., बालकाला सहाय्य करण्यासाठी समुपदेशक म्हणून नियुक्त करता येईल अशा व्यक्तींची यादी ठेवेल. यामध्ये, सरकारी किंवा खाजगी रुग्णालये आणि संस्था तसेच स्वयंसेवी संस्था यांच्याकडे नोकरीस असलेल्या मानसिक आरोग्य व्यावसायिकांचा आणि उद्दिष्ट निकषाच्या आधारे निवड केलेल्या आयसीपीएस यंत्रणेबाहेरील खाजगी व्यावसायिकांचा समावेश केला जाऊ शकतो. उक्त प्रकरणात आणखी अशी ही तरतूद आहे की, बाहेरून नेमलेल्या समुपदेशकांना, जे.जे. अधिनियमाच्या कलम ६१ (जे.जे. अधिनियम, २०१५ च्या कलम १०५) अन्वये राज्य शासनाने स्थापन केलेल्या निधीतून किंवा या प्रयोजनासाठी राज्य शासनाने उभारलेल्या अन्य कोणत्याही निधीतून मोबदला देण्यात यावा. प्रदानाचे दर, डीसीपीयूने निश्चित केल्याप्रमाणे असतील. या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन केले जात आहे किंवा कसे याची खात्री करण्यासाठी, आयुक्त, डब्ल्यूसीडी, पुणे यांना पीडित व्यक्तींना समुपदेशकांच्या सेवा देण्याच्या या मार्गदर्शक तत्त्वांची पुण्यात व राज्यातील इतर सर्व जिल्ह्यांमध्ये अंमलबजावणी केली जात आहे किंवा कसे याची खात्री करण्याची आणि दोन महिन्यांच्या आत वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याची विनंती करावी.

vii) सीडब्ल्यूसीच्या सदस्यांनी असे निदर्शनास आणून दिले की, बाहेरील बालकांना, त्यांच्या मूळ जिल्ह्यातील सीडब्ल्यूसीमध्ये स्थानांतरित करण्यासाठी रेल्वे विभागातील आरक्षण मिळण्यात आणि पोलीस विभागाकडून संरक्षण प्राप्त करण्यात त्यांना खूप अडचणींचा सामना करावा लागतो. यासंदर्भात, संबंधित रेल्वे प्राधिकाऱ्यांना अशी विनंती करण्यात यावी की, ज्यांना त्यांच्या मूळ जिल्ह्यातील सीडब्ल्यूसीकडे स्थानांतरित करणे आवश्यक आहे अशा बाहेरील बालकांसाठी प्राधान्य तत्त्वावर रेल्वे गाड्यांचे आरक्षण द्यावे. तसेच संबंधित पोलीस प्राधिकाऱ्यांना देखील अशी विनंती करण्यात यावी की, अशा बालकांना, त्यांच्या मूळ जिल्ह्याच्या सीडब्ल्यूसीसमोर सादर करण्यासाठी घेऊन जाताना संरक्षण सुविधा पुरवण्यात यावी. आयोग या प्रकरणाबाबत संबंधित रेल्वे आणि पोलीस अधिकाऱ्यांकडे आवश्यक पाठपुरावा करेल.

viii) दवाखान्यात दाखल केलेल्या बालकांच्या परिचर्येसाठी परिचरांची(attendant) पुरेशी सुविधा नसल्याचे निदर्शनास आणून दिले. दवाखान्यात दाखल केलेल्या पीडित बालकांची मानसिक व आरोग्यविषयक स्थिती नाजूक असल्याने, दवाखान्यात दाखल असताना

त्यांची योग्य काळजी घेणे आवश्यक आहे. अपर्याप्त कर्मचा-यांमुळे दवाखान्यातील परिचरांच्या सेवा, गरजा भागवण्यासाठी पुरेशा नसतात. यासंबंधात, पीडित बालकाच्या आई-वडिलांची मदत घेतली जाऊ शकते आणि त्याचप्रमाणे यासंबंधात स्थानिक स्वयंसेवी संस्थांना देखील आवश्यक सहाय्य करण्याची विनंती करता येऊ शकते.

ix) अशी चर्चा झाली की, अपराधांनी पीडित असलेल्या व्यक्तींना व त्यांच्या अवलंबितांना मदत करण्याची तरतूद असलेल्या मनोधैर्य योजनेबद्दल ब-याच हितसंबंधितांना माहिती नाही. या संबंधात बाल कायद्यांच्या बाबतीत, हितसंबंधितांमध्ये जागरूकता व संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी आयोजित केलेल्या या कार्यक्रमामध्ये या विषयाचा देखील समावेश करावा, जेणेकरून हितसंबंधितांना या योजनेबद्दल जागरूक करता येईल आणि त्यांना आवश्यक त्या कागदपत्रांसह संबंधित प्राधिकऱ्याकडे संपर्क साधून योजनेचा लाभ घेण्यासाठी पीडितांना आणि त्यांच्या नातेवाईकांना मदत व मार्गदर्शन करण्यास सक्षम होतील.

x) पोलीस कर्मचा-यांना जागृती करण्याची व संवेदनशील करण्याची दीर्घकालीन उपाययोजना म्हणून, जर नाशिक पोलीस अकादमीतील पोलिसांचा प्रशिक्षण विषयक अभ्यासक्रम(मॉड्यूल), बालस्नेही दृष्टिकोनानुसार अशी प्रकरणे हाताळण्यासाठी प्रशिक्षणार्थींना संवेदनशील करण्यावर विशेष भर देण्यासह बालकांशी संबंधित असलेल्या कायद्यांमधील, मुख्यतः पोक्सो अधिनियम, २०१२, जे.जे. अधिनियम, २०१५ व इतर कायदे यांमधील प्रशिक्षण देण्यासाठी विकसित करण्याबाबत करण्यात आली.

६. उक्त इतिवृत्तातील मजकूर विचारात घेता, क्र.सीआर१९३/२०१८-१९ /८६१, ८६२,८६३,८६४/२०१८, दि.२६ ऑक्टोबर,२०१८ च्या पत्राव्दारे, आयुक्त, समाज कल्याण विभाग, पुणे; पोलीस अधीक्षक, सांगली, संचालक, व्हीजेएनटी, ओबीसी आणि एसपीएल, ओबीसी कल्याण, पुणे आणि विभागीय रेल्वे व्यवस्थापक, पश्चिम रेल्वे, चर्चगेट, मुंबई २० यांना, आवश्यक ती कार्यवाही करण्याची आणि आयोगास अनुपालन अहवाल सादर करण्याची विनंती केली आहे.

आयोगाने स्वमग्न (Autism) व मनोधैर्य योजना अंतर्गत प्रकरणांबाबत केलेल्या काही शिफारशींचा सारांश.

❖ **प्रकरण क्रमांक १४१/२०१८-१९**

(टीप: या प्रकरणामध्ये, बालकाचे, बालकाच्या मातापित्यांचे, बालकांच्या शाळेचे नाव उघड केलेले नाही)

१. विलेपार्ले येथील एका शाळेमध्ये इयत्ता नववीमध्ये शिकत असलेल्या स्वमग्न बालकाच्या मातापित्यांनी, बी.वाय.एल.नायर रूग्णालय, मुंबई-०८ येथील मानसशास्त्र विभागाच्या स्वमग्नता केंद्राने दिलेल्या दि. २५/१०/२०१७ च्या अभिप्राय प्रमाणपत्राची प्रत जोडून त्यांच्या दि.३० मे, २०१८ च्या अर्जाव्दारे आयोगाकडे दाद मागितली असून त्यांचे म्हणणे असे आहे की, शाळेने, त्यांच्या मुलास इयत्ता नववीमध्ये (शैक्षणिक वर्ष,२०१७-१८) नापास केले होते, त्यांच्या स्वमग्न बालकास नियमानुसार परीक्षेमध्ये सवलत देण्यात आलेली नव्हती, आणि शाळेने त्यांना तोंडी स्वरूपात असे कळवले होते की, त्यांच्या मुलास एन. आय. ओ. एस. मध्ये दाखल करावे. त्यांनी आणखी असेही म्हटले होते की, त्यांच्या मुलास, शैक्षणिक वर्ष, २०१८-१९ मध्ये इयत्ता दहावीमध्ये बसू देण्यास परवानगी द्यावी.

२. उक्त तक्रारीच्या बाबतीत, दि.११/६/२०१८ च्या पत्राव्दारे, तक्रारीच्या या विवादित प्रकरणावर चर्चा करण्यासाठी दि.१८ जून,२०१८ रोजी बालकाचे माता-पिता, शाळेचे प्राचार्य आणि शिक्षण विभागाचे संबंधित शिक्षण अधिकारी यांची बैठक बोलवण्यात आली होती.

३. उक्त बालकाच्या मातापित्यांनी केलेल्या तक्रारीमध्ये सादर केलेल्या बी. वाय. एल. नायर रूग्णालय, मुंबई-०८ येथील मानसशास्त्र विभागाच्या स्वमग्नता केंद्राने दिलेल्या दि.२५/१०/२०१७ च्या अभिप्राय प्रमाणपत्राच्या प्रतीतील आशयामधून असे दिसून येते की, उक्त बालकाचे स्वमग्नता स्पेक्ट्रम विकृतीचे प्रकरण आहे, असा अभिप्राय सक्षम प्राधिकरणाने दिलेला आहे व असे निदान केले आहे. म्हणून, बैठकीमध्ये, उक्त बालकाच्या मातापित्यांना व शाळेच्या प्राचार्यांना, बालकांच्या हक्काशी संबंधित असणारे पुढील कायदे, शासन निर्णय व नियम यांच्या तरतुदी संबंधात आणि स्वमग्नता असलेल्या बालकांना शाळांनी द्यावयाच्या सवलती व सुविधा यांबाबत अवगत करण्यात आले होते:-

i) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ ,

ii) महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम,२०११,

iii) स्वमग्नता, प्रमस्तिष्क घात, मतिमंदता व बहुविकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणासाठी राष्ट्रीय विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९९९ (१९९९ चा ४४),

iv) विकलांग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ (१९९६ चा १),

v) विकलांग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५

vi) संयुक्त राष्ट्रांची विकलांग व्यक्तींच्या हक्कांबातची अभीसंधी (यु.एन.सी.आर.पी.डी.),

vii) विकलांग व्यक्तींचे हक्क अधिनियम, २०१६,

viii) संयुक्त राष्ट्रांची बाल हक्क विषयक अभीसंधी,

ix) बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५,

x) दुसऱ्या टप्प्यातील विकलांगता असलेल्यांसाठी सर्वसमावेशक शिक्षण योजना (IEDSS),

xi) सन २००७ मध्ये संयुक्त राष्ट्रांची शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटना, नवी दिल्ली यांनी प्रसिद्ध केलेली विकलांग बालकांच्या शिक्षणाच्या हक्कांबातची हस्तपुस्तिका, आणि

xii) महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने काढलेला दि.८ जानेवारी, २०१६ चा शासन निर्णय.

या बैठकीमध्ये, शाळेच्या प्राचार्यांनी असे सादर केले की, त्यांनी, नियमानुसार इयत्ता नववीच्या परीक्षेमध्ये तक्रारदार बालकास सर्व सवलती पुरविलेल्या आहेत, परंतु अभ्यासक्रमाशी जुळवून घेण्यास बालक असमर्थ असल्याने, अनुत्तीर्ण झालेले आहे. शाळेने आणखी असेही सादर केले आहे की, बालकाला इयत्ता नववीमध्ये पुन्हा प्रवेश दिला जाऊ शकतो. इयत्ता नववीमध्ये बालकाला पुन्हा प्रवेश देण्यासाठी मातापित्यांनी संमती दिली. या प्रकरणांमध्ये,शाळा निरीक्षक,बृहन्मुंबई, पश्चिम प्रक्षेत्र यांनी, दि.८/१/२०१६ च्या शासन निर्णयानुसार, स्वमग्नता असलेल्या तक्रारदार बालकास आवश्यक सवलत व सुविधा देण्यासाठी दि.११/६/२०१८ च्या पत्राव्दारे उक्त शाळेच्या प्राचार्यांना कळवलेले आहे.

❖ **प्रकरण क्रमांक १०३/२०१४**

(टीप: या प्रकरणामध्ये, बालकाचे, बालकाच्या मातापित्यांचे, बालकांच्या शाळेचे नाव उघड केलेले नाही)

१. बालकाची आई असलेल्या तक्रारदाराने, ठाणे(पश्चिम)-४००६१० येथील एका शाळेमध्ये शिकत असलेल्या तिच्या बालकाच्या शिक्षणाच्या संबंधात तिला भेडसावणाऱ्या अडचणींच्या बाबतीत, दि.९/३/२०१४ च्या अर्जाव्दारे आयोगाकडे दाद मागितली आहे. तिच्या मुख्य

विवादाचा सारांश असा आहे की, सर्व शिक्षा अभियानाच्या मदतीने तिच्या मुलाला उक्त शाळेमध्ये दाखल केलेले होते. शाळा समुपदेशकाने सुचविलेल्या सर्व उपचारांसाठी तिने तिच्या मुलाला शाळेत दाखल केले होते, शाळा, तिच्या मुलाच्या वर्तनाबद्दल तक्रार करीत आहे. शाळेकडून तिच्या मुलाकडे दुर्लक्ष केले जात होते, आणि तिच्या मुलासंबंधात मोठा वाद निर्माण करण्यासाठी अन्य पालकांना सहभागी करून घेऊन त्याव्दारे शाळेने चतुराईने परिस्थिती घडविली होती. त्याला पुढच्या वर्गात जाण्यासाठी व प्रवेशासाठी अडचणी निर्माण झाल्या होत्या आणि म्हणून प्रवेशासाठी तिने सर्व शिक्षा अभियानाकडे दाद मागितली होती. तिने आणखी असाही विवाद केला आहे की, तिच्या मुलास बसू देण्यासाठी शाळा तिला परवानगी देत नाही. आणखी असाही विवाद केला आहे की, सुरक्षारक्षकांनी तिला व तिच्या मुलाला थांबविले होते आणि असे कळविले होते की, तिच्या मुलास, शाळेच्या मुख्य परिसरामध्ये प्रवेश करण्यास परवानगी दिली जाणार नाही आणि तिच्या मुलाने विशेष शाळेमध्ये जावे. तिने आणखी असाही विवाद केला आहे की, सर्व शिक्षा अभियानाकडे तिने केलेल्या तक्रारीवरून, उक्त शाळेस नोटीस दिली होती आणि तिच्या मुलाच्या शिक्षणाशी संबंधित असणारी कागदपत्रे सादर करण्यासाठी शाळेला विचारणा केली होती, तथापि शाळेने, ती कागदपत्रे सादर केलेली नाहीत आणि म्हणून, तिच्या मुलाच्या शाळेच्या समस्येबाबत दिलासा मिळण्यासाठी आयोगाकडे दाद मागणे तिला भाग पडले होते. आणखी असाही विवाद केला आहे की, त्याच्या वर्गातील सहविद्यार्थ्यांसह गट छायाचित्र घेताना तिच्या मुलाला घेतले जात नव्हते, आणि शारीरिक शिक्षण तासामध्ये (पि.टी.) तिच्या मुलाला खेळाच्या मैदानावर जाण्यास परवानगी दिली जात नव्हती, आणि दि.२२/११/२०१७ रोजी प्राचार्यांनी व शाळेच्या कर्मचाऱ्यांनी तिला असे कळविले की, तिच्या मुलास शाळेत पाठवू नये आणि पुढच्या दिवशी, शाळेच्या पहारेकऱ्याने शाळेचा गेट कुलूपबंद केले. आणखी असाही विवाद केला आहे की, तज्ज्ञांनी शिफारस केल्याप्रमाणे, तिचा मुलगा नियमितपणे त्याचे उपचार (गृह उपचार) घेत आहे आणि त्यास चांगला प्रतिसाद देत आहे. असे असले तरी, सदर बाब मान्य करण्यास शाळा तयार नाही. आणखी असाही विवाद केला आहे की, आयोगाकडे दाद मागून देखील शाळेने तिच्या मुलाचा स्वीकार केलेला नाही आणि ते प्रत्येक दिवशी तिच्या मुलाचा छळ करीत आहेत, उर्वरित मुले कार्यक्रमासाठी उपस्थित राहण्याकरिता प्रेक्षागृहात जातेवेळी तिच्या मुलाला वर्ग खोली आतून बंद केली जाते.

२. प्रतिवादी क्रमांक १, शाळेला व प्रतिवादी क्रमांक २ शिक्षण विभागाच्या संबंधित अधिकाऱ्यास नोटिसा दिल्या होत्या. तसेच आयोगाच्या नामिकेवरील (panel) बा

विशेषतज्ज्ञ, डॉ. समीर दलवाई यांना अर्जदाराच्या मुलाची तपासणी करण्यास देखील सांगितले होते आणि त्यानुसार त्यांनी, दि.१४/१२/२०१७ रोजी त्यांचा अहवाल सादर केला आहे. अर्जदार क्षक्षक्षक्ष च्या मुलाच्या निरीक्षणाच्या बाबतीत, जिल्हा समन्वयक, मानसशास्त्रज्ञ, पाच विशेष शिक्षक यांचा समावेश असणाऱ्या सात तज्ज्ञांनी शिक्षण अधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, ठाणे यांना सादर केलेल्या दि.२७/१/२०१४ च्या अहवालाची प्रत, देखील अभिलेखावर आहे. शाळा प्राधिकरणांनी, दि.९/११/२०१७, २३/११/२०१७ व १७/११/२०१८ च्या उत्तरादाखल त्यांची प्रतिज्ञापत्रे दाखल केलेली आहेत.

३. आयोगाच्या नामिकेवरील (panel) बाल विशेषतज्ञ, डॉ. समीर दलवाई, एमडी, डीसीएच, डीएनबी,एफसीपीएस,एलएलबी, विकासात्मक बालरोग तज्ञ यांच्या दि.१४/१२/२०१७ च्या अहवालानुसार, अर्जदाराचे बालक, क्षक्षक्षक्ष यास, त्यांच्या कौटुंबिक डॉक्टरांनी उम्मीद चाइल्ड विकास केंद्र यांच्याकडे शिफारस केले होते तेव्हा, ते २ वर्षे व नऊ महिन्यांचे असताना, त्यास स्वमग्नता असल्याचे निदान झाले होते, आणि तेथे त्यास सुमारे एक वर्षासाठी विहित उपचार (थेरपी) मिळाला होता. त्यांनी आणखी असेही प्रतिपादन केले आहे की, मातापित्यांच्या अहवालानुसार, उक्त बालकास श्रेणी ५ मधील स्वमग्नतेचा उपचार (थेरपी) मिळालेला नाही. उक्त बालक श्रेणी १ मधील असल्याने, शल्यचिकित्सकाकडून (physician) त्याच्याकडे लक्ष दिले गेले नाही किंवा औषधोपचार केला गेला नाही किंवा श्रेणी ५ मध्ये असताना उपचारात्मक औषधोपचारार्थ हस्तक्षेप केलेला नाही. माता-पित्यांना, संबंधित प्राधिकरणाकडून प्रमाणपत्र किंवा निर्धारण अहवाल प्राप्त करण्यास नकार दिलेला आहे. आयोगाच्या नामिकेवरील (panel) बाल विशेषतज्ञ, डॉ. समीर दलवाई यांनी अंतिमतः खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे:-

- **XXXXX is a 14 year 10 month old child with AUTISM and needs substantial support. He will need a detailed multidisciplinary evaluation and assessment for his developmental concerns and an intense intervention interdisciplinary Program. I am unable to understand why he has not received regular intervention over the past years as he would have benefited with the same and he will need regular professional intervention going ahead. This may include medications for attention and anxiety to help him cope better in an inclusive setting. His intervention program should include various**

**therapies in a measured, documented and goal bound manner, with a dynamic approach, so as to modify them as and when XXXX shows improvement or concerns. He needs substantial support for schooling which, in my opinion, will be a challenge unless behavior and emotional concerns are addressed as stated here.**

४. प्रकरण क्रमांक २०१२-१३ चे १८७ तत्सम प्रकरणामध्ये आयोगाने संमत केलेल्या आदेशाचा संदर्भ देऊन डॉ. दलवाई यांनी त्यांच्या अहवालामध्ये, असे नमूद केले की, विशेष गरज असलेल्या एखाद्या बालकाचा नियमित शाळेमध्ये अंतर्भाव करण्याच्या बाबतीत, पुढील तीन मुद्दे कायम करण्यात आलेले आहेत:-

१. जेव्हा बालकांचे वर्तन स्वतःच्या अथवा इतरांच्या सुरक्षेस धोकादायक नसेल तेव्हा, आवश्यक असेल तेव्हा, एखाद्या आश्रयकारी शिक्षकाच्या (शाडो टीचर्स) बालकास शाळेत जाण्यास परवानगी देता येईल.

२. शाळेने, नियमित कर्मचारी वर्ग तसेच संसाधन कर्मचारी वर्ग या दोन्हींचे सहाय्य उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

३. मातापित्यांनी त्यांच्या मुलाच्या गरजेनुसार त्यांच्या शल्यचिकित्सकाने (physician) व थेरेपी टीमने दिलेल्या सल्ल्यानुसार, अतिरिक्त थेरेपी व उपचार देण्याची गरज आहे.

५. डॉक्टर दलवाई यांनी त्यांच्या अहवालामध्ये,"निष्कर्ष" या मथळ्याखाली परिच्छेद क्रमांक ६ येथे आणखी खालीलप्रमाणे प्रतिपादन केले आहे:-

i. As far as possible, every child should be placed in a regular school with possible accommodations, including (but not limited to) Shadow teacher.

ii. There is an equitable if not equal responsibility between both -a) parents and community; and, -b) the education system - to work together for the benefit of the child and in the best interest of the child.

iii. The school cannot deny Right to education to a Child with special needs and will make all provisions possible to enable the inclusion of the Child with Special needs.

iv. The Parents will ensure maximum possible medical and intervention support for their child from time to time, especially for services not available in the said school, and co-operate with the school to secure as much assistance from Government and other sources for the benefit of the child.

६. दि.२०-१२-२०१३ व ०६-०१-२०१४ रोजी जिल्हा समन्वयक, मानसशास्त्रज्ञ, पाच विशेष शिक्षक यांचा समावेश असणाऱ्या सात तज्ज्ञांनी केलेल्या कु. क्षक्षक्षक्ष च्या मुलाच्या निरीक्षणाच्या बाबतच्या प्रतिवादी क्रमांक २, शिक्षण अधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, ठाणे यांना सादर केलेल्या दि.२७/१/२०१४ च्या अहवालाची प्रत अभिलेखावर आहे. तज्ज्ञांच्या मराठी मधील अहवालातील निष्कर्ष व सारांश खालील प्रमाणे आहे.

१. हे ठळकपणे दिसून आले आहे की, शाळा आणि पालक यांच्यातील मतभेदांमुळे चर्चेचा केंद्रबिंदू हा विशेष गरज असलेल्या मुलाऐवजी, श्रेष्ठत्व आणि अहंकार या समस्या असल्याचे दिसून येते. त्यामुळे कोण चूक आणि कोण बरोबर या वादात, मुलाच्या आयुष्यातील वाढ आणि विकासाची महत्त्वाची वर्षे निघून जातात. त्यामुळे पालक आणि शाळा या दोघांनीही आपल्या अहंकाराच्या समस्या बाजूला ठेवून मुलांचे हिताची जपणूक करत, कार्य करणे आवश्यक आहे.
२. चर्चेदरम्यान पालकांनी हे मान्य केले की, मानसोपचार तज्ज्ञांनी सांगितलेली औषधे मुलाला ठराविक वेळेवर आणि सांगितल्याप्रमाणे दिली जात नाहीत. त्यामुळे दैनंदिन जीवनात घरी , रोजच्या रोज थेरपी आणि वर्तणूक सुधारणेचा नियमितपणे वापर करणे आवश्यक आहे. नियमितपणे निर्धारित औषधे देणे देखील आवश्यक आहे.
३. मुलाच्या मानसिक अडचणींबद्दल पालकांनी त्यांची स्वीकृती वाढवणे, त्यांना मुलाच्या गरजा समजून घेण्यास आणि त्या पूर्ण करण्यास सक्षम करणे आवश्यक आहे. मुलाचा विकास त्यांच्या स्वतःच्या पद्धतीनुसार होईल असा पालकांनी आग्रह धरू नये. जर मुलाला योग्यरित्या हाताळले गेले तर तो शाळेतील इतर ऑटिझम मुलांप्रमाणे लक्षणीय विकास देखील दर्शवू शकतो.
४. या संदर्भात राष्ट्रीय मानसिक आरोग्य संस्था (NIMHANS) बंगलोर द्वारे आयोजित ऑटिझम असलेल्या मुलांच्या पालकांसाठी पालकांनी प्रशिक्षण कार्यक्रम घ्यावा असे सुचवले जाते.
५. शाळेतील थेरपिस्टने उपलब्ध करून दिलेल्या नोंदीवरून असे दिसून येते की, पालकांनी मुलाच्या "औपचारिक मूल्यमापन" साठी संमती दिली नाही आणि त्यामुळे मुलाच्या

उपचाराची योजना, तीव्रता आणि त्याला येणाऱ्या त्रासांची पातळी लक्षात घेऊन तयार केले गेले नाही. त्यासाठी थेरपिस्टच्या माध्यमातून समुपदेशन आणि थेरपीच्या नवीन पद्धती विकसित करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यामुळे असे देखील दिसून येते की, थेरपी उपचार आठवड्यातून एकदा देण्याऐवजी दररोज द्यावे.

६. सामूहिक चर्चेदरम्यान पालकांनी आईला मुलासोबत व वर्गात बसण्याची परवानगी मिळावी यासाठी निवेदन सादर केले. या संदर्भात शाळा प्रशासनाने बैठकीत व्यवस्थापन समितीशी चर्चा केली. पालकांनी मुलाला शाळेच्या गेटवर सोडावे आणि त्यानंतर मूल शाळेच्या आवारातून बाहेर पडेपर्यंत शाळा मुलाची संपूर्ण जबाबदारी घेण्यास तयार आहे, असेही मुख्याध्यापकांनी स्पष्टपणे सुचवले होते. त्यामुळे पालकांनी शाळेने दिलेल्या या सुविधेचा लाभ घ्यावा, असे दिसते.

७. थेरपिस्टने सर्वसमावेशक आणि वारंवार समुपदेशन करणे आवश्यक आहे. थेरपीच्या सत्रादरम्यान आईच्या हस्तक्षेपामुळे मुलाच्या विकासात अडथळे निर्माण होतात आणि त्यामुळे असा हस्तक्षेप कमी करण्यासाठी समुपदेशन होणे आवश्यक आहे. थेरपीच्या वेळी आईला तेथे बसून निरीक्षण करण्याबाबत सुचवावे जेणेकरून आई त्या निरीक्षणाचा मुलाचा सर्वांगीण विकास आणि नियंत्रण सुलभ करण्यासाठी घरी वापर करू शकेल.

८. पालकांनी मुलाच्या "औपचारिक मूल्यमापन" साठी संमती दिली पाहिजे आणि त्यांची सक्रिय आणि आवश्यक भूमिका समजून घेतली पाहिजे. तसेच मुलाच्या विकासासाठी ती पूर्ण केली पाहिजे. एकंदरीत असे दिसून येते की, पालक आणि शाळा या दोघांनीही मुलाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांची भूमिका समजून घेतली पाहिजे आणि मुलाच्या पुनर्वसनातील अडथळे दूर करण्यासाठी योग्य परस्पर समंजसपणाने कार्य केले पाहिजे.

९. घरातील मुलाच्या वर्तनाचे निरीक्षण करण्यासाठी, घरी अचानक भेट देणे आवश्यक आहे. सारांश, जर पालक आपली कर्तव्ये आणि भूमिका योग्य रीतीने पार पाडण्यास तयार असतील आणि चर्चेदरम्यान शाळेने मान्य केल्याप्रमाणे, शाळेने मुलाची सर्व जबाबदारी घेण्यास संमती दिली असेल, तर असे दिसते की या मुलाची योग्य काळजी घेतली जाऊ शकते. त्यामुळे मुलाच्या भेटीचा अहवाल अवलोकन आणि आवश्यक कार्यवाहीसाठी सादर केला.

. प्रतिवादी शाळेच्या प्राचार्यांनी दाखल केलेल्या उत्तरामधील म्हणणे (युक्तिवाद) विचारात घेतल्यानंतर, असे दिसून आले आहे की, उक्त बालकांच्या व त्याच्या मातापित्यांच्या बाबतीत, उक्त शाळेचे मुख्य गाऱ्हाणे खालीलप्रमाणे होते :-

- व्यवसाय उपचार (occupational therapy) करण्यासाठी उक्त बालकाला घेऊन जाण्यास मातापित्यांनी नकार दिलेला आहे.

- जेव्हा बालकाला थेरपीसाठी उमेद केंद्राकडे पाठवले होते तेव्हा घेतलेल्या थेरपीचे अहवाल त्यांनी सादर केलेले नाही.
- मातापित्यांनी बालकास नियमित थेरपी व विहित केलेल्या औषधांची व्यवस्था करणेबाबत अत्यंत विसंगत कथन केले आहे.
- बालकाचे वर्तन, व्यवस्थापन न करण्यायोग्य झाले असल्याने, सतत प्रौढ व्यक्तीने देखरेख करणे आवश्यक आहे. उक्त बालकांच्या विदारक वर्तनाच्या कारणाने अन्य विद्यार्थ्यांच्या पालकांकडून तक्रारी आलेल्या आहेत.
- विविध औषधोपचारपध्दती व थेरेपी (उपचार) यांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात माता-पित्यांकडून समजूतदारपणा दाखवण्याचा व सहकार्याचा अभाव आहे.
- उक्त बालकासोबत मातेला वर्गामध्ये बसून देण्यासाठी मातापित्यांचा आग्रह आहे आणि पुरूष आश्रयकारी शिक्षकाची (shadow teacher) नेमणूक करण्याच्या पर्यायाचा विचार करण्यास त्यांनी नकार दिला. शाडो टीचरला आवश्यक असलेले कौशल्य किंवा प्रशिक्षण बालकाच्या आईला नाही आणि उक्त बालकाची प्रत्यक्षपणे व्यवस्था करणे तिला शक्य नाही.
- बालकाची शैक्षणिक प्रगती कमी झालेली आहे.
- उक्त बालकाचे माता-पिता, औषधे देण्यामध्ये व वेळोवेळी उपचार करण्यामध्ये आणि फिजिशियन व थेरेपी टीमने सुचविल्याप्रमाणे अतिरिक्त थेरेपी व उपचार करण्यासाठी सहकार्य करीत नाहीत.
- उक्त बालकाचे माता-पिता, तज्ञांकडून उक्त बालकाचे "औपचारिक मूल्यमापन" करून घेण्यासाठी आणि निदान, इत्यादीसंबंधात सक्षम प्राधिकरणाकडून "अभिप्राय प्रमाणपत्र" मिळवण्यासाठी सहकार्य करीत नाहीत.
- बालकास शैक्षणिक सवलती देणे आणि परीक्षेमध्ये आधारभूत उपाययोजना करणे शाळेला शक्य होण्यासाठी सक्षम प्राधिकरणाकडील "प्रमाणीकरण प्रक्रियेचे" (certification process) प्राप्त करण्याच्या प्रक्रियेमध्ये सहकार्य करीत नाहीत.

८ तक्रारदार व प्रतिवादी शाळा यांचे म्हणणे व सादरीकरण, त्यांनी दाखल केलेले दस्तऐवज, अभिलेखावरील तज्ञांचे अहवाल आणि पुढील संबंधित तरतुदी विचारात घेता.

१) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ ,

२) महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम,२०११,

३) स्वमग्नता, प्रमस्तिष्क घात, मतिमंदता व बहुविकलांगता असलेल्या व्यक्तींच्या कल्याणासाठी राष्ट्रीय विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९९९ (१९९९ चा ४४),

४) विकलांग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ (१९९६ चा १),

५) विकलांग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५

६) संयुक्त राष्ट्रांची विकलांग व्यक्तींच्या हक्कांबातची अभिसंधी (यु.एन.सी.आर.पी.डी.),

७) विकलांग व्यक्तींचे हक्क अधिनियम, २०१६,

८) संयुक्त राष्ट्रांची बाल हक्क विषयक अभिसंधी,

९) बाल हक्क संरक्षण आयोग अधिनियम, २००५,

१०) दुसऱ्या टप्प्यातील विकलांगता असलेल्यांसाठी सर्वसमावेशक शिक्षण योजना (आय.इ.डी.एस.एस.),

११) सन २००७ मध्ये संयुक्त राष्ट्रांची शैक्षणिक, वैज्ञानिक व सांस्कृतिक संघटना, नवी दिल्ली यांनी प्रसिद्ध केलेली विकलांग बालकांच्या शिक्षणाच्या हक्कांबातची हस्तपुस्तिका, आणि

१२) महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने काढलेला दि. ८ जानेवारी, २०१६ चा शासन निर्णय.

विकलांग बालकांचे हक्क, स्वमग्नता सहन करणाऱ्या बालकांचे शिक्षण, सुविधा, सवलती, उपचार, थेरेपी, इत्यादींसंबंधीचे हक्क याबाबतीत, आयोगासमोर निर्णयार्थ पुढील मुद्दे उपस्थित झाले असून त्याबाबत, चर्चा केलेला विरुद्धपक्षांचा युक्तिवाद (म्हणणे), अभिलेखावरील दस्तऐवज, तज्ज्ञांचे अहवाल, उपरोक्त कायदे, परिनियम, मार्गदर्शक तत्त्वे, शासन निर्णय विचारात घेऊन यातखाली नमूद केल्याप्रमाणे उत्तरे देण्यात आली :-

१. तक्रारदाराचे बालक, कुमार क्षक्षक्षक्ष हे सकृत्दर्शनी स्वमग्नता असलेले बालक असल्याचे दिसून येते किंवा कसे.

उत्तर - होकारार्थी.

२. कुमार क्षक्षक्षक्ष याचे स्वतःला व इतरांनाही हानिकारक होईल असे असामान्य वर्तन केल्याचे दिसून आले आहे का?

उत्तर - होकारार्थी.

३. उक्त बालक,कुमार क्षक्षक्षक्ष याचेसाठी आश्रयकारी शिक्षक (shadow teacher) उपयुक्त ठरेल किंवा कसे?

उत्तर - होकारार्थी, जर वैद्यकीय तज्ञ, योग्य मूल्यमापन केल्यावर, उक्त बालक पुढील सर्व समावेशक शिक्षणासाठी प्रतिवादी शाळेमध्ये जाण्यास सक्षम आहे अशा निष्कर्षाप्रत आले असतील तर.

४. तक्रारदाराचे बालक, कुमार क्षक्षक्षक्ष हे, सकृद्दर्शनी स्वमग्नता असलेले बालक असल्याचे दिसून आले असेल तर उक्त बालकाच्या सर्वोच्च हितासाठी कोणती कार्यवाही अवलंबणे आवश्यक आहे?

उत्तर - उपरोक्त मुद्द्यांची उत्तरे विचारात घेता,उक्त बालक, स्वमग्नता सहन करीत असल्याने, उक्त बालकांच्या शिक्षणाचा हक्क बाधित होऊ नये याची सुनिश्चित करण्यासाठी आणि उक्त बालकास, योग्य वैद्यकीय उपचार, थेरेपी व पुढील योग्य शिक्षण मिळण्याची सुनिश्चित करण्यासाठी सदर बालकाचे सर्वोच्च हित विचारात घेऊन आयोगाने, ५/६/२०१८ रोजी पुढील शिफारसी केल्या आहेत:-

१. प्रतिवादी क्रमांक १ शाळा, औपचारिक मूल्यमापनासाठी व अभिप्राय प्रमाणपत्र मिळवण्यासाठी आणि योग्य “प्रमाणीकरण प्रक्रियेसाठी” उक्त बालकास,नियमानुसार यथोचित कार्यपद्धतीचे पालन करून, ऑटीझम डायनॅमिक इंटर्वेंशन( एडीआय), सेंटर फॉर ऑटीझम, डिपार्टमेंट ऑफ सायकॅट्री, बी. बाय. एल.नायर धर्मादाय रुग्णालय आणि टी. एन. वैद्यकीय महाविद्यालय, डॉक्टर ए.एल. नायर मार्ग, मुंबई-४०० ००८ कडे पाठवतील.

२. तक्रारदार व प्रतिवादी क्रमांक २, उपरोक्त “प्रमाणीकरण” प्रक्रियेमध्ये आणि उक्त बालकास, सदर प्रक्रियेत रुग्णालयामध्ये पाठवण्यासाठी प्रतिवादी क्रमांक १ शाळेला व उपरोक्त रूग्णालयाला सर्वतोपरी सहकार्य करतील.

३.उपायुक्त रुग्णालय,ऑटीझम डायनॅमिक इंटर्वेंशन( एडीआय), सेंटर फॉरऑटीझम, डिपार्टमेंट ऑफ सायकॅट्री, बी. बाय.एल. नायर धर्मादाय रुग्णालय आणि टी. एन. वैद्यकीय महाविद्यालय, डॉक्टर ए.एल. नायर मार्ग, मुंबई-४०० ००८ यास:उक्त बालकाची प्रमाणीकरण प्रक्रिया शीघ्रतेने करण्याची, आणि शक्य तितक्या लवकर अहवाल सादर करण्याची,

- जर उक्त बालकाचे, "स्वमग्नता" विकृतीचे प्रकरण म्हणून निदान झाले असेल तर, उपचारपध्दती व औषध उपचार या संदर्भात उक्त बालकांच्या माता-पित्यांना सल्ला देण्याची,
- उक्त बालक, प्रतिवादी क्रमांक १ शाळेमध्ये, किंवा अन्यथा विशेष शाळेमध्ये,पुढील सर्व समावेशक शिक्षणासाठी पात्र आहे किंवा कसे, यासंबंधी अभिप्राय देण्याची,विनंती केली आहे.

४. जर बालक, प्रतिवादी क्रमांक १ शाळेमध्ये पुढील सर्व समावेशक शिक्षणासाठी पात्र आहे असा अभिप्राय असलेला उपरोक्त रुग्णालयाचा अहवाल असेल तर, उक्त बालकासाठी मातापित्यांच्या खर्चाने एक प्रशिक्षित आश्रयकारी पुरुष शिक्षक (shadow teacher) नियुक्त करणयात यावा आहे.प्रतिवादी क्रमांक १ शाळा, महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दि.१८ जानेवारी, २०१६ च्या शासन निर्णयामध्ये तरतूद केल्याप्रमाणे उक्त बालकास अशा सर्व सुविधा पुरवील.

५. जर उपरोक्त रुग्णालयाचा अहवाल, उक्त बालकाचे पुढील सर्वसमावेशक शिक्षण,प्रतिवादी क्रमांक १ शाळेमध्ये करण्याच्या बाजूने नसेल तर, ज्या शाळेची, वर्तन विषयक समस्या असलेल्या बालकांसाठी विशेष करून संरचना केलेली आहे अशा यथोचित शाळेमध्ये उक्त बालकास दाखल करण्याचा सल्ला कुमार क्षक्षक्षक्ष याच्या माता-पित्यांना देण्यात येत आहे आणि उक्त बालक,कुमार क्षक्षक्षक्ष यास यथोचित शिक्षण मिळणे शक्य व्हावे यासाठी त्याला सर्व सुविधा पुरविण्यासाठी राज्य शासनाला देखील निदेश देण्यात येत आहेत.

६. जर प्रतिवादी क्रमांक १ शाळेमध्ये, कुमार क्षक्षक्षक्ष याचे पुढील सर्व समावेशक शिक्षण नियमितपणे चालू ठेवता येईल असा अभिप्राय असलेला उपरोक्त रुग्णालयाचा अहवाल असेल तर, राज्य शासनाचा शिक्षण विभाग, नियम व विनियम यानुसार आणि दुसऱ्या टप्प्यातील विकलांगता असलेल्यांसाठी सर्वसमावेशक शिक्षण योजना(IEDSS),२००९-१० नुसार, जे सहाय्य विकलांग बालकांना, विशेष गरजा असलेल्या बालकांना पुरविण्याची आवश्यकता आहे असे आवश्यक ते सर्व सहाय्य शाळेमध्ये उक्त बालकास पुरविण्यात यावे.

७. तक्रारदार/बालकाचे माता-पिता, उपरोक्त रुग्णालयाने वेळोवेळी सल्ला दिल्याप्रमाणे,बालकास आवश्यक वैद्यकीय उपचार, औषधोपचार, व्यवधान सहाय्य आणि थेरेपी पुरवील, आणि डॉक्टरांनी सल्ला दिल्याप्रमाणे नियमित पाठपुरावा करतील. ते, प्रतिवादी क्रमांक १ शाळेमध्ये उपलब्ध नसलेल्या सेवा पुरवतील आणि उक्त बालकाच्या सर्वोत्तम हितार्थ व लाभासाठी शासनाकडून व अन्य स्त्रोतांकडून सहाय्य मिळवण्यासाठी उक्त शाळेला सहकार्य करतील.

८. या शिफारशींची प्रत, माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी सर्व संबंधितांना पाठवण्यात यावी.

८. उक्त शिफारशींच्या प्रती, माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी तक्रारदारास, प्रतिवादी शाळेस, शिक्षण अधिकारी, (माध्यमिक), जिल्हा परिषद, ठाणे यांना, मुख्य समन्वयक,ऑटीझम डायनॅमिक इंटर्वेशन (एडीआय), सेंटर फॉरऑटीझम, डिपार्टमेंट ऑफ सायकॅट्री, बी. बाय. एल. नायर धर्मादाय रुग्णालय आणि टी. एन. वैद्यकीय महाविद्यालय, डॉक्टर ए.एल. नायर मार्ग, मुंबई-४०० ००८ यास पाठवल्या आहेत.

मूळ इंग्रजी आदेशांचा मराठी अनुवाद

### ❖ प्रकरण क्रमांक. ५३/२०१७

१. तिच्या स्वत: च्याच काकांनी बलात्कार केलेल्या सात वर्षांच्या बलात्कार पीडित व्यक्तीस शक्य असलेली सर्व मदत देण्याच्या आणि तिचे शिक्षण, वैद्यकीय सहाय्य व आर्थिक मदत करण्यासाठी आवश्यक ती कारवाई करण्याच्या विनंतीसह या प्रकरणासंबंधी जनरल व्ही. पंजिकर यांनी भारत सरकारच्या महिला व बाल विकास मंत्रालयास पाठवलेला व त्यांच्याकडून प्राप्त झालेला ई-मेल मा.अध्यक्ष, राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोग, नवी दिल्ली यांनी, आयोगाला पाठविला होता.

२. महिला व बाल विकास विभाग,पुणे व जिल्हाधिकारी, पुणे आणि अध्यक्ष, मनोधैर्य समिती यांना, या प्रकरणाबाबत सद्यस्थिती अहवाल पाठविण्यास व पीडित मुलीला आवश्यक सहाय्य करण्यास कळविले होते.

३. आयोगाने या प्रकरणाची दखल घेतली, आणि जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पुणे,वरिष्ठ पी.आय., मुगांव पोलीस स्टेशन, पीडितेचे वडील यांना नोटीस बजावली. दि.१४/६/२०१७ रोजी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पुणे यांच्या कार्यालयातील

परिविक्षा अधिकारी उपस्थित झाले आणि जेव्हा घटना घडली होती तेव्हा, पीडितेचे वय पाच (प्रारंभ) वर्ष होते असे नमूद करणारा अहवाल दि.१३/६/२०१७ रोजी अहवाल सादर केला. या पीडितेचे आई वडील पूर्वीच्या ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी स्थानांतरित झालेले आहेत आणि आता ते मुळशी, तालुका, जि. पुणे मधील दुसऱ्या गावात राहत आहेत. पीडितेचे वडील रोजंदारीवर मजुरी करतात आणि आई कपडे व भांडी धुण्यासाठी घरगुती मदत म्हणून काम करत आहे. पीडित मुलीच्या आई-वडिलांनी अशी माहिती दिली की, पीडितेला आता कोणत्याही वैद्यकीय मदतीची गरज नाही आणि तिची काळजी घेण्यास ते सक्षम आहेत आणि हाल-अपेष्टांमधून मुक्त होण्यासाठी त्यांना आर्थिक मदतीची आवश्यकता आहे. पीडित मुलगी, मुळशी, तालुका, जि. पुणे येथील प्राथमिक शाळेत इयत्ता दुसरी मध्ये शिकत आहे.तिचे वय आता ९ वर्षे आहे आणि आरोपींवरील फौजदारी खटला न्यायालयासमोर दाखल आहे आणि आरोपी तुरूंगात आहे. असे देखील कळविण्यात आले आहे की, 'मनोधैर्य' योजनेंतर्गत सहाय्य मिळण्यासाठी पीडित मुलीचे प्रकरण, दि.२५/४/२०१७ रोजी जिल्हाधिकारी व जिल्हा दंडाधिकारी, पुणे यांच्या अध्यक्षतेखालील संबंधित जिल्हा समितीसमोर ठेवण्यात आले होते. तथापि, अभिकथित घटना, दि.१३/८/२०१३ रोजी घडली असल्याने, दि.२१/१०/२०१३ च्या शासन निर्णयानुसार "मनोधैर्य" योजना दि.२/१०/२०१३ पासून घडलेल्या घटनांच्या संदर्भात लागू आहे या कारणावरून उक्त समितीने पीडितेचा दावा फेटाळला होता. उक्त अहवाल विचारात घेता, सदर प्रकरण "मनोधैर्य" योजनेंतर्गत येत नसल्यामुळे, दि.१४/६/२०१७ रोजी प्रकरण, अंतिम शिफारशींसाठी बंद करण्यात आले होते आणि आर्थिक मदत देण्यासाठी पीडित व्यक्तीला मदत करण्यासाठी आयोग इतर शक्यतांचा शोध घेत होते.

४. उक्त मनोधैर्य योजनेच्या बाबतीत, मा.मुंबई उच्च न्यायालयाने, डब्ल्यू.पी.क्रमांक २९५१/२०१६ प्रकरणी, फौजदारी अपील क्र.२०१५ चा ८८४ मधील मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या आधारे, तसेच गोवा राज्य, रुपये १० लाख इतकी आर्थिक नुकसान भरपाई देत आहे याची दखल घेऊन, दि.८/३/२०१७ च्या आदेशान्वये, राज्य शासनाला नवीन योजना विकसित करण्यास सांगितले. त्याचप्रमाणे, मा. मुंबई उच्च न्यायालयाने, डब्ल्यू.पी.क्र.२१६५/२०१४ व ३१२३/२०१५ या दोन प्रकरणी, राज्य सरकारला "मनोधैर्य" योजनेखालील दि.०२/१०/२०१३ ची निर्बंधित तारीख (कट ऑफ डेट) काढण्याचे आणि उक्त योजनेखालील पात्रता निकषांमध्ये बसत असलेल्या प्रकरणी, पीडित महिलांना व बालिकांना, भूतलक्षी प्रभावाने नुकसान भरपाई प्रदान करण्याचे आदेश दिले. म्हणून, महाराष्ट्र शासनाच्या महिला आणि बाल विकास विभागाने, दि.१/८/२०१७ च्या शासन निर्णयान्वये

"मनोधैर्य" योजनेखालील आर्थिक सहाय्याच्या व पुनर्वसनाच्या पात्रता निकषांमध्ये सुधारणा करण्यासंबंधी नव्याने निर्देश दिले आहे. दि.१/८/२०१७ च्या उक्त शासन निर्णयानुसार नुकसान भरपाईची रक्कम पूर्वीच्या ३ लाखांवरून १० लाख रुपये इतकी वाढवण्यात आली आहे. उक्त योजना राबविण्याचे अधिकार, आता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या जिल्हा फौजदारी दुखापत मदत व पुनर्वसन मंडळाऐवजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे देण्यात आले आहेत. दि.३१/१२/२००९ पासून पात्र असलेली पोक्सो अधिनियम, २०१२ अन्वये प्रवर्ग १(ए) व (बी) मध्ये मोडणारी बलात्काराची प्रकरणे, प्रवर्ग २(ए) व २(बी) मधील विवरणपत्रे व प्रवर्ग ३(ए) मध्ये मोडणारी ॲसिड हल्ल्याची प्रकरणे यासाठी, दि.२१ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयाच्या निकषानुसार, मनोधैर्य योजनेंतर्गत आर्थिक नुकसान भरपाई दिली जाईल. घटनेच्या वेळी एफ.आय.आर. दाखल केला असेल तरच केवळ आर्थिक नुकसान भरपाई प्रदेय असेल.

५. दि.१/८/२०१७ च्या उपरोक्त शासन निर्णयाला, मा. मुंबई उच्च न्यायालयामध्ये, पी.आय.एल. क्र.८७/२०१७ प्रकरणी, आव्हान देण्यात आले होते. मा. मुंबई उच्च न्यायालयाने, फौजदारी रिट याचिका क्र. ३५/२०१३ व इतर प्रकरणी, आपला दि.१२/१०/२०१७ रोजीचा आदेश विचारात घेऊन, उपरोक्त पी.आय.एल.मधील तक्रारींचे पुनर्विलोकन करताना, बलात्कार प्रकरणातील, पोक्सो अधिनियमा खालील प्रकरणांमधील व ॲसिड हल्ल्यातील पीडितांसाठी आदर्श (मॉडेल) योजना तयार करण्यासाठी समिती गठीत करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार समिती गठीत करण्यात आली व उक्त समितीने आदर्श (मॉडेल) योजना तयार केली. या पार्श्वभूमीवर, शासनाने, "सुधारित नवीन मनोधैर्य योजने" च्या बाबतीत, दि.३०/१२/२०१७ रोजी आणखी एक शासन निर्णय निर्गमित केला. दि.३०/१२/२०१७ च्या उक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक २ चा मजकूर विचारात घेता, उक्त "सुधारित नवीन मनोधैर्य योजना" भूतलक्षी प्रभावाने लागू नाही; तथापि, ती आधीच्या घटनांच्या प्रलंबित प्रकरणांना लागू असेल. उक्त शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र. २ (अ) मध्ये आणखी असेही नमूद आहे की, "सुधारित नवीन मनोधैर्य योजना" ही, दि.२१/१०/२०१३ रोजी असलेल्या निकषांप्रमाणे, जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या जिल्हा फौजदारी दुखापत मदत व पुनर्वसन मंडळाव्दारे तपासणी करण्यात आलेल्या व फेटाळण्यात आलेल्या प्रकरणांना लागू असणार नाहीत आणि अशी प्रकरणे पुन्हा विचारात घेतली जाऊ शकणार नाहीत. दि.३०/१२/२०१७ च्या उक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३ मध्ये असे नमूद केले आहे की, मा. मुंबई उच्च न्यायालयाने, डब्ल्यू. पी. क्र.२१६५/२०१४ व ३१२३/२०१५ या

प्रकरणी, मनोधैर्य योजनेच्या दि.२१.१०.२०१३ च्या निकषानुसार, दि.३१/१२/२००९ पासून पात्र असलेल्या प्रकरणी भूतलक्षी प्रभावाने आर्थिक सहाय्य देण्याबाबत, दिलेले आदेश विचारात घेता, शासनास, धोरणात्मक निर्णय घेऊन स्वतंत्र आदेश काढता येतील.

६. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पुणे यांनी सादर केलेल्या दि.१३/६/२०१७ च्या अहवालानुसार, जिल्हाधिकारी पुणे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या जिल्हा फौजदारी दुखापत मदत व पुनर्वसन मंडळाने, अभिकथित घटना, दि.१३/८/२०१३ रोजी घडली आहे या कारणास्तव आणि आधीच्या दि.२१/१०/२०१३ च्या शासन निर्णयानुसार, उक्त योजना, दि.२१/१०/२०१३ रोजी व तेव्हा पासून घडलेल्या घटनांसाठी लागू केलेली असल्याने, आपल्या दि.२५/४/२०१७ या बैठकीमध्ये,पीडितेच्या घटनेचा विचार केला नाही. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पुणे यांनी, त्याच्या दि.१३/६/२०१७ रोजी दिलेल्या अहवालात असे स्पष्टपणे नमूद केले आहे की, संरक्षण अधिकारी, ता. मुळशी, जि. पुणे यांच्या अहवालानुसार, पीडितेच्या आई-वडिलांनी असे सांगितले आहे की, पीडितेला आता कोणत्याही वैद्यकीय मदतीची गरज नाही आणि तिची काळजी घेण्यास ते सक्षम आहेत; परंतु त्यांना सोसाव्या लागलेल्या हालअपेष्टांची भरपाई करण्यासाठी त्यांना मदत करण्याकरिता त्यांना आर्थिक मदतीची गरज आहे. “मनोधैर्य” योजनेत सुधारणा करणारा दि.१/८/२०१७ चा उपरोक्त शासन निर्णय विचारात घेता, आधीची दि.२/१०/२०१३ ची निर्बंधित तारीख (कट ऑफ डेट) यापुढे काढून टाकण्यात आली आहे आणि दि.३१/१२/२००९ तारखेपुढील प्रकरणे पात्र ठरविण्यात आली आहेत. उक्त दि.१/८/२०१७ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेली आणखी एक अट अशी आहे की, घटनेच्या वेळी एफआयआर नोंदविलेला असावा. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, पुणे यांनी, त्यांच्या दि.१३/६/२०१७ च्या अहवालासोबत, संरक्षण अधिकारी, ता. मुळशी, जि. पुणे यांनी त्यांना सादर केलेल्या दि.१३/४/२०१७ च्या अहवालाची प्रत जोडली आहे. अभिलेखाचे अवलोकन केल्यानंतर, असे निदर्शनास आले होते की, संरक्षण अधिकाऱ्याने, या प्रकरणाच्या प्रतिपाद्य विषयाबाबत, पौड पोलिस स्टेशनमध्ये नोंदविलेल्या एफआयआर क्र.१२३/१३, दि.१३/८/२०१३ ची प्रत जोडली आहे. उक्त एफआयआरवरून असे दिसून आले आहे की, दि.१३/८/२०१३ रोजी भारतीय दंड संहितेच्या कलम ३७६,३७७ व पोक्सो अधिनियमाच्या कलम ३,४ या अन्वये घटना घडल्याच्या तारखेस, म्हणजेच दि.१३/८/२०१३ रोजी, पीडितेच्या आईने, आरोपीविरूद्ध, म्हणजेच तिच्या दिराविरुद्ध गुन्हा नोंदविला होता. उक्त एफआयआरनुसार, सदर घटनेची तारीख १३/८/२०१३ आहे आणि दि.१/८/२०१७ च्या सुधारित शासन निर्णयानुसार, प्रकरणाच्या पात्रतेची कट ऑफ

डेट, म्हणजेच दि.२/१०/२०१३ काढून टाकलेली आहे आणि दि.३१/१२/२००९ रोजीची व नंतरची प्रकरणे, पात्र समजण्यात आलेली आहेत. तथापि,दि.३०/१२/२०१७ च्या शासन निर्णयानुसार, "सुधारित नवीन मनोधैर्य योजना" विचारात घेता, उक्त "सुधारित नवीन मनोधैर्य योजना" भूतलक्षी प्रभावासह लागू नाही आणि आधीच्या घटनांच्या प्रलंबित प्रकरणांना ती लागू आहे. दि.२१/१०/२०१३ च्या निकषांनुसार जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या जिल्हा फौजदारी दुखापत मदत व पुनर्वसन मंडळाने, तपासणी केलेल्या व नाकारलेल्या प्रकरणांसाठी "सुधारित नवीन मनोधैर्य योजना" लागू नाही आणि अशी प्रकरणे पुन्हा विचारात घेतली जाऊ शकत नाही. जिल्हाधिकारी पुणे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या जिल्हा फौजदारी दुखापत मदत व पुनर्वसन मंडळाने, घटना दि.१३/८/२०१३ रोजी घडली आहे आणि आधीच्या दि.२१/१०/२०१३ च्या शासन निर्णयानुसार, उक्त योजना, दि.२१/१०/२०१३ रोजी व तेव्हा पासून घडलेल्या घटनांसाठी लागू आहे या कारणास्तव, दि.२५/४/२०१७ रोजी या प्रकरणातील पीडितेचा दावा आधीच नाकारला आहे."सुधारित नवीन मनोधैर्य योजने" च्या बाबतीत, दि.३०/१२/२०१७ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद क्रमांक ३ च्या मजकुरानुसार, माननीय मुंबई उच्च न्यायालयाने, डब्ल्यू.पी.क्र.२१६५/२०१४ व ३१२३/२०१५ या प्रकरणी दिलेले आदेश विचारात घेऊन, मनोधैर्य योजनेच्या दि.२१.१०.२०१३ च्या निकषानुसार, दि.३१/१२/२००९ पासूनच्या पात्र प्रकरणी भूतलक्षी प्रभावाने आर्थिक सहाय्य देण्याबाबत, शासनास, धोरणात्मक निर्णय घेऊन स्वतंत्र आदेश काढता येतील. अशा परिस्थितीत असे दिसून आले आहे की, दि.३०/१२/२०१७ च्या शासन निर्णयानुसार, "सुधारित नवीन मनोधैर्य योजने" च्या विद्यमान तरतुदींनुसार या प्रकरणी, बाल पीडित, या योजनेनुसार नुकसान भरपाई मिळण्यास पात्र असल्याचे दिसत नाही.

७. "सुधारित नवीन मनोधैर्य योजने" च्याबाबतीत, दि.३०/१२/२०१७ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र. ३ च्या मजकुरानुसार, शासनाने, मा. मुंबई उच्च न्यायालयाने, डब्ल्यू.पी.क्रमांक २१६५/२०१४ व ३१२३/२०१५ या प्रकरणी दिलेले आदेश विचारात घेऊन,मनोधीर्य योजनेच्या दि.२१.१०.२०१३ च्या निकषानुसार, दि.३१/१२/२००९ पासूनच्या पात्र प्रकरणी भूतलक्षी प्रभावाने आर्थिक सहाय्य देण्याबाबत, धोरणात्मक निर्णय घेऊन आजच्या तारखेपर्यंत (या प्रकरणाचा निपटारा करण्याची तारीख) स्वतंत्र आदेश काढला नाही. शासन असा धोरणात्मक निर्णय घेईपर्यंत आणि स्वतंत्र आदेश काढेपर्यंत, विद्यमान प्रकरणांतील बालक पीडितेला आणि तत्सम प्रकरणांमधील इतर पीडितांना "मनोधैर्य योजनेत" सांगितल्याप्रमाणे कोणत्याही

मदतीपासून वंचित ठेवले जाणार होते. म्हणून, शासनाने, धोरणात्मक निर्णय घेण्याची प्रक्रिया शीघ्रपणे करणे व उक्त विषयाबाबत स्वतंत्र आदेश काढणे आवश्यक होते.

८. विद्यमान प्रकरणातील आरोपींवरील फौजदारी खटला न्यायप्रविष्ट आहे. जर सदर प्रकरणात आरोपीला सिद्ध दोषी ठरविल्यास, मा. न्यायालय, आरोपींवर दंड लादून आणि दंडाचा काही भाग पीडिताला 'भरपाई' म्हणून देऊन आपल्या स्वेच्छा निर्णयानुसार, फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३५७ च्या तरतुदींनुसार पीडितेला नुकसान भरपाई देण्याचा विचार करू शकेल. जरी दंडाचे प्रदान हे सुनावलेल्या शिक्षेचा भाग नसले तरी देखील न्यायालय,पीडितेला नुकसान भरपाई द्यावी यासाठी आरोपीला निर्देश देखील देऊ शकेल. जर कलम ३५७-अ अन्वये दिलेली नुकसान भरपाई, पीडितेचे नुकसान भरून काढण्यासाठी पर्याप्त नसेल तर किंवा जरी आरोपी दोषमुक्त ठरला असला तरी देखील न्यायालय, कलम ३५७-अ अन्वये पीडित व्यक्तीस नुकसान भरपाई योजनेअंतर्गत नुकसान भरपाई देण्यासाठी पीडितेचे प्रकरण जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे पाठवण्याचा देखील विचार करू शकेल. तथापि, या सर्व घडामोडींना थोडा वेळ लागू शकेल. मनोधैर्य योजनेच्या पात्रतेच्या निकषात फेरबदल करण्यासंबंधीच्या दि.३०/१२/२०१७ च्या शासन निर्णयाच्या पृष्ठ क्रमांक ६ वरील परिच्छेद क्रमांक १० च्या मजकुरात असे नमूद आहे की, पोक्सो अधिनियम,२०१२ खालील बलात्काराची प्रकरणे आणि अँसिड हल्ल्याच्या घटना यांमध्ये पीडित महिला व बालिका, एकतर "सुधारित मनोधैर्य योजने" मध्ये किंवा "पीडित व्यक्ती नुकसान भरपाई योजनेत" आर्थिक सहाय्य, नुकसान भरपाई आणि पुनर्वसन लाभ मिळण्यास पात्र असेल.

९. पीडित व्यक्तीचे कोवळे वय आणि या प्रकरणाची वस्तुस्थिती व परिस्थिती आणि दुर्दैवी घटनेमुळे पीडित बालिकेला व पीडितेच्या आई-वडिलांना सोसाव्या लागलेल्या हाल-अपेष्टा लक्षात घेऊन आयोगाने, या प्रकरणातील पीडित बालिकेस यथोचित नुकसान भरपाई / आर्थिक सहाय्य देणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. या परिस्थितीत, आयोगाने या प्रकरणी पुढील शिफारशी केल्या आहेत:-

१. वर चर्चा केलेल्या,दि.३०/१२/२०१७ च्या शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र.३ चा मजकूर विचारात घेता, शासनाने, धोरणात्मक निर्णय घेण्याची प्रक्रिया वेगाने करण्याचे आणि परिच्छेद क्र.३ मध्ये नमूद केलेल्या प्रवर्गात मोडणाऱ्या पीडित व्यक्तींना आर्थिक सहाय्य देण्यासाठी निदेश काढण्याचे निर्देश दिलेले आहेत.

२. जेव्हा शासन, धोरणात्मक निर्णय घेईल आणि परिच्छेद क्रमांक ३ मध्ये नमूद केलेल्या प्रवर्गात मोंडणाऱ्या पीडित व्यक्तींना आर्थिक सहाय्य देण्यासाठी आदेश काढेल तेव्हा, विद्यमान प्रकरणातील पीडितेचे प्रकरण, योग्यमोबदला मिळण्यासाठी उचित प्राधिकरणासमोर मांडण्याकरिता आवश्यक त्या उपाययोजना करण्यासाठी आणि अनुपालन अहवाल आयोगास सादर करण्यासाठी प्रतिवादींना निर्देश दिले आहे.

३. या शिफारशींची प्रत,माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई, तक्रारदार, प्रतिवादी आणि पीडितेचे आई-वडील यांना (प्रतिवादीव्दारे) पाठवावी.

❖ **<u>प्रकरण क्रमांक.२३९/२०१७</u>**

१. श्री संजय खंबायते, तक्रारदार यांनी, आयोगास उद्देशून लिहिलेल्या त्यांच्या दि.१५/११/२०१७ च्या अर्जाव्दारे असे म्हटले आहे की,काही दिवसांपूर्वी औरंगाबाद जिल्ह्यातील एका गावामध्ये, गावातील काही हुल्लडखोरांनी एका मुलीवर बलात्कार करून तिची हत्या केली आणि तिचा मृतदेह एका घाटात फेकून दिला होता. उक्त प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे आणि गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या घटनेमुळे उक्त पीडितेच्या कुटूंबियांना मोठा धक्का बसला आहे. या घटनेमुळे पीडित कुटुंबाची स्थिती विचलित झाली आहे. पीडितेच्या कुटुंबाच्या प्रमुखांना दोन मुली आणि त्याची पत्नी यांची काळजी घ्यावी लागते. त्यांची मोठी मुलगी विवाहित असून इतर मुली माध्यमिक शिक्षण घेत आहेत. म्हणूनच तक्रारदाराने असे निवेदन केले की, मयत पीडितेच्या कुटुंबातील सदस्यांना शासनाकडून काही आर्थिक मदत देण्यात यावी.

२. उक्त तक्रार प्राप्त झाल्यावर, प्रतिपाद्य प्रकरणी केलेल्या कार्यवाही संबंधीचा अहवाल, पोलिसांकडून व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, औरंगाबाद यांच्याकडून मागवण्यात आला होता. पोलिसांनी असे कळविले आहे की, उक्त घटनेच्या बाबतीत, पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२, ३६३,२०१ याअन्वये गुन्हा व इतर गुन्हे नोंदविलेले आहेत आणि दोषारोपपत्र दाखल केले आहे आणि प्रकरण न्यायालयामध्ये न्यायप्रविष्ट आहे. आणखी असेही कळविले होते की, मयत पीडितेच्या कुटूंबियांना मनोधैर्य योजनेंतर्गत आर्थिक मदत देण्याबाबत मा. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना पत्र पाठविले आहे. आयोगाला उद्देशून

लिहिलेल्या दि.१९/१२/२०१७ च्या दुसऱ्या पत्रान्वये पोलिसांनी असे कळविले आहे की, या प्रकरणात भारतीय दंड संहितेच्या कलम ३६६(अ), ३७६(डी), ५११ याखालील अपराध आणि पोक्सो अधिनियमाच्या कलम ८,१७ व १८ या खालील अपराध दाखल करण्यात आलेले आहेत, आरोपींना अटक करण्यात आली आहे, आरोपींपैकी एक आरोपी विधिसंघर्षग्रस्त बालक आहे आणि मनोधैर्य योजनेंतर्गत आर्थिक सहाय्य उपलब्ध होण्यासाठी प्रकरणातील कागदपत्रांच्या प्रती, पीडितेच्या कुटूंबातील सदस्यांनी पुरविण्यात आलेल्या आहेत.

३. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, औरंगाबाद यांनी दि.५/१२/२०१७ च्या अहवालाव्दारे असे सादर केले आहे की, मनोधैर्य योजनेनुसार, गुन्ह्यातील पीडित व्यक्तींना आर्थिक साहाय्य देण्यासाठी व त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या जिल्हा फौजदारी दुखापत मदत व पुनर्वसन मंडळाने, दि.२७/७/२०१७ रोजी असे मत व्यक्त केले की, याप्रकरणी, मयत पीडितेच्या कायदेशीर प्रतिनिधींना, रु.३,००,०००/- ती नुकसान भरपाई / आर्थिक सहाय्य देणे आवश्यक आहे. तथापि,मयत पीडितेच्या कायदेशीर प्रतिनिधींना नुकसान भरपाई प्रदान करण्यासाठी दि.२१/१०/२०१३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र.४(चार) मध्ये स्पष्ट निर्देश नसल्याने, मयत पीडितेच्या कायदेशीर प्रतिनिधींना उक्त नुकसान भरपाई प्रदान करण्याकरिता मान्यता व मंजुरी मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार,महिला व बाल कल्याण विभागाच्या पुणे आयुक्त कार्यालयाने, हा गुन्हा गंभीर व जघन्य गुन्हा असल्याने विशेष बाब म्हणून हे प्रकरण विचारात घेण्याची आणि पीडित व्यक्तीच्या कायदेशीर प्रतिनिधींना नुकसान भरपाई प्रदान करण्याकरिता मान्यता व मंजुरी देण्याची विनंती, दि.७/९/२०१७ व ३१/५/२०१८ या पत्राव्दारे शासनाला केली आहे.

४. दि.२१/१०/२०१३ च्या उक्त शासन निर्णयाच्या पृष्ठ क्र. ५ वरील संबंधित परिच्छेद क्र.४(चार) खालीलप्रमाणे वाचा:

"गंभीर व क्रूर स्वरूपाच्या बलात्कारांच्या घटनेमध्ये पिडीत महिलाव बालक यांना किंवा यथास्थिती त्यांच्या वारसदारांन रू. ३ लाख इतके १००% अर्थसहाय्य तात्काळ अदा करणे. गुन्हयाचे स्वरूप व तीव्रता ठरविण्याचे अधिकार जिल्हा मंडळाला राहतील."

उपरोक्त परिच्छेदाचे वाचन केल्यावर असे दिसून येते की, उपरोक्त शब्दांनुसार, असे नमूद आहे की, बलात्काराच्या गंभीर, भयंकर गुन्ह्यांच्या बाबतीत, पीडित महिलेला

किंवा बालिकेला किंवा यथास्थिती, त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधींना तातडीने रू.३ लाख, १००% इतके अर्थसहाय्य प्रदान करावयाचे आहे. सदर मंडळास गुन्ह्याचे स्वरूप व तीव्रता निश्चित करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. विद्यमान प्रकरणी, घटनेतील पीडित बालिका मयत झालेली आहे आणि आर्थिक मदत देण्याची हक्क मागणी, या बाल पीडितेच्या आई-वडिलांनी सादर केली आहे. हे अभियोगाचे प्रकरण नव्हते किंवा उक्त मयत बाल पीडितेच्या आई-वडिलांचा अपराध करण्यामध्ये कोणत्याही प्रकारे सहभाग नव्हता.या परिस्थितीत, आयोगाचे असे मत होते की, मयत बाल पीडितेच्या आई-वडिलांना/ कायदेशीर प्रतिनिधींना आर्थिक सहाय्य प्रदान करण्याकरिता मान्यता व मंजुरी मिळण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याऐवजी, उपरोक्त दि.२१/१०/२०१३ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ४(चार) मधील तरतुदींच्या मजकुरानुसार,जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या जिल्हा फौजदारी दुखापत मदत व पुनर्वसन मंडळास, प्रकरणातील मयत पीडितेच्या आई-वडिलांना / कायदेशीर प्रतिनिधीस योग्य आर्थिक सहाय्य देण्याबाबत विचार करण्याचे अधिकार देण्यात आले.

५. तथापि, उक्त मनोधैर्य योजनेच्या बाबतीत, माननीय मुंबई उच्च न्यायालयाने, डब्ल्यू.पी.क्र.२९५१/२०१६ प्रकरणी, फौजदारी अपील क्र.२०१५ चा ८८४ मधील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाच्या आधारे, तसेच गोवा राज्य, १० लाख रुपये इतकी आर्थिक नुकसान भरपाई देत आहे याची दखल घेऊन, दि.८/३/२०१७ रोजीच्या आदेशान्वये, राज्य सरकारला नवीन योजना विकसित करण्यास सांगितले. त्याचप्रमाणे, मा. मुंबई उच्च न्यायालयाने, डब्ल्यू.पी.क्र.२१६५/२०१४ व ३१२३/२०१५ या दोन प्रकरणी, राज्य सरकारला "मनोधैर्य" योजनेखालील दि.०२/१०/२०१३ ची निर्बंधित तारीख (कट ऑफ डेट) काढण्याचे आणि उक्त योजनेखालील पात्रता निकषांमध्ये बसत असलेल्या प्रकरणी, पीडित महिलांना व बालिकांना भूतलक्षी प्रभावाने नुकसान भरपाई प्रदान करण्याचे आदेश दिले. म्हणून, महाराष्ट्र सरकारच्या महिला आणि बाल विकास विभागाने, दि.१/८/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये "मनोधैर्य" योजनेखालील आर्थिक सहाय्याच्या व पुनर्वसनाच्या पात्रता निकषांमध्ये सुधारणा करण्यासंबंधी नव्याने निर्देश दिले आहे. दि.१/८/२०१७ रोजीच्या उक्त शासन निर्णयानुसार, दि.०२/१०/२०१३ रोजीच्या आधीच्या शासन निर्णयानुसार मनोधैर्य योजनेखालील सहाय्य देण्याचे पात्रता निकष, उक्त शासन निर्णयाच्या दिनांकापासून, म्हणजेच दि.१/८/२०१७ रोजी व तेव्हापासून फेरबदल केलेले आहेत आणि उक्त शासन निर्णयास जोडलेल्या जोडपत्र-अ प्रमाणे, बलात्कार पीडित/लैंगिक अपराध पीडित व ॲसिड हल्ल्यांच्या महिला पीडित व्यक्ती

यांना, सुधारित वित्तीय साहाय्य देता येईल. नुकसान भरपाईच्या सुधारित मानक प्रमाणानुसार, नुकसान भरपाईची रक्कम पूर्वीच्या ३ लाखांवरून १० लाख रुपये इतकी वाढवण्यात आली आहे. उक्त योजना राबविण्याचे अधिकार, आता जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या जिल्हा फौजदारी दुखापत मदत व पुनर्वसन मंडळाऐवजी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे देण्यात आले आहेत. उक्त सुधारित शासन निर्णयानुसार,दि.३१/१२/२००९ पासून पात्र असलेली पोक्सो अधिनियम,२०१२ अन्वये प्रवर्ग १(ए) व (बी) मध्ये मोडणारी बलात्काराची प्रकरणे, प्रवर्ग २(ए) व २(बी) मधील विवरणपत्रे व प्रवर्ग ३(ए) मध्ये मोडणारी ॲसिड हल्ल्याची प्रकरणे (उक्त शासन निर्णयाच्या जोडपत्र-अ च्या) यासाठी, दि.२१ ऑक्टोबर २०१३ च्या शासन निर्णयाच्या निकषानुसार मनोधैर्य योजनेंतर्गत आर्थिक नुकसान भरपाई दिली जाईल. घटनेच्या वेळी एफआयआर दाखल केला असेल तरच केवळ आर्थिक नुकसान भरपाई प्रदेय असेल, आणि उक्त योजनेंतर्गत सहाय्य देण्याची कार्यपद्धती विहित केलेली आहे.

६. पोक्सो अधिनियम,२०१२ अन्वये, पीडित बालकाचा मृत्यू झाल्यास, मानसिकदृष्ट्या विकलांग असलेल्या बालकांसह लैंगिक गुन्ह्यांमुळे पीडित असलेल्या बालकांच्या आई-वडिलांना आर्थिक सहाय्य देण्याच्या बाबतीत, उक्त शासन निर्णयाच्या भाग ब च्या पृष्ठ क्र. ५ वरील संबंधित परिच्छेद क्र.(दोन) हा मजकूर खालीलप्रमाणे वाचा:

> "बलात्काराच्या घटनेमुळे मृत्यु झाल्यास, पिडीत बालकाच्या गुन्ह्यामध्ये सामिल नसलेल्या आईच्या नावे, आई हयात नसेल तर, गुन्ह्यामध्ये सामिल नसलेल्या वडीलांच्या नावे व आई वडील दोघेही हयात नसेल तर मा. न्यायालयाने घेतलेल्या निर्णयानुसार बालकाचे पालकत्व किंवा वारसा हक्क असणा-या व्यक्तीच्या नावे रक्कम अदा करण्यात येईल."

७. दि.१/८/२०१७ च्या उक्त शासन निर्णयाच्या उपरोक्त मजकुराचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, "पोक्सो अधिनियम,२०१२ अन्वये बाल पीडितेच्या मृत्यूच्या प्रकरणात, मयत बाल पीडित व्यक्तीचे आई-वडील, जर ते उक्त अपराध करण्यामध्ये सहभागी नसतील तर, यथोचित आर्थिक मदत मिळण्यास हक्कदार आहे असे या परिच्छेदाच्या मजकुरामध्ये नमूद केले आहे. उक्त शासन निर्णयाच्या उपरोक्त मजकुरामध्ये आणखी अशीही तरतूद आहे की, जर आई-वडिलां पैकी दोन्ही ही हयात नसतील तर, मा. न्यायालयव्दारे ठरविण्यात

येईल त्याप्रमाणे पालक किंवा उत्तराधिकारी यांना उक्त योजनेनुसार, आर्थिक मदत द्यावयाची आहे."

७. दि.१/८/२०१७ रोजीच्या उक्त शासन निर्णयाला, पीआयएल क्र.८७/२०१७ यामध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये आव्हान देण्यात आले होते. मा. मुंबई उच्च न्यायालयाने, फौजदारी रिट याचिका क्रं.३५/२०१३ व इतर प्रकरणे यामध्ये, आपला दि.१२/१०/२०१७ चा आदेश विचारात घेऊन, उपरोक्त पी. आय. एल. मधील तक्रारींचे पुनर्विलोकन करून, बलात्कार प्रकरणातील पीडितांसाठी, पोक्सो अधिनियम,२०१२ खालील प्रकरणांसाठी व ॲसिड हल्ल्यातील पीडितांच्या प्रकरणांसाठी आदर्श योजना तयार करण्यासाठी समिती स्थापन करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार समिती गठीत करण्यात आली व त्या समितीने मॉडेल योजना तयार केली. या पार्श्वभूमीवर, शासनाने, "सुधारित नवीन मनोधैर्य योजने" च्या बाबतीत, दि.३०/१२/२०१७ रोजी आणखी एक शासन निर्णय काढला. दि.३०/१२/२०१७ च्या उक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्र.२ चा मजकूर विचारात घेतात, उक्त "सुधारित नवीन मनोधैर्य योजना" पूर्वलक्षी प्रभावाने लागू नाही; तथापि, ती आधीच्या घटनांच्या प्रलंबित प्रकरणांना लागू असेल. उक्त शासन निर्णयाच्या परिच्छेद क्र.२(अ) मध्ये आणखी असे नमूद आहे की, "सुधारित नवीन मनोधैर्य योजना" ही, दि.३०/१२/२०१७ रोजी असलेल्या निकषांप्रमाणे, जिल्हा समितीव्दारे तपासणी करण्यात आलेल्या व फेटाळण्यात आलेल्या प्रकरणांना लागू असणार नाहीत आणि अशी प्रकरणे पुन्हा विचारात घेतली जाऊ शकणार नाहीत. दि.३०/१२/२०१७ च्या उक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्रमांक ३ मध्ये असे नमूद केले आहे की, मा. मुंबई उच्च न्यायालयाने, डब्ल्यू.पी.क्र.२१६५/२०१४ व ३१२३/२०१५ या प्रकरणी, मनोधीर्य योजनेच्या दि.२१.१०.२०१३ च्या निकषानुसार, दि.३१/१२/२००९ पासून पात्र असलेल्या प्रकरणी भूतलक्षी प्रभावाने आर्थिक सहाय्य देण्याबाबत, दिलेले आदेश विचारात घेता, शासनास, धोरणात्मक निर्णय घेऊन स्वतंत्र आदेश काढता येतील. दि.३०/१२/२०१७ च्या उक्त शासन निर्णयातील परिच्छेद क्र.३ मध्ये असे नमूद केले आहे की, उक्त सुधारित नवीन मनोधैर्य योजना, भारतीय दंड संहितेच्या कलम ३७५, ३७६(२), ३७६(अ) (ब) (क) (ड) (इ) खालील, पोक्सो अधिनियम,२०१२ खालील कलम ३,४,५ व ६ खालील बलात्काराच्या प्रकरणातील महिला व बाल पीडितांसाठी,भारतीय दंड संहितेच्या कलम ३२६ (अ) (ब) खालील ॲसिड हल्ल्यातील पीडितांसाठी आणि अनैतिक व्यापार(प्रतिबंध) अधिनियम, १९५६ खालील महिला आणि बाल पीडितांसाठी आर्थिक मदत व पुनर्वसन उपाययोजना करण्यासाठी तरतूद करील.

८. उपरोक्त पैलूंचा विचार करता असे दिसून आले की, विद्‌यमान प्रकरणी, मनोधैर्य योजने अंतर्गत सहाय्य देण्याची मयत बाल पीडितेच्या आईवडिलांची हक्क मागणी, जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या जिल्हा फौजदारी दुखापत मदत व पुनर्वसन मंडळाने फेटाळलेली नव्हती. जरी दि.२१.१०.२०१३ च्या शासन निर्णयामध्ये पोक्सो अधिनियम,२०१२ खालील प्रकरणांमधील मयत बाल पीडितेच्या आई-वडिलांना मदत देण्याची तरतूद असली तरी, मयत बाल पीडितांच्या आई-वडिलांना आर्थिक मदत देण्यासाठी कोणतीही स्पष्ट तरतूद नसल्याचे दिसून आल्याने, उक्त मंडळाने, पीडितेच्या आई-वडिलांना रुपये ३ लाख इतकी नुकसान भरपाई देण्यास मान्यता व मंजुरी मिळावी यासाठी हे प्रकरण शासनाकडे पाठविणे पसंत केले होते. पोक्सो अधिनियम, २०१२ खालील प्रकरणांमधील मयत बाल पीडितेच्या आई-वडिलांना कोणत्या परिस्थितीत नुकसान भरपाई देता येईल याबाबत वर चर्चा केल्याप्रमाणे, त्यानंतरच्या दि.१/८/२०१७ च्या उक्त शासन निर्णयाच्या उपरोक्त मजकुरामध्ये स्पष्टपणे नमूद केलेले आहे. अशा परिस्थितीत, आयोगाचा असा विचार होता की, जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या उक्त जिल्हा फौजदारी दुखापत मदत व पुनर्वसन मंडळाने, शासनाकडे प्रकरण पाठविण्याऐवजी, मयत बाल पीडितांच्या आई-वडिलांना आर्थिक मदत देण्याचा विचार करावयास हवा होता. तक्रारदार व प्रतिवादी यांनी सादर केलेले उपरोक्त म्हणणे आणि वर चर्चा केल्याप्रमाणे,प्रतिपाद्‌य विषयावरील शासन निर्णयाच्या तरतुदी विचारात घेता, आयोगाचे असे होते की, विद्‌यमान प्रकरणी, प्रतिपाद्‌य विषयावरील शासन निर्णयामध्ये निर्धारित केलेल्या आवश्यक निकषांची पूर्तता करण्यास अधीन राहून सकृत्दर्शनी, मयत बाल पीडितांचे आई-वडील मनोधैर्य योजनेखाली आर्थिक मदत मिळण्यास हक्कदार होते. म्हणून, संबंधित प्राधिका-यांनी, दि.२१/१०/२०१३ च्या उक्त शासन निर्णयाच्या उपरोक्त मजकुरामध्ये, मयत महिलेच्या व बाल पीडितेच्या उत्तराधिका-यांना वित्तीय सहाय्य प्रदान करण्याची तरतूद केलेली असल्याने, उपरोक्त शासन निर्णयामध्ये निर्धारित केलेल्या अटी व शर्तींनुसार, यथोचित नुकसान भरपाई देण्यासाठी विद्‌यमान प्रकरणातील मयत बाल पीडितांच्या आई-वडिलांच्या प्रकरणाचा पुनर्विचार करणे आवश्यक होते, आणि शासनाकडे प्रकरण पाठवण्यामध्ये कोणतेही औचित्य नव्हते. प्रतिवादी क्र.१ च्या प्रतिवादीच्या आयुक्तालयाने दिलेल्या संदर्भानुसार, अंतिम शिफारसी करण्याच्या तारखेपर्यंत आजपर्यंत शासनाने, नुकसान भरपाई प्रदान करण्यासाठी मंजुरी व मान्यता देण्यासंबंधी कोणताही आदेश संमत केलेला नाही असे अभिलेखावरून दिसून आले आहे. त्यानंतरचा दि.१/८/२०१७ चा शासन निर्णय विचारात घेता, मनोधैर्य

योजनेची अंमलबजावणी करण्याचे अधिकार आता जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाकडे निहित केलेले असल्याने, जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या जिल्हा फौजदारी दुखापत मदत व पुनर्वसन मंडळाकडे पुनर्विचार करण्यासाठी प्रकरण पाठवल्यामुळे कोणताही उद्देश सफल झालेला नाही. म्हणूनच, प्रतिपाद्य प्रकरणावरील शासन निर्णयांच्या तरतुदी विचारात घेऊन, विद्यमान प्रकरणी मयत बाल पीडितेच्या आई-वडीलांच्या हक्क मागणीचा विचार करण्यासाठी हे प्रकरण, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, औरंगाबादकडे पाठवणे आवश्यक होते. या परिस्थितीत, आयोगाने या प्रकरणी खालील शिफारसी केल्या:

१. जिल्हा फौजदारी दुखापत मदत व पुनर्वसन मंडळ, औरंगाबाद येथील कार्यालयाकडील विद्यमान प्रकरणातील पीडितेच्या आई-वडिलांच्या दावा अर्जाचा मूळ अभिलेख व कार्यवाही, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, औरंगाबाद यांच्याकडे लवकरात लवकर पाठवण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्याचे निर्देश, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, औरंगाबाद यांना दिले आहे.

२. जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या जिल्हा फौजदारी दुखापत मदत व पुनर्वसन मंडळाने विद्यमान प्रकरणी मयत बाल पीडितेच्या आई-वडीलांची हक्क मागणी नाकारलेली नसल्याने, मनोधैर्य योजनेच्या संबंधातील शासन निर्णयांमध्ये निर्धारित केलेल्या पात्रता निकषांची पूर्तता करण्यास अधीन राहून, यथोचित आर्थिक मदत/ नुकसान भरपाई देण्यासाठी या प्रकरणाचा पुनर्विचार करण्याची विनंती माननीय जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,औरंगाबाद यांना केली आहे.

३. या शिफारशींची प्रत, माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी,(१) उपसचिव, महिला व बाल विकास मंत्रालय, मुंबई, (२)अध्यक्ष, जिल्हा फौजदारी दुखापत मदत व पुनर्वसन मंडळ, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद, (३) मा.सदस्य-सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, औरंगाबाद, (४) तक्रारदार, (५) प्रतिवादी, आणि (६) पीडितेच्या आई-वडिलांना पाठविण्यात यावी.

**नमुना अ**

सन २०१८-२०१९ या कालावधीत प्राप्त झालेल्या, निकाली काढलेल्या
व प्रलंबित तक्रारींचा तपशील दर्शविणारे विवरणपत्र

| वर्ष | वर्षाच्या सुरूवातीस प्रलंबित प्रकरणे | नवीन तक्रारी | एकूण | निकाली काढलेली प्रकरणे | वर्षाच्या शेवटी प्रलंबित प्रकरणे |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| २०१८-२०१९ | २८७ | ८६ | ३३३ | ८ | ३२५ |

खाते विधान

लेखा विवरणपत्र महालेखापाल यांना सादर केले आहे. लेखा परीक्षणानंतर ऑडीटेड स्टेटमेंट सभागृहात सादर करण्यात येईल.

## MAHARASHTRA STATE COMMISSION FOR PROTECTION OF CHILD RIGHTS,MUMBAI
## 3RD FLOOR , TRANSPORT SERVICE S.P ROAD WORLI, MUMBAI
## BALANCE SHEET FOR THE YEAR ENDED 31st MARCH 2019

| LIABILITIES | SALARY | NON SALARY | TOTAL | ASSETS | SALARY | NON SALARY | TOTAL |
|---|---|---|---|---|---|---|---|
| CAPITAL FUND | | | | | | | |
| OPENING BALANCE | | | | Fixed Assets | | | |
| Add/(Less):Adjustment in Opening Balance | (507,421) | 2,266,627 | 1,759,206 | As per schedule | 5,527 | 1,555,030 | 1,560,557 |
| Add/(Less):Advance written off | | | | | | | |
| Add/(Less):surplus/(Deficit) | 1,676,006 | 696,688 | 2,372,694 | Current Assets | | | |
| | 1,168,585 | 2,963,315 | 4,131,900 | Loan & Advances | | | |
| Current liabilities | | | | Festival Advance Given to Employees | 12,500 | | 12,500 |
| Salary Payable | 254,322 | | 254,322 | Advance to Salary Fund | | 244,949 | - |
| Festival Advances Agst Salary Recd. From State Govt | 10,000 | | 10,000 | | | | |
| DCPS Payable | 11,554 | | 11,554 | Cash & Cash Equipment | | | |
| GIS Payable | 1,800 | | 1,800 | Non Salary Petty Cash Book | | 15,475 | 15,475 |
| GPF Payable | 40,000 | | 40,000 | Cash Non Salary Book | | 10 | 10 |
| HBA Payable | 42,170 | | 42,170 | State bank of India | 20,050 | 387,682 | 407,732 |
| Professional Tax Payable | - | | - | RBI | 1,780,303 | 815,169 | 2,595,472 |
| TDS Payable | 45,000 | | 45,000 | | | | |
| Other Current Liabilities | | | | | | | |
| K K Chanani & Associates | | | | | | | |
| Electricity Expenses Payable | | - | - | | | | |
| Telephone Expenses Payable | | - | - | | | | |
| Audit Fees Payable | | 55,000 | 55,000 | | | | |
| Advance from Non-Salary Fund | 244,949 | | | | | | |
| | 1,818,380 | 3,018,315 | 4,591,745.90 | | 1,818,380 | 3,018,315 | 4,591,745.90 |

For,
Pavan Jain& CO.
CHARTERED ACCOUNTANTS

Pavan Jain (Partner)
Membership No. 407354
FRN No. 013757C
UDIN No. 20407354AAAABM3548
Place - Mumbai
Date -12th November 2020

PAVAN JAIN & CO. CHARTERED ACCOUNTANTS Partner

PAVAN JAIN & CO. CHARTERED ACCOUNTANTS PARTNER FRN 013757C

Assistant Administrative Officer-cum-Accounts Officer.
MAHARASHTRA STATE COMMISSION FOR PROTECTION OF CHILD RIGHT, MUMBAI

Secretary
Maharashtra state commission for protection of child rights, Mumbai

Assistant Administrative Officer-cum-Accounts Officer
Maharashtra State Commission for Protection of child Rights, Mumbai

प्रशासकीय अधिकारी
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, मुंबई

MAHARASHTRA STATE COMMISSION FOR PROTECTION OF CHILD RIGHTS,MUMBAI

3RD FLOOR , TRANSPORT SERVICE S.P ROAD WORLI, MUMBAI

INCOME AND EXPENDITURE ACCOUNTS FOR THE YEAR ENDED 31st MARCH 2019

| Expenditure | SALARY | NON SALARY | OTHERS | INCOME | SALARY | NON SALARY | OTHERS |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Salary & Allowances | 7,228,519 | | | Grant Received | | | |
| Audit Fee | | 71,705 | | salary & Allowance | 8,905,500 | | |
| convention fees | | - | | Grant Received on Non-Salary | | 2,517,000 | |
| conveyance fees | | - | | UNICEF | | | |
| Printing and Stationery | | 337,377 | | | | | |
| Tour & Travelling Expenses | | 582,165 | | | | | |
| Advertisement | | 6,047 | | Other Income | | | |
| Allowance to Secretary | | 202,044 | | Bank Interest | | 22,654 | |
| Petrol Expense | | 2,000 | | RTI Fees | | | |
| Electricity Expenses | | 98,268 | | Sales of Scrap | | | 1,446 |
| Car Running Charges | | - | | | | | |
| | | 167,476 | | Excess of Expenditure Over Income | | | |
| Office Expenses | | - | | | | | |
| Misc. Expenses | | - | | | | | |
| Postage Expense | | 23,732 | | | | | |
| professional fees | | - | | | | | |
| Sitting & Other allowance | | - | | | | | |
| Telephone Expenses Non Salary | | 55,120 | | | | | |
| Repairs & Maintenance Non Salary | | 112,562 | | | | | |
| RTI Fees | | - | | | | | |
| Sale of Scrap Deposited | | 1,446 | | | | | |
| Refund of Grant | | - | | | | | |
| Convention UNICEF | | - | 677 | | | | |
| Depreciation | 975 | 183,793 | | | | | |
| Excess income over Expenditure | 1,676,006 | 695,919 | 769 | | | | |
| | 8,905,500 | 2,539,654 | 1,446 | | 8,905,500 | 2,539,654 | 1,446 |

For,
Pavan Jain& CO.
CHARTERED ACCOUNTANTS

Pavan Jain (Partner)
Membership No. 407354
FRN No. 013757C
UDIN No. 20407354AAAABM3548
Place - Mumbai
Date - 12th November 2020

PAVAN JAIN & CO. Partner CHARTERED ACCOUNTANTS

PAVAN JAIN & CO. PARTNER FRN CHARTERED ACCOUNTANTS

Assistant Administrative Officer-cum-Accounts Officer.
MAHARASHTRA STATE COMMISSION FOR PROTECTION OF CHILD RIGHT, MUMBAI.

Secretary
Maharashtra state
commission for protection
of child rights, Mumbai

Assistant Administrative Officer-
cum-Accounts Officer
Maharashtra State Commission for
Protection of Child Rights, Mumbai

प्रशासकीय अधिकारी
महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग

# MAHARASHTRA STATE COMMISSION FOR PROTECTION OF CHILD RIGHTS,MUMBAI

## 3RD FLOOR , TRANSPORT SERVICE S.P ROAD WORLI, MUMBAI

## RECEIPT AND PAYMENT ACCOUNTS FOR THE YEAR ENDED 31st MARCH 2019

| RECEIPTS | SALARY | NON SALARY | OTHERS |
|---|---|---|---|
| Opening Balance: | | | |
| State Bank of India | | 434,439 | |
| RBI PLA | - | | |
| Cash in Hand | | - | |
| Cheque in Hand | | | |
| | - | 434,439 | - |
| Grant Received: | | | |
| Salary & Allowances | 8,905,500 | - | - |
| Non-Salary | - | 2,517,000 | - |
| UNICEF | - | - | - |
| NCPCR | - | - | - |
| | 8,905,500 | 2,517,000 | - |
| Other Receipts | | | |
| Bank Interest | | 22,654 | |
| Festive Advances | 12,500 | | - |
| Sale of Scrap | | | 1,446 |
| RTI Fees | - | | |
| Transfer | 109,080 | | |
| Total | 9,027,080 | 2,974,093 | 1,446 |

| PAYMENT | SALARY | NON SALARY | OTHERS |
|---|---|---|---|
| Salary & Advances | 7,224,227 | | |
| Convention | | - | |
| Printing & Stationary | | 337,377 | |
| Tour & Travelling Expenses | | 570,262 | |
| Conveyance Expenses | | - | |
| Advertisement | | 6,047 | |
| Allowance to Secretary | | 202,044 | |
| Office Expenses | | 167,476 | |
| Petrol Expenses | | 2,000 | |
| Electricity Expenses | | 98,268 | |
| Language Translation Charges | | - | |
| Misc. Expenses | | - | |
| Postage Expenses | | 23,732 | |
| RTE Expenses | | - | |
| Telephone expenses | | 55,120 | |
| Repairs & Maintenance | | 111,979 | |
| Event Expenses | | - | |
| Sitting & Other Allowance | | - | |
| Transfer | | 108,311 | 769 |
| Professional fees | | - | |
| Festive Advances given | 2,500 | - | |
| sale of scrap Deposited | | 1,446 | |
| Grant Refunded | | - | |
| RTI Fees | | - | |
| Audit Fees | | 71,705 | |
| Convention UNICEF | | | 677 |
| Closing Balance | | | |
| Cash in hand | | - | |
| Non Salary Petty Cash Book | | 15,475 | |
| State bank of India | 20,050 | 387,682 | |
| RBI PLA | 1,780,303 | 815,169 | |
| Total | 9,027,080 | 2,974,093 | 1,446 |

For,
Pavan Jain& CO.
CHARTERED ACCOUNTANTS

Pavan Jain (Partner)
Membership No. 407354
FRN No. 013757C
UDIN No. 20407354AAAABM3548
Place - Mumbai
Date -12th November 2020

Assistant Administrative Officer-cum-Accounts Officer.
MAHARASHTRA STATE COMMISSION FOR PROTECTION OF CHILD RIGHT, MUMBAI.

Secretary
Maharashtra state commission for protection of child rights, Mumbai

Assistant Administrative Officer-cum-Accounts Officer
Maharashtra State Commission for Protection of child Rights, Mumbai